मे १९८८ किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



मे १९८८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

-: कार्यकारी संपादक :-

**श्री. सदानंद चेंदवणकर**



वर्ष ६७ वे **किंमत २ रुपये** (अंक २रा

**दूरध्वनी ४१२२५६१**

- कार्यालय -

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/– (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

४८

थोर तुझी भक्ति तैसीच विरक्ती ।
भक्तांमाजी व्यक्ती आई तूं गे ॥
ऐहिक सुखा या मारुनियां लाथ ।
मालिक श्रीमंत जोडिलासे ॥
कष्ट देई फार कष्ट घेई फार ।
ऐसा हा कठोर मनाचा कीं ॥
नसे माणिकासी तासविण शोभा ।
समर्थाची प्रभा जाहलास ॥
आतां काय तुला आणीक उणीव ।
स्वरुपीं जाणीव दिधली ती ॥
थोर साधुसंत ज्यासाठी कष्टले ।
तैं तूं मिळविलें हातोहातीं ॥
भक्त दर्शनासी येती त्याची दाद ।
बोला तुझे साद देती बाबा ॥
दासा या पाहुनी वाटलें कौतुक ।
ठेवितों मस्तक पायांवरी ॥

४९

जनन मरण देवाचे हो हातीं ।
संतति संपत्ति सर्व त्याची ॥
फुकट अहंता करितों आपण ।
अवघी घडण तुझी देवा ॥
आजार पाजार नसे त्या गणती ।
ऐसी जन्मगति प्राणियांची ॥
दास म्हणे जेव्हां येई बोलावणें नसे हातीं

५०

वानुं किती उपकार ।
सांई वानुं किती उपकार ॥धृ. ॥
प्रथमारंभी दर्शन घेतां ।
केला अंगीकार ॥ सांई ॥
मी पापी अतिदीन दरिद्री ।
दिधला मजसी थार ॥सांई.॥
प्रेमां पाहुनि गहिंवर दाटे ।
तव सामर्थ्य अपार ॥सांई. ॥
नाम स्मरतां जळतिल पापें ।
होईल कुलोद्धार ॥

**या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.**


# श्री साईलीला – मे १९८८

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | | ४ |
| २ | साईबाबांचा भक्तांना आशीर्वाद | श्री. दि. रे. बाबरेकर | ६ |
| ३ | मी पाहिलेले साईबाबा – ५ | श्री. शंकर हरीभाऊ चौबळ | ८ |
| ४ | बाबांच्या कृपेने औषध व प्रसाद मिळाला | सौ. मंगला पाठक | १३ |
| ५ | जेथे साईज्योतीची प्रचिती.... | श्री. वि. म. हटवार | १५ |
| ६ | साईनाथांना वंदन करा | श्री. प्रशांत देवकर | १७ |
| ७ | साईच्या सहवासात | श्री. रामचंद्र घोडखांदे | १८ |
| ८ | मला तुमची काळजी आहे | सौ. उषा अधिकारी | २१ |
| ९ | महान संत श्रीसाईबाबा | श्री. अं. रा. सुर्वे | २४ |
| १० | धांव पाव गुरूराया | सौ. मंदा इनामदार | २५ |
| ११ | विज्ञानयुगातही अंतर्मुख करणारा | श्री. महेंद्र जोशी | २६ |
| १२ | श्री साईनाथ सुप्रभातम् | श्री. रंगामन्नी संपथ | २८ |
| १३ | ओम श्रीसाई सुखदायी | श्री. बा. ना. तळवाडकर | ३० |
| १४ | ज्याच्या मुखी साई | श्री. जयवंत कुलकर्णी | ३२ |
| १५ | उदात्त प्रेम देवाचे | सौ. रेखा पवार | ३३ |
| १६ | एक तुझा आधार | श्री. चकोर आजगावकर | ३५ |
| १७ | माझा साई | श्री. गणेश मोरे | ३५ |
| १८ | 'द' अक्षरातील उपदेश | श्री. बबन येरम | ३६ |
| १९ | अरे साई | सौ. नीता जाधव | ३७ |
| २० | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | साईनंद | ३९ |
| २१ | साई तुझे नाव | लीला गुजराथी | ४१ |
| २२ | टी. व्ही. एस. परत मिळाली | श्री. हरीश मुळे | ४२ |
| २३ | मला आलेला बाबांचा अनुभव | सौ. अनघा पेटकर | ४२ |
| २४ | कृपाळू साईबाबा | श्री. प्रशांत संन्याशिव | ४४ |
| २५ | माझ्या मागे साईबाबा | सौ. वैशाली गायकवाड | ४५ |
| २६ | श्रीसाई सहस्त्रनामावली | श्री. संजीव चंदने | ४७ |
| २७ | तुमचे साईविषयक सामान्य ज्ञान | श्री. सदानंद चेंदवणकर | ५० |
| २८ | असे होते साईबाबा | सौ. भावना जेऊरकर | ५१ |
| २९ | भोक्तृत्व सारे भोगिले पाहिजे | सौ. बिभावरी राणे | ५३ |
| ३० | श्री दत्तगुरूंची प्रवचने | श्री. भालचंद्रगंदे | ५४ |
| ३१ | आप्पासाहेब साईचरणी विलीन | — | ५६ |
| ३२ | दर्शन महती | श्री. केशव गोळवणकर | ५७ |
| ३३ | इति श्रीसाई उवाच | श्री. डी. जी. देशपांडे | ५८ |

## संपादकीय

# श्री बाबांना अंत:करणा-पासून हाक मारा



श्रीरामकृष्ण परमहंस यांना एका भक्ताने प्रश्न केला, 'भगवन्, आमचे मुख्य कर्तव्य कोणते बरे?''

रामकृष्ण म्हणाले, ''वत्सा, सदैव देवाशी संबंध जोडून राहावे, त्याचा विसर कधीही पडू देऊ नये, हेच आपले मुख्य कर्तव्य होय.''

आपल्यापुढे दोन मार्ग आहेत, एक कर्मयोग व दुसरा मनोयोग.

संसारी माणसे कर्मयोगाच्या द्वारे म्हणजेच त्याचे जे नियत कर्तव्य असेल ते मनापासून व इमाने इतबारे पाळण्याद्वारे तो योग साधीत असतात.

ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम या आपल्या जीवनाच्या चार प्रमुख पायऱ्या आहेत. काही ना काही उद्देश मनात बाळगून तो प्राप्त व्हावा म्हणून कर्म करायचे, हे उद्दिष्ट संन्यास दीक्षा घेतलेल्यांनी अजिबात टाळले पाहिजे. त्यांनी आपली रोजची कामे नियमित उरकावीत. परंतु त्याचे अमुक फळ मिळालेच पाहिजे, ही आकांक्षा सोडून दिली पाहिजे. संन्याशाने सर्व गोष्टींचा संन्यास घेतला पाहिजे त्याने सदैव "त्याच्या"सान्निध्यात रहाण्याचा, त्याचे स्मरण करण्याच्या वृत्तीत राहिले पाहिजे. माझे पोट कसे भरेल, मी कुठे राहीन याची चिंता सोडून दिली पाहिजे. माधुकरी हेच त्याचे पोटाचे साधन. जागा मिळेल तिथे पडायचे, कशांचाही लोभ बाळगायचा नाही, तीर्थयात्रा, नामजप, पुजाअर्चा हेच त्याचे सर्वस्व असावे.

तुमच्या वाट्याला कोणतेही कामधाम आलेले असू द्यात, हलके असो, ज्येष्ठ-श्रेष्ठ जबाबदारीचे असो. ते जास्तीत जास्त प्रामाणिकपणे करीत असताना त्याच्या फळाबद्दल तुम्ही निश्चिंत असले पाहिजे. फळ देवाच्या हातात. त्याची विवंचना तुम्ही नाही करायची. देव काय करायचे ते करील. तुम्ही फळाची अपेक्षा न करता आपल्या हातातील काम पार पाडण्यासाठी मनापासून झटत रहायचे.

दुसरा एक मार्ग सांगितलेला आहे. कोणता? मनोयोग ही एक मोठी साधना आहे. त्या साधनेत जो कुणी गुंतलेला असतो, त्याच्या हालचालीची बाहेर काहीएक चिन्हे दिसत नाहीत. त्याने मानसिक दृष्ट्या देवाशी आपले संधान बांधलेले असते. शुकदेव यांनी तोच मार्ग स्वीकारलेला होता. अशी आणखीन पुष्कळ उदाहरणे कथन करता येतील त्यांनी आपल्या स्वत:च्या जीवितासंबंधी काळजी अक्षरश: सोडलेली असते. त्यांचे आपल्या स्वत:च्या देहाकडे लक्षच नसते. केस वाढताहेत; दाढी वाढत चाललेली आहे. आपल्या स्वत:च्या बाह्यांगाकडे त्याचे लक्षच नसते.

एखादा साधक पायरी पायरीने जेव्हा परमहंस पदापर्यंत पोहोचतो, तेव्हा त्याला

कशाचीही शुद्धी राहात नाही. सारे काही गळून पडते. त्याच्यापुढे एकच एक गोष्ट असते ते म्हणजे त्याचे आराध्य दैवत. त्याच्यावरच त्याचे सारे लक्ष खिळून गेलेले असते. केंद्रीभूत असते. मनाने तो देवाशी एकरुप झालेला असतो. तो स्वत:साठी काहीही करीत नाही. काही केलेच तर दुसऱ्यांना मार्गदर्शन.

कर्माच्या द्वारे भक्त ईश्वराशी एकरुप होऊ शकतो, किंवा मनाच्याद्वारे तो त्याच्या सान्निध्यात सदैव राहू शकतो. भक्ती ही अजब अमृतवल्ली आहे. तिच्यामुळे तुमच्या अंत:करणात प्रकाशाचा प्रवेश होऊ शकतो.

भक्तीचा पारा जसजसा चढत जाईल, तसतसे तुम्ही सुखासन्निध जाऊ शकाल. मनाची जेव्हा संपूर्णपणे एकाग्रता होते, तेव्हा असीम शांततेचा भक्ताला अनुभव येऊ लागतो. आपल्या श्वासोच्छवासावर परिणाम घडून येतो. सर्वत्र शांत शांत भासू लागते. बुद्धि प्रगल्भ होते. त्या बुद्धीला सूक्ष्म धार येते. तिच्याद्वारे आरपारचे सर्व काही दिसू लागते.

पण... पण... त्याच्या वाट्याला हे सामर्थ्य येते, त्याची त्याला काहीच जाणीव नसते.

तेव्हा भक्ती योगाच्याद्वारे माणसाला सर्व काही साध्य करुन घेता येते. त्याची जो कास धरील, तो तरला म्हणून समजावे.

भगवान रामकृष्ण परमहंस पुढे स्वानुभव सांगताना म्हणतात, "मी जगन्मातेपुढे तिच्या भेटीसाठी रडरड रडलो आहे. अगदी ओक्साबोक्शी रडलो आहे." मी म्हणत असे की, "हे माते, जे तुझे रुप योग्यांना आकलन करता आले, ते मला आकलन करता येऊ देत. मला अगदी कडकडून मिठी मारुन तुला भेटू देत एकदा." माझे ते अंत:करणापासून बाहेर पडलेले आक्रंदन ऐकून जगन्मातेला मला भेटल्याशिवाय रहावले नाही.

जो भक्त अगदी अंत:करणापासून मातेला, आपल्या इच्छित दैवताला हाक मारतो, त्याच्या हाकेला ती माता किंवा त्याचा तो देव "ओ" दिल्याशिवाय राहात नाही. ती माता किंवा देव, त्याला म्हणजे भक्ताला भेटण्यासाठी त्वरीत धावत लगबगीने येतो.

जगन्माता माझ्या हाकेसरशी मला येऊन भेटली आणि तिने माझी सारी कोडी सोडविली. वेद, शास्त्रे, पुराणे, तंत्र, मंत्र इत्यादी सारे सारे काही तिने मला उलगडून दाखविले, सांगितले. थोडक्यात माझ्या सर्व शंकांचे निरसन केले.

श्री साईप्रेमींनो, साईभक्तांनो, श्रीरामकृष्ण परमहंसांनी सांगितलेला हा स्वानुभव प्रत्येकाने आपल्या अंत:करणावर कायमचा कोरुन ठेवाला पाहिजे. इतकेच नव्हे, तर तो आचरणात आणण्यासाठी प्रत्येकाने मनापासून झटले पाहिजे. त्यांतच जीवनसाफल्य आहे. हा जीवनसाफल्याचा महामंत्र आहे. संत चूडामणि भगवान श्रीसाईनाथ महाराजांनी हाच मंत्र तुम्हा आम्हा सर्व भक्तांना परोपरीने जीवनभर सांगितला. पण ज्यांनी त्याचे आचरण केले, ते तरले. तेव्हा त्याप्रमाणे त्याच मार्गाने जाण्याची बुद्धी साईकृपेने तुम्हां-आम्हां सर्वांना होवो, हीच साईचरणी प्रार्थना.

— जय श्री साईराम

# साईबाबांचा भक्तांना आशीर्वाद !

– श्री. दि. रे. बाबरेकर
बी. ए, एल. एल. बी. (हिन्दी साहित्यरत्न)
बी-३३४/३, सरकारी कर्मचारी वसाहत,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

साईबाबांनी आपल्या भक्तांवर खूप प्रेम केले आहे व आजही करीत आहेत. त्यांच्या भक्तांना प्रत्यक्ष किंवा अनुभवाद्वारे यासंबंधीची जाणीव होत असते. त्यांनी आपल्या अनेक भक्तांना वेळ प्रसंगी ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन घडवून दिले आहे. बाबांना त्यांच्या भक्तांच्या अडचणींची पूर्ण व पूर्व कल्पना असते व त्यांच्या अडचणी सोडवीत असतात बाबा हयात असताना अधूनमधून आपल्या भक्तांवर रागवत असत व त्या आवेशात काहीही बोलत असत. त्यांचा हा क्रोध मात्र क्षणिक असे. ज्या भक्तांवर ते रागवत, त्यांच्यावर त्यांची विशेष कृपादृष्टी असे. साईबाबांनी निरनिराळ्या प्रसंगी आपल्या भक्तांना अनेक प्रकारचे उपदेश दिले आहेत. त्यांत "श्रद्धा आणि सबुरी" हा उपदेश फारच महत्वाचा व उपयोगी ठरला आहे. श्रद्धा म्हणजे केवळ विश्वास नव्हे. दररोजच्या जीवनात तर आपणास अनेक व्यक्तींवर विश्वास ठेवणे भाग असते. शुद्ध व पवित्र अंतःकरणाने ठेवलेल्या अढळ व निश्चल विश्वासाची परिपक्व अवस्था म्हणजेच श्रद्धा! अंतःकरण शुद्ध, निर्मळ आणि पवित्र करायचे, म्हणजे नेमके काय करायचे, असा प्रश्न अनेकांना निर्माण होणे साहजिकच आहे. सर्वप्रथम अंतःकरण शुद्ध करण्याकरिता काम, क्रोध, मद, मत्सर हे विकार टाळून आपल्या अंतःकरणास त्यापासून पूर्णपणे अलिप्त ठेवावे. मद, मत्सर, क्रोध हे विकार अभ्यासाने व सहनशीलतेने अल्पकाळातच टाळणे शक्य होवू शकेल. परंतु काम हा विकार सर्वसाधारण व्यक्तिस सहज सुलभतेने टाळणे शक्य नाही. मात्र त्याबाबत काही अंशी मर्यादित धोरण बाळगणे शक्य होईल.

अंतःकरण शुद्ध व पवित्र झाले, म्हणजे मानवाला स्वतःच्या हृदयात परमेश्वराचे वास्तव्य असल्याची अनुभूति होते. त्यामुळे आत्मशक्ति वाढते आणि अंतःस्फूर्ति वृद्धिंगत होते. तसेच मानवाकडून चुका अगर गुन्हे घडत नाहीत. उलट सत्कर्मे घडत राहतात. व त्यामुळे पुण्याचा साठा वाढत जातो. आपण नेहमी म्हणत असतो की, लहान मुले देवाची रूपे असतात व लहान मुलांत १० टक्के तरी ईश्वरी अंश असतो. लहान मुलांत स्वार्थ भावना नसल्याने त्यांच्याकडून जाणूनबुजून वाईट कृत्ये अगर पाप कर्मे घडण्याची शक्यता नसते. आणि म्हणून परमेश्वराचे वास्तव्य त्यांच्या हृदयात काही अंशी असते. शुद्ध व पवित्र अंतःकरणाची स्थिती म्हणजे मानवाच्या शरीरात असलेला आत्मा भावनारहित स्थितीत आणणे. अशा अवस्थेत आत्मा सुखी व आनंदी असतो. मानव दुःख, कष्ट व त्रास भोगत असेल, तर त्याचा आत्माही दुःखी असतो. त्याकरिता मानवाने नेहमी अशा भावना बाळगाव्यात की, आपण दुःखी नाही

आणि आपणास काही कष्ट अगर त्रास नाही. इतरांपेक्षा आपण सुखी व आनंदी आहोत. दु:खी व कष्टी आत्म्यामध्ये शुद्ध व पवित्र अंत:करण निर्माण करण्याची क्षमता नसते. वर नमूद केल्याप्रमाणे आत्मा जेव्हा भावनारहित अवस्थेत येतो, त्यावेळेस तशी कार्यक्षमता त्यात निर्माण होते. परंतु शक्यता व पवित्रता कायम टिकवून ठेवणे, ही महत्वाची बाब आहे. लहान मुलांच्या उलट मानवात स्वार्थभावना वयोमानाप्रमाणे प्रबळ होत जातात व तो माया, मोह, काम, क्रोध, मद, मत्सर या सर्व विकारात गुरफटला जातो. त्यामुळे त्याचा आत्मा दु:खी होतो व अशा परिस्थितीमध्ये तो शुद्ध व पवित्र अंत:करणाची स्थिती निर्माण करण्यास असमर्थ असतो.

आत्मा हा अमर असतो. त्याच्या स्थितीप्रमाणे तो सप्तलोकांपैकी एका लोकात वास करीत असतो. शक्यतो तो मानवी शरीरात प्रवेश करण्याचे टाळून, आहे त्याच अवस्थेत राहण्यास उत्सुक असतो. परंतु काही आत्मे मृत व्यक्तिंच्या महत्वाच्या अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याकरिता पुन्हा जन्म घेतात. आत्मा इंद्रिय रहित असल्यामुळे तो कुठलेच कार्य प्रत्यक्ष करू शकत नाही अगर सुख भोगू शकत नाही. तो मानवी इंद्रियांद्वारे सर्व कामे करतो व सुखाचा अनुभव घेतो.

आता सबुरी म्हणजे काय? सबुरी म्हणजे कुठल्याही कार्याचे निकाल यश अगर फळाची वाट बघत बसणे नव्हे, तर सबुरी ही भावनांची एक अशी अवस्था आहे की, त्या अवस्थेनुसार मानवाने केलेल्या कार्याच्या फळाची आशा, अपेक्षा विसरून जाणे. कोणत्याही कार्याच्या फळाची नियोजित कालमर्यादेपर्यंत अगर त्याहून थोडा अधिक काळ शांततेने वाट बघणे आवश्यक असते. तसे न केल्यास घाईगर्दीत चुकीचे निर्णय घेतले जावून परिणामी उलटसुलट कार्ये घडत राहतील व त्यामुळे दु:ख, कष्ट व त्रास भोगणे भाग पडेल!


कोणतेही कार्य कितीही योग्य रितीने अगर प्राविण्याने केले असले तरी यशाकरिता शेवटी नशिबाची साथ, म्हणजेच परमेश्वराची कृपा! इच्छा ही आवश्यक असतेच. परमेश्वर सहजा सहजी कृपा करील, अशी आशा बाळगणे योग्य ठरणार नाही. परमेश्वर कृपा करण्या अगोदर भक्ताची परीक्षा घेवून व त्याच्या पापपुण्याच्या साठ्याप्रमाणे निर्णय घेत असतो. त्याकरिता काही अवधी लागणे साहजिकच असते, आणि तेवढ्या काळापर्यंत शांततेने वाट बघणे म्हणजेच सबुरी होय! तशी सबुरी न बाळगता मानव बेचैन अगर अस्वस्थ होत राहिला तर त्यास दु:ख, कष्ट व त्रास तर होईलच शिवाय त्यात 'सबुरी'ची क्षमता प्राप्त झाली नसल्याचेही आढळून येईल.

ज्यांनी ज्यांनी **साईबाबांचा** 'श्रद्धा व सबुरी' उपदेश अंगी बाणवला, त्यांना त्यांना बाबांनी आशीर्वाद दिला व मनोरथ पूर्ण केले व त्याबाबत कित्येक चमत्कारही घडविले आहेत.

माझ्या आठवणीतून –

# मी पाहिलेले साईबाबा – ५

– श्री. शंकर हरीभाऊ चौबळ
मधुकुंज को-ऑ. हा. सोसायटी,
फ्लॅट नं. १०२, दाऊदबाग,
जयप्रकाश रोड,
अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५८.



माझ्या वडिलांचा श्रीबाबांशी इ. स. १९११ साली संबंध आला. प्रथम भेटीतच वडिलांना बाबांच्या साक्षात्काराचा अनुभव आला. नंतर नंतर ते बाबांच्या दर्शनाला पुनःपुन्हा जाऊ लागले व बाबांचे निःस्सीम भक्त झाले. पुढे पुढे त्यांना बाबांबद्दल इतकी ओढ लागली की, बाबांच्या सहवासाचा, सान्निध्याचा, दर्शनाचा रोज लाभ व्हावा, म्हणून त्यांनी इ. स. १९१४ साली शिर्डीसच बिऱ्हाड केले. तेथे ते ४ महिने राहिले. बाबांवरील प्रेमामुळे त्यांनी शिर्डीस पुन्हा इ. स. १९१७ साली बिऱ्हाड केले. त्यांच्या ह्या शिर्डीतल्या वास्तव्यामुळे आम्हा कुटुंबातील सर्व मुलांना बाबांच्या दर्शनाचा व सान्निध्याचा लाभ झाला. आम्ही तीन भावांत मी सर्वांत लहान होतो. त्यावेळेस माझे वय सुमारे ७ वर्षाचे असेल.

आम्ही बाबांच्या द्वारकामाईच्या जवळच रहात होतो. त्यावेळेस शिर्डीचा प्रवास हल्लीसारखा सुखकर नव्हता. वाहन म्हणून घोड्याचा टांगा किंवा वर छप्पर असलेली किंवा नसलेली बैलगाडी असे.

मी ज्यावेळेस बाबांना पाहिले, त्यावेळेस बाबांचे वय ७६/७७ वर्षे असावे, असे मला वाटते. बाबांचे बसणे, उठणे, राहणे, झोपणे बहुतेक द्वारकामाईत होते. बाबा द्वारकामाईत कठड्याजवळ लोडाला टेकून, पाय लांब करून व डावा हात कठड्यावर

ठेवून धुनीसमोर बसत असत. बाबा रंगाने गोरेपान होते. उंचीने सहा फूट असावेत, असे वाटते. त्यांच्या अंगात पायघोळ पांढऱ्या रंगाची कफनी असे. डोक्याला पांढरा फडका गुंडाळलेला असे. डोक्याच्या मागच्या बाजूला फडक्याची पीळ घातलेली गाठ असायची. कफनीला उजव्या बाजूला एक फूट - सव्वा फूट लांब खिसा असायचा. कपाळाला गंध (चंदन) लावलेले असायचे. त्यांचा काळा सटका जवळच असायचा. त्यांचे बोलणे अत्यंत गोड व स्मित असे. त्यांची भाषा रांगडी असे. परंतु ते हिंदी व उर्दू उत्तम बोलत असत. बाबांच्या दरबारात जसे विद्वान, श्रीमंत राजेरजवाडे येत, तसेच गरीब, भिकारी ही येत असत. बाबांचा दरबार सर्वांना खुला असे. बाबांच्या दरबारात कुणालाच मज्जाव नव्हता. बाबा सर्वांशीच प्रेमाने वागत. बाबांच्या आश्रयाला रोगी, वैरागी, आणि रक्तपित्तीही येऊन रहात. बाबांची द्वारकामाई पिडीत व गरजू लोकांचे माहेरघर असायचे.

हल्ली द्वारकामाईच्या ओट्यावरील भाग, लोखंडाचे गज घालून व दरवाजा ठेवून बंद करण्याची व्यवस्था केली आहे. धुनीही तशीच गज घालून बंद केली आहे. त्यावेळेस हे दोन्हीही भाग मोकळे होते. त्याचप्रमाणे द्वारकामाईच्या पुढे असलेल्या खुल्या पटांगणात उजव्या बाजूला खाली लोखंडाचा कठडा सुमारे ४.००" ते ४.०३" उंचीचा असावा, असे वाटते. आता तेथे कुंपण जाऊन चूना विटांची भिंत उभारली असून त्यावर लोखंडाचे गज लावलेले आहेत.

बाबा ज्या कठड्यावर हात ठेवून बसत असत, त्या कठड्यापासून पूर्वेस सुमारे ४/४/५ फूटावर ओट्याच्या धारेजवळ एक मोठा चौकोनी दगड होता. त्या दगडावर बसून बाबा दुपारी दोन अडीचच्या सुमारास स्नान करीत असत. स्नान करताना ते लंगोटी नेसत. अशा प्रसंगी द्वारकामाई बहुतेक एक-दोन व्यक्ती सोडून निर्मनुष्य असे. अशा वेळी अनेकदा मला बाबांच्या उघड्या गोऱ्यापान देहाचे दर्शन होत असे. बाबांच्या मांड्या एखाद्या मल्लासारख्या मजबूत दिसत असत. शरीर सुदृढ दिसे. ह्या वयातही बाबांचा चेहरा इतका मोहक होता की, त्यांना पाहिल्याबरोबर नास्तिक मनुष्यही त्यांच्याकडे नकळत आकर्षिला जाई. बाबांजवळ (आगपेटीच्या काड्यांसारख्या) काड्यांचा संग्रह असे. तसेच भिंतींच्या कोनाड्यात चिलमींचा मोठा साठा असे. द्वारकामाईच्या तक्त पोशीला काचेच्या हंड्या लावून, त्यात मेणबत्त्या घालून त्या पेटवून द्वारकामाई प्रकाशित केली जाई.

श्री साई सत् चरिताची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्यामध्ये बाबांच्या भिक्षेचा एक फोटो आहे. बाबा तसेच दिसत असत, असे मला आठवते. बाबांची काकड आरती भल्या पहाटेस व्हायची. पूजा बहुतेक बापूसाहेब जोग करीत. बापूसाहेब जोग उंच व रंगाने गोरेपान होते. ते पूजा करताना जांभळ्या रंगाचे (सोवळे) रेशमी वस्त्र परिधान करीत. बाबा एक दिवसाआड वाजतगाजत चावडीत रात्रीस जात व तेथे आरती झाल्यावर चावडीचे दरवाजे बंद करून पांढऱ्या शुभ्र चादरी अंथरून त्यावर झोपत असत. दुसऱ्या दिवशी पहाटेस चारच्या सुमारास भक्तमंडळी बाबांची काकडआरती

करण्यास व बाबांना परत वाजतगाजत द्वारकामाईत नेण्यास जमत असत. अशावेळी बाबा कधीकधी नृसिंह अवतार धारण करीत व आपल्या लाडक्या भक्तांना सटक्याचा प्रसाद देत असत. अशा प्रकारचा प्रसाद मिळालेल्या भक्तांमध्ये सर्वश्री म्हाळसापती, तात्या कोते (पाटील), काकासाहेब दिक्षित, बापूसाहेब बुटी, बापूसाहेब जोग, अण्णासाहेब दाभोलकर इत्यादी मंडळींचा समावेश असे. द्वारकामाईत आल्यावर भक्तमंडळी प्रसाद घेऊन व बाबांना नमस्कार करून आपापल्या मुक्कामी जात. नंतर बाबा प्रात:विधी उरकण्याकरिता लेंडी बागेवर जात व तेथून परतल्यानंतर ते भिक्षेला जात. भिक्षेवरून परत आल्यानंतर द्वारकामाईत भक्तमंडळी जमत व भक्तांची बाबांबरोबर थोडी बातचित होऊन व बाबांचा आशीर्वाद वगैरे घेतल्यानंतर दुपारी १२-०० ते १२-३० च्या सुमारास बाबांची दुपारची आरती होत असे. आरती झाल्यानंतर भक्त मंडळी बाबांना नमस्कार करून व प्रसाद घेऊन पुन्हा आपापल्या मुक्कामास जेवण्याकरिता व विश्रांती घेण्यास जात.

सकाळप्रमाणे दुपारी चारनंतरही बाबांचा दरबार भरत असे. भक्तांना शिर्डी सोडण्यापूर्वी बाबांची परवानगी घ्यावी लागे. बाबांनी परवानगी दिली की, बाबा स्वत: भक्तांना आपल्या हाताने उदीचा प्रसाद देत असत. एकदा शिर्डी सोडण्यास परवानगी दिली की, त्या भक्तांना शिर्डीस रहाता येत नसे.

त्यावेळेस एक २५/३० वर्षाची अनाथ विधवा बाई शिर्डीस येऊन बाबांच्या आश्रयास राहिली होती. तिला आम्ही "बाबांची आई" असे म्हणत असू. तिचे नाव राधाकृष्णामाई असे होते. ती रंगाने गौरवर्णाची होती. तिचे कपाळ गोंदलेले होते. ती शुभ्र पांढरी ५ वारी साडी परिधान करीत असे. ती अनाथ असल्यामुळे बाबांनी तिच्या राहाण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्था केली व तिला आईचे प्रेम दिले. तिचे शिर्डीत नवे आयुष्य सुरू झाले. तिला बाबा "राधाकृष्णी" म्हणत. त्या द्वारकामाईत कधीही येत नसत. द्वारकामाईजवळ ज्या घरात श्री अब्दुल्ला बाबा रहात असत, त्या घरात, अब्दुल्ला बाबा राहावयास येण्यापूर्वी, ती राहात असे. राधाकृष्णामाई बाबांच्या द्वारकामाईच्या द्वारापासून चावडीपर्यंतचा रस्ता रोज स्वत: झाडून स्वच्छ करीत असे. हा रस्ता बाबांच्या पादस्पर्शाने अगोदरच पूनीत झालेला होता. बाबांच्या वारंवार जाण्यायेण्याने ह्या रस्त्यावरच्या मातीचा कण नि कण पवित्र झाला होता. त्यामुळे रस्ता झाडीत असताना जे पवित्र झालेले धुळीचे रजोकण तिच्या अंगावर उडत होते, त्यामुळे तिच्या मनावरील मलिनताही नाहीशी होऊन तिचे मन दिवसेंदिवस शुद्ध व पवित्र होत गेले. तिच्या आचार-विचारांत आता अमुलाग्र बदल होत गेला. तिच्या आयुष्याला सत् विचारांची गती मिळाली. अहिल्या जशी रामाच्या पादस्पर्शाने उद्धरून गेली, कान्होपात्रा जशी श्री पांडुरंगाच्या चरणी लागल्यावर मुक्त झाली, तशी राधाकृष्णामाई बाबांच्या चरणी शरण आल्यामुळे निष्पाप होऊन पावन झाली. हा साईमहिमा आहे. तिचे आयुष्य आता सद्‌गुरू सेवेत जाऊ लागले. बाबांकडे आलेला प्रसाद भक्तमंडळींना वाटण्याकरिता राधाकृष्णा आईकडे येत असे. आमचे वास्तव्य शिर्डीत असेपर्यंत आई आमच्याकरिता प्रसाद राखून ठेवायची. आईने आम्हा लहान

मुलांना बाबांच्या चावडीच्या भिंतीला लागून असलेला एक मातीचा ढीग उपसण्याचे काम सांगितले होते. ते आम्ही सर्व मुले नित्यनेमाने करीत असू. आईकडे दुसरीही कामे असत, परंतु त्याची काही मला जाण नाही.

आमचे वास्तव्य शिर्डीत असेपर्यंत बाबा रोज आमच्या घरी भिक्षेला येत असत. आम्ही त्यावेळी राधाकृष्णा आईच्या घराच्या मागच्या बाजूस एका मोठ्या घरात राहत होतो. बाबांची काकड आरती झाली की, माझी आई घरी येई व स्नान करून बाबांकरिता रोज झुणकाभाकरी तयार करायची. बाबा आमच्या येथे भिक्षेकरिता आले असताना आम्हा भावाभावांमध्ये बाबांना भिक्षा घालण्याकरिता अहमहमिका लागायची. मग आम्ही एकेक दिवस आळीपाळीने बाबांना भिक्षा घालीत असू. एकदा काय घडले, बाबांनी आपल्या टमरेलातील थोडेसे पाणी ओट्यावर टाकले व विनोद करून, हाताने त्या पाण्याची रेघ माझ्याकडे आणत बाबा मला म्हणाले, "भाऊ, पळ, पळ, नदी आली." मला काय वाटले कोणास ठाऊक, पण मी ओट्यावरून खाली धावत जाऊन बाबांना बिलगलो.

भिक्षा मागून आणलेले अन्न बाबा द्वारकामाईत आल्यानंतर एका कोळंब्यात टाकायचे. त्यातील काही अन्न गरीब माणसे रोज घेऊन जायची. परंतु बाबांनी कोणालाच कधी हटकले नाही. माणसांना काय, पशुपक्षांनाही त्या कोळंब्यातील अन्नाचा वाटा मिळायचा. गावातील भिक्षा मागून झाल्यानंतर बाबा द्वारकामाईतच बसत. मी स्वत: बाबा भिक्षा मागून द्वारकामाईत परत येण्यापूर्वीच द्वारकामाईत जात असे व बाबांना धुनीसमोर कठड्याजवळ बसलेले पाहून कठड्याजवळ जाऊन उभा राहायचा. उद्देश हा की, बाबांनी काहीतरी प्रसाद द्यावा, बाबा मला "भाऊ" या नावाने हाक मारीत. कठड्याजवळ जाऊन उभे राहिल्यावर बाबांनी मला कठड्यावरून उचलून घ्यावे, थोडा वेळ मांडीवर बसवावे, माझे नाक साफ करावे व थोडे लाड करून व तोंडात प्रसाद घालून, "जा भाऊ, आता खेळायला जा" असे म्हणावे. एकदा असा प्रसंग घडला की, बाबांनी माझे लाड करून व नाक साफ करून मला प्रसाद दिला. प्रसाद घेऊन मी द्वारकामाईच्या खाली उतरल्यावर श्री. माधवराव देशपांडे (बाबांचा शामा) यांनी मला हाक मारली व खड्या आवाजाने म्हटले, "मुला इकडे ये". त्याप्रमाणे मी त्यांच्याजवळ जाऊन उभा राहिलो. जवळ जाऊन उभा राहिल्यावर ते म्हणाले, "तू फार घाणेरडा आहेस, तू बाबांजवळ गेलास म्हणजे बाबांना तुझे नाक साफ करावे लागते. तरी तू यापुढे बाबांजवळ येत जाऊ नकोस". हे त्यांचे बोलणे ऐकून मी फार घाबरलो व दुसऱ्या दिवशी नित्यनियमाप्रमाणे द्वारकामाईत गेलो, परंतु बाबांच्याजवळ जाण्याची तीव्र इच्छा असूनही मी बाबांपासून दूर खालीच उभा राहिलो. मी बाबांकडे रोजच्याप्रमाणे न गेल्यामुळे बाबांनी मला एका भक्ताकडून बोलावणे पाठविले. परंतु तेथे जवळच श्री. माधवराव देशपांडे उभे असल्यामुळे मी बाबांच्याजवळ जाण्याचे टाळले. मला बोलावयास आलेला इसम परत गेला. तेव्हा बाबांनी त्याला परत माझ्याकडे पाठविले व तो येऊन मला उचलून बाबांजवळ घेऊन गेला. बाबांजवळ गेल्यावर बाबांनी मला उचलून घेतले, मांडीवर बसविले आणि

विचारले, ''का भाऊ, आजू तू माझ्यावर रागावलास का? आज तू माझ्यापासून लांब दूरदूर का पळतोस? हे बाबांचे प्रेमळ शब्द ऐकून मी बाबांस भीतभीत सांगितले की, ''बाबा, तो म्हातारा आहे ना, तो मला काल म्हणाला, ए मुला, तू फार घाणेरडा आहेस. तू बाबांजवळ येतोस आणि बाबांना तुझे नाक साफ करावे लागते, तरी तू यापुढे बाबांजवळ येत जाऊ नकोस''. म्हणून मी भीतीने येण्याचे टाळले. श्री. माधवराव देशपांडे जवळच होते. त्यांना उद्देशून बाबा म्हणाले, ''अरे शामा, तू जसा माझा मुलगा आहेस तसा भाऊही माझा आहे. माझ्या मुलांचे मी करणार नाही तर कोण करणार? माझी मुले माझ्याजवळ येणारच. नको, त्याला असा रागावू नकोस.'' अर्थात त्या दिवसापासून मीही बाबांजवळ मन मानेल तसे रोज जाऊ लागलो व देशपांडेही त्यानंतर मला काही बोलले नाहीत.

दुसरा एक प्रसंग. मी दुपारची आरती सुरू होण्यापूर्वी सभामंडपाच्या कडेस असलेल्या कठड्यावर चढलो होतो. बाबांनी हे पाहिल्याबरोबर ते म्हणाले, ''अरे तो पोरगा कठड्यावरून पडेल, त्याला खाली उतरवा व नंतर आरती सुरू करा.'' त्याप्रमाणे कुणीतरी मला कठड्यावरून खाली उतरविले व नंतर आरती सुरू झाली.

बाबा कधी कधी द्वारकामाईच्या पूर्व बाजूला दरवाजाजवळ असलेल्या दगडावर बसत असत. असेच बाबा दगडावर बसले असताना, एकदा माझे आजोबा मला बरोबर घेऊन दुपारी दोनच्या सुमारास द्वारकामाईत गेले. बाबा म्हणाले, ''काय आजोबा, इतक्या निम्राचे कोठे निघालात? धूप फार पडलेला आहे.'' आम्ही दोघांनी बाबांना नमस्कार केला व नंतर आजोबांनी आपली व्यथा बाबांना सांगितली. आजोबा म्हणाले, ''बाबा, माझी मुलगी लग्न होऊन १८ वर्षे झाली, परंतु सासरी जात नाही. तिचे पुढे कसे होईल.'' बाबा म्हणाले, ''आजोबा, काय काळजी करू नका, ती चार महिन्यांनी आपणच जाईल''. बाबांचे शब्द तंतोतंत खरे ठरले. ती स्वतः होऊन सासरी गेली.

आमचा येथील मुक्काम कोजागिरी पौर्णिमेपर्यंत असल्यामुळे आम्हाला येथील त्यावेळेचा दसऱ्याचा उत्सव पहावयास मिळाला. त्यावेळेस गावातील लोक बैलांना सजवून आपल्याबरोबर घेऊन सिमोल्लंघनाला जात असत. बाबासुद्धा त्यांच्याबरोबर खंडोबाच्या देवळापर्यंत जात असत.

बाबांकडे आंबे, पेरू, केळी इत्यादी बराच प्रसाद यायचा. बाबा भक्तांना स्वतः प्रसाद वाटीत. आंबे वाटताना, ते प्रथम आंबा दाबून मऊ करीत व मग ज्या भक्ताला द्यावयाचा त्याच्याकडे फेकीत. असा फेकलेला आंबा बरोबर त्या भक्ताच्या हातात पडायचा.

त्यावेळेस श्री. उपासनी बाबा खंडोबाच्या देवळात राहात असत. त्यांना मी व माझा शांताराम नावाचा मोठा भाऊ होता, तो रोज दूध नेऊन देत असू.

इ. स. १९१७ सालच्या कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी बाबांच्या मशिदीत उत्सव साजरा झालेला मला आठवतो. त्या दिवशी मशिदीच्या सभामंडपात एक फोनोग्राफ

लावला होता व भक्तमंडळी आनंद साजरा करीत होती. त्या दिवशी गावात आलेला सर्कशीतला हत्ती सर्कशीच्या मालकाने बाबांच्या दर्शनाला आणला होता. बाबा द्वारकामाईत भक्तांबरोबर बोलत बसलेले होते.

बयाजी पाटील या नावाचा एक बाबांचा निस्सीम भक्त होता. तो अंगाने सुदृढ व बळकट होता. तो प्रसंगी बाबांना उचलून ह्या जागेवरून त्या जागेवर नेत असे.

श्री साईचे प्रत्यक्ष दर्शन व त्यांनी मला दिलेले प्रेम, हीच माझ्या या आयुष्यातील कमाई. इ. स. १९१७ सालानंतर बाबांच्या हयातीत पुन्हा शिर्डीस जाण्याचा योग मला आला नाही. अर्थात शिर्डीस मी आजपर्यंत अनेकवेळा जाऊन आलो आहे. बरेच दिवस राहिलो आहे व अजूनही जात आहे.

ज्या आईवडिलांच्या पुण्याईने व भाग्याने मला बाबांच्या दर्शनाचा, सहवासाचा व सेवेचा लाभ मिळाला, त्यांचे पुण्यस्मरण करून मी हा लेख पूर्ण करतो.

**अनुभव—१**

# बाबांच्या कृपेने औषध व प्रसाद मिळाला!

**— सौ. मंगला पाठक,**
१७६ कछियाना, पुर्णेंद्रभवन,
जबलपूर.

हा अनुभव माझा स्वतःचाच आहे. ह्या घटनेला ७, ८ वर्षे झाली, पण अजूनही ह्या गोष्टीची आठवण मनात ठसली आहे.

आम्ही नोकरीमुळे जबलपूरला असतो. त्यावेळी माझे वडील शिरडीस होते. म्हणजे माहेर अर्थात शिरडीच होते. नुकतेच लग्न होऊन ३, ४ महिने झाले होते. माझ्या मिस्टरांना कांही दिवसानी मूळव्याधीचा त्रास होऊ लागला. आमच्या गावाजवळ एके ठिकाणी त्यावर औषध मिळते हे मला माहित असल्याने मी वडिलांना ताबडतोब पत्राने औषध पाठविण्याविषयी कळविले. जवळ जवळ १५ दिवसांनी बहिणीचे पत्र मला मिळाले. पण त्यांत औषधाचा काहीच उल्लेख नाही. ते पाहून मी जरा नाराजच झाले. कारण मी वाट पहात होते औषधाची. नंतर दुसरेच दिवशी श्री. टोळ नावाचे गृहस्थ जे जबलपूरला असतात. ते आपल्या पत्नी व मुलीसह आमचा पत्ता विचारीत आमचे घरी आले. त्यावेळी पुरुष मंडळीही घरीच होती. त्यामुळे त्यांची सर्वांशीच ओळख झाली व त्यांनी 'मी शिरडीहून आलोय. शिरडीचे गवई, पुजारी ग. वि. जोशी ह्यांनी हा प्रसाद दिलाय. असे म्हणून त्यांनी माझ्या जवळ शिरडीहून वडिलांनी माझ्यासाठी पाठविलेली पिशवी दिली. नंतर त्यांनी वडिलांची व त्यांची ओळख कशी झाली व स्वतःबद्दल सर्व माहिती सांगितली. व हेही सांगितले की, "ह्या वस्तु तुम्हांला ८-१० दिवसांनीच माझ्याकडून मिळाल्या असत्या, पण ह्या भागात आमचे ओळखीचे राहतात. त्यांचेकडे आम्हांला आजच जेवावयाचे आमंत्रण असल्याने आमचे इकडे येणे झाले व तुमच्या वस्तू पोहोचविता आल्या." त्यांचे यथोचित स्वागत करून व आम्हा उभयतांना घरी येण्याचे निमंत्रण देऊन ते गृहस्थ

निघून गेले. आम्हां सर्वांना फारच आश्चर्य वाटले. पिशवीतील सामान काढून पाहिले तर त्यांत उदी, प्रसाद व ह्यांच्यासाठी पाठविलेली औषधाची पुडी. काय म्हणावे ह्या बाबांच्या लीलेला. आदल्या दिवशीच्या पत्रात तर औषधाचा काहीच उल्लेख नाही व दुसऱ्या दिवशी घरी औषध हजर व तेही सोबत बहिणीचे पत्र आलेले. ह्यावरून "जे जे इच्छा भक्त करिती, ते साईनाथ पुरविती"! ही उक्ती योग्यच वाटते.

+++

अनुभव – २

## खुशाली कळविली!

हा अनुभवही मलाच आलेला आहे. ६–७ वर्षांपूर्वीचा हा अनुभव आहे. त्यावेळी माहेर शिरडीच होते.

जवळ जवळ १ महिना झाला तरी वडिलांचे पत्र नाही म्हणून मी सारखी काळजीत असे. त्यामुळे कशातच मन लागत नव्हते. मन अगदी बेचैन होते. अशातच एके दिवशी पहाटे मला स्वप्न पडले. त्यात श्री. आजेगांवकर बुवा माझ्या स्वप्नात आले. त्यांचा नेहमीचा प्रवासातला पेहराव म्हणजे डोक्याला पांढरा पटका, अंगात बंडी, व खांद्यावर पडशी असा. असे ते घरात आले. त्यांना आम्ही जेवायचा आग्रह करतोय. पण ते न थांबता दारात जावून घाईघाईने चप्पल घालू लागले व तोंडाने फक्त एवढेच म्हणाले की, "आत्ताच मी शिरडीहून तुझ्या आई वडिलांना भेटून आलोय. सर्व खुशाल आहेत." आणि भराभर जिना उतरून निघून गेले. मी एकदम खडबडून जागी झाले. तर समोरच भिंतीला लावलेल्या श्री. बाबांच्या फोटोचे दर्शन झाले. तसे उठल्याबरोबर श्री. बाबांच्या फोटोला नमस्कार करावयाचा आमचा सर्वांचाच रिवाज आहे. उठल्याबरोबर देवाचे दर्शन घेतले म्हणजे पूर्ण दिवस सुखा-समाधानात जातो. घड्याळ्यात पाहिले तर पहाटेचे ५ वाजले होते. माझी उठावयाची वेळ झालीच होती. ह्यांना मी, ते उठल्याबरोबर स्वप्नांतील दृष्टांत सांगितला. सर्वांना आश्चर्यच वाटले. खरंच, आश्चर्यकारकच घटना घडली होती. श्री. बाबाच आजेगांवकरांच्या रुपाने खुशालीचा निरोप घेऊन आले असणार! शिरडीहून भक्ताची काळजी दूर करण्यासाठी श्री. बाबांशिवाय कोण धावून येणार! म्हणून म्हणावे वाटते :–

साईनाथ गुरु माझे आई।
वेगे धावत येई ठायी॥

ह्या दोन्ही अनुभवातील एक अक्षरही खोटे नाही. जसा मला अनुभव आलाय तसंच मी लिहीलंय. फक्त अनुभव मासिकाकडे पाठविण्यास बराच उशीर झालाय. उशीरा कां होईना पण श्री. बाबांनीच प्रेरणा दिली म्हणायची!

आणि खरंच, पुढे कांही महिन्यातच श्री. आजेगांवकरांचे आपल्या पत्नीसह जबलपूरला आगमन झाले. व आमची सर्वांचीच भेट झाली.

अशाच प्रकारे कोणत्याही रुपाने येऊन श्री. बाबांनी त्यांच्या भक्तांना चिंतामुक्त करावे. त्याच्या हाकेला "ओ" द्यावी. हीच मनोभावे प्रार्थना आहे.

# जेथे साई ज्योतीची प्रचिती
# तेथे कर माझे जुळती

— श्री. वि. म. हटवार
१४९, रेशिमबाग, नागपूर - ९.

समस्त विश्वातील साईप्रेमी मोठ्या भक्तीभावाने शिर्डीला येऊन श्रीसाईमाऊलीचे दर्शन घेऊन दिव्यत्वाचा अनुभव घेतात. प्रतिवर्षी 'साईलीला' नोव्हे.-डिसें. दिवाळी अंक भक्तस्नानुभवांनी नटलेला असतो. आध्यात्मिक ज्ञानात श्रद्धेला उच्च स्थान आहे. श्रद्धेने साधा वाटणारा एखादा प्रसंग प्रेरणा देणारा सामर्थ्यदायी बनतो, तर अंधश्रद्धेने मोठ्या प्रसंगातूनही शेवटी फसवणूक झाल्याचा अनुभव येतो. मनुष्य निराश होऊन देवास शरण आला, तर अवतारी संत कोणत्याही रूपात प्रगट होऊन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहाय्य देऊन ईश्वरांवषयी सद्‌भाव कायम ठेवतात.

श्रीसाईचरणी श्रद्धेने जाणारा कधीच विन्मुख होत नाही, असा असंख्य भक्तांना आलेला अनुभव वाचून वाचकांचे मन प्रसन्न होते, आनंदी वातावरण संकल्पास कारणीभूत होऊन शिर्डीवारी करणारांची संख्या प्रतिवर्षी वाढते, असा प्रभाव आहे. प्रत्येकास आपल्या शिरडी यात्रेतील अनुभव आठवतात. सर्वच साईकृपा-प्राप्त आपले अनुभव सांगतात असे नाही. काही अनुभव आत्मसात केल्यावर ते जर उघडपणे सांगितल्याने त्यांचे महत्व इतरांना पटले, तर उत्तम. अन्यथा अशा विशिष्ट अनुभवास केवळ आपल्यापुरते मर्यादित ठेवणेच योग्य असते. म्हणून प्रपंचात किंवा परमार्थात काही गोष्टी गुप्त ठेवणे हितावह असते, असे सांगतात.

श्री साईबाबांच्या नावावर चमत्कारांचे किस्से रंगविणारे लोक असतील, पण स्वानुभव व चमत्कार यांची सांगड घालणे योग्य नाही. कारण परमहंस संत चमत्कारापासून दूर असतात. त्यांचे जे नित्य कार्य चालत असते, त्यातून काही गोष्टी चमत्कारिक वाटतात पण मुद्दाम घडवून आणलेले चमत्कार नसतात. आपल्या भक्तांना संकटमुक्त करून सन्मार्गी लावावे, हाच एकमेव उद्देश असतो.

श्री साईबाबांच्या दिव्यत्वाचा अनुभव घेणारे असंख्य आहेत, त्यामुळे कित्येकांचे जीवन सुखमय झाले आणि समाजात आदर्श व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले हे सत्य आहे. पण भक्तिमार्गातील गोडी चाखण्याकरिता संतकृपा पाहिजे व ती कृपा संपादन होण्याकरिता पुण्य पाहिजे. यासाठी श्रीसाईंचे चिंतन, हेच प्रभावी साधन आहे.

तुका म्हणे हा तों स्वयें परब्रह्म ।
बैसविलें मला येणें अश्वावरी ।
धांवू पळू तरी कैसा आता ।

ज्याः इच्छेने साईनाम घ्यावे, ती इच्छा तो पूर्ण करतो. जगात इतर काही कृपाळू

आहेत, पण त्यांची ठराविक कृपा केवळ प्रपंचास सहाय्यक असते. साईमाऊली भक्ताला कैवल्याचे कवळ भरविते.

भक्ती व उपासनेत कर्मत्याग नाही, तर विविध कर्मांचे ज्ञानपूर्वक आचरण आहे. माणसाला आपल्या कर्तव्यकर्मात नेहमी मग्न राहून ते यशस्वीरित्या पार पाडण्यातच खरी मौज आहे. ज्ञानी पुरुष सुखात तसेच दु:खात मन शांत ठेवून समाधान मानतो. आपल्या जीवनात आपण एकांगी पडल्यानंतर मनात शंका आल्यास सद्‌विवेकाने व साईनामाने बुद्धीला चालना देऊन अंतर्मनाने दिलेला निर्णय मानावा. विचारांचा गोंधळ नसला म्हणजे निर्णय बरोबर होतात.

आपण साईचरित्रात वाचले आहे की, जे स्थिरबुद्धीने व भक्तीभावाने आणि श्रद्धेने शिरडीला श्री साईबाबांच्या सम्पर्कात आले, त्या सर्व भक्तांच्या हृदयात साईज्योतीचे दिव्यत्व विराजमान झाले.

श्रेष्ठ साईराम शिरडीला 'साई' ह्या बालरूपात प्रगट झाले आणि येथील अनेक वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी खतपाणी घालून, जो बाग तयार केला, तो हा साधा बगीचा नसून दिव्य वृक्षवेलींनी नटलेले नंदनवन आहे.

अध्यात्ममार्गात यशस्वी होण्यास सुद्धा अंगी बालकाप्रमाणे निरागस वृत्ती असणे. आसक्ती नसणे, अंतर्बाह्य पवित्रता असणे व आपल्या कार्यात तन्मयता असणे महत्वाचे आहे. बालकासारखा जो विनम्र असेल, त्याला परमात्मा आपल्याजवळ स्थान देतो.

प्रपंचात मनुष्य मुले, पत्नी, घरदार यांचा लोभ करतो. ऐहिक वस्तूंनी संसारात आनंद वाटतो. आणि त्यांची जोपासना नीट व्हावी म्हणून मनुष्य काळजीत राहतो ज्याच्यापाशी कोणतीच वस्तू नाही किंवा सर्वांचा मनापासून त्याग ज्याने केला आहे, त्याला काळजी नसते.

भक्तीमार्गाने जाणारे काही निरूपाधिक असतात. ऐहिक व प्रापंचिक जंजाळातून बाहेर पडतात. ते करीत असतानाही जे दिव्य असेल त्याचा आदर करतात. अशा ईश्वरी पुरुषाच्या अंतरंगाचे सौंदर्य बाह्यरूपाने प्रकट होते. भगवंताचे अवतार नेहमी सुंदर असतात. आत्म्याचे आंतरिक सौंदर्य हेच खरे सौंदर्य आहे. मेकअप केलेल्या बाह्य सौंदर्याचा तिटकारा असेल तर खरे सौंदर्य अनुभवता येते.

परमार्थात तन्मयता महत्वाची आहे. कोणत्याही गोष्टीत ज्याला तन्मय होणे साधते, तो मनुष्य भक्तिमार्गात प्रगती करू शकतो. लहान मूल कशाशीही पटकन तन्मय होऊन जाते, तशी पूर्ण तन्मयता पाहिजे.

माणसाचे अंत:करण जेव्हा शुद्ध व पवित्र होते, तेव्हा त्याचे मन गुरू होऊन ध्येयाकडे घेऊन जाते. मनात शुद्ध भाव उत्पन्न होतो. प्रिय व्यक्तिच्या वियोगाने प्रापंचिक मन जसे व्याकूळ होते, तशी व्याकूळता पारमार्थिक मनात ईश्वरासाठी निर्माण झाली, त्याला श्रीसाईरामाचे दर्शन होते. निष्काळजीने कोणतीही सुसंधी गमावली तर मायाजाळात फसून बाह्यरंगी सुंदर दिसणाऱ्या जीवास दीर्घकाळ त्रास भोगत राहावे लागते.

अधर्माने निर्माण केलेले दोष, अज्ञान, अविवेक व कधीही तृप्त न होणाऱ्या कामना यांचा नाश करून भक्तीची ओढ निर्माण करणारे अवतारी संतांचे कार्य आहे. दर्शनास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा भाव, वृत्ती, श्रद्धा, अवस्था व अधिकार वेगळा असला तरी श्रींचे दर्शन व्हावे, हाच सर्वांचा उद्देश असतो.

आपणा सर्वांनाच कळते की, मेलेली व्यक्ती फिरून परतत नाही. गलेली रात्र फिरून येत नाही तसा हा जीव एकच देह धारण करीत नाही. तेव्हा आहे त्या स्थितीचा योग्य उपयोग करणेच आपल्या हिताचे आहे.

श्री साईरामाच्या भक्तीने, निष्ठेने ज्यांना जे काही जमत असेल, ते भगवताच कार्यात देऊन माणूस मोकळा होण्याचा प्रयत्न करतो पण ज्याने सर्वस्व ईश्वराला अर्पण केले आहे, तोच खरा परमार्थाचा अधिकारी बनतो. म्हणूनच प्रापंचिक माणूस भोगविलास व चैन भोगतो आणि परमार्थ जाणणारा साधक त्याग व तपश्चर्या करतो. श्रीसाईने जीवनाचा सुखकर मार्ग दाखवून भक्तांना सुखी केले, करीत आहे व करणार आहे.

# साईनाथांना वंदन करा

स्मरण करा हो स्मरण करा
साईनाथांना वंदन करा ॥धृ.॥

रुप साधे अन् कफ्नी अंगी
अवतरले हो बाबा शिरडी
स्वार्थी जगास शिकविण्या धडा
श्री चरणांना वंदन करा ॥१॥

नाश केला अहंकाराचा
प्रसाद दिला भक्तांना समाधानाचा
झोळी घेऊन मागी भिक्षा
अशा गुरुचे पाय धरा ॥२॥
पेटविली धुनी केले रोग दूर
ऐकून बाबांची लीला
जमला भक्तांचा शिरडीत पूर
असा ब्रह्मांडनायक योगी खरा
साईनाथाना वदन करा ॥३॥

— **श्री. प्रशांत म. देवकर,**
भांडुप, (पूर्व),
मुंबई-७८

# साईंच्या सहवासात

– श्री. रामचंद्र नागेश घोडखांदे
४२० सी, हनुमान नगर, नागपूर - ४४० ००९

ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात ॥
साधूचे संगती तरणोपाय ॥ १॥
साधूबोध झाला तो नुरोनिया ठेला ॥
ठायीच मुरला अनुभवें ॥ २॥
सिद्धी, बुद्धी, धर्म हरिपाठी आले ॥
प्रपंची निमाले साधुसंगे ॥ ३॥

साधुच्या संगतीची, त्यांच्या आशीर्वादाची भक्ताला नितांत गरज आहे, हे ज्ञानदेवाच्या वरील अभंगातून दिसून येते. मोक्षप्राप्ती (आत्मज्ञान) करून घेणे, हे मानवी जीवनाचे साध्य आहे आणि ते मिळविण्यासाठी संतांचा सहवास अनिवार्य आहे, हे यावरून कळून येईल. जीवन क्षणभंगूर आहे, हे समजत असूनही दाश, पुत्र, धन, प्रतिष्ठा यामागे लागलेला जीव मायाजाळात इतका फसतो की, प्रपंच करणे हीच तो जीवनाची इतिकर्तव्यता मानतो आणि मोक्षप्राप्तीपासून वंचित राहतो.

समाजजीवनाच्या घडणीवर देखील, व्यक्तीचा आध्यात्मिक विकास अवलंबून असतो. आज समाजाच्या सर्व थरातील श्रीमंत-गरीब सारे कनक आणि कान्ता, सत्ता आणि प्रतिष्ठा यात गुरफटलेले दिसतात. ह्यालाच जीवन समजून त्याचा पाठलाग करीत असलेले पाहावयास मिळतात. समाजात निर्माण होणारे साहित्यदेखील त्यांच्या ह्या वृत्तीला मदत करते. नाटक, कादंबरी, कथा, काव्य आणि चित्रपट बहुधा ऐहिक जीवनाच्या विविध अंगांचेच विलोभनीय चित्र रंगवतात. आदर्शच नव्हे. अशा समाज घडणीतून आध्यात्माकडे ओढले जाणारे जीव मोजकेच मिळाले तर नवल नाही.

माणूस जन्मतो पण माणुसकी मिळवावी लागते. ती चांगल्या संस्कारातून निर्माण होते. विविध रंगांनी नटलेल्या समाजात, माणूस वाहत जातो. वाईट प्रवृत्तींकडे सहज आकर्षिला जातो. कुटुंबातील लोक, शेजारी, मित्र, शालेय जीवन, ग्रंथालय व सभोवारचा परिसर ह्यातून माणसाचे जीवन घडत असते. ह्या संस्कारात सेवा, त्याग, अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादि माणुसकीला आवश्यक गुण कोठे, किती मिळतात, ह्याची दखल समाजाने घ्यायला हवी. ते होत नाही. म्हणून समाजात चोरी, काळाबाजार, घुसखोरी, महिलांचा विनयभंग इत्यादि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या गोष्टी घडत आहेत. सरस्वतीच्या मंदिरात व्यापार घुसला आहे. सात्विकतेचे, श्रद्धेचे विडंबन होत आहे. असत्याला भाव आहे. सत्य झाकाळू पाहते आहे. जीवनापुढे मोठे आदर्श ठेवून त्यासाठी झगडणारे थोर पुरुष, अभावानेच निर्माण होत आहेत, जसा समाज तशा व्यक्ती त्यातून निर्माण होतात. भौतिकतेचा छंद लागलेल्या समाजातून उदात्त वृत्तीच्या व्यक्ती बोटावर मोजण्याइतक्याच लाभल्या तर नवल नाही.

अशा माणसांनी साईबाबांकडे आपल्या व्यावहारिक गरजेची मागणी केली नाही तरच आश्चर्य! सर्वांना संतुष्ट करणारा शिरडीचा दयासागर साईबाबा सर्वांना पावतो, हे विशेष होय!

चिरंतन सत्य 'आत्मा' त्याची ओळख करून घेणं,हे जीवनाचे साध्य आहे, हे कळत असून देखील मायेत गुंतलेले बरेच जीव त्यातून सुटत नाहीत. हे बघून संत तुकाराम महाराज म्हणतात–

बुडताहे जन देखवेना डोळा ॥
म्हणूनि कळवळा येतसे ॥

संत समागमाशिवाय हृदय परिवर्तन होत नाही आणि साधनेची बैठक बसत नाही, असे ज्ञानदेव म्हणतात. वातावरण बदलले की, मन:स्थितीत फरक पडतो. हे मान्य केल्यास, संत सहवासाचे महत्व लक्षात येईल. शिरडीला साईनाथांच्या मंदिरात गेल्यावर मन उदात्त होते. त्यागसेवेचे गाणे कानाशी गुणगुणू लागते. 'देवा तुझा सहवास अखंड लाभू दे' असा प्रतिध्वनी हृदयमंदिरात घुमू लागतो. निर्माण होणाऱ्या अमोघ आनंदात मन पोहू लागते. क्षणभर का होईना, माणूस स्वत:ला विसरतो. हा देवाच्या सान्निध्याचा प्रभावच की नाही.

ध्रुव रानात गेला, निष्ठेने देव मिळविण्यासाठी. विष्णुने प्रगट होऊन शंखानं त्याच्या गालाला स्पर्श केला, अशी कथा आहे. म्हणजे ध्रुवाला गुरूप्रसाद लाभला. प्रल्हादाला नारदाने 'नारायण' 'नारायण' मंत्र दिला. हा गुरूप्रसादच. वाल्मिकीला नारदानेच 'मारा' 'मारा' म्हण म्हणून सांगितले. एकूण साधकाला गुरूच्या सहवासाची, मार्गदर्शनाची जरूर आहे, हे दिसून येते. मात्र त्यासाठी गरज आहे, तळमळणाऱ्यां,धगधगत्या मनाची. जमीन मशागत करून तयार असली की, बी पेरण्याचेच तेवढे काम उरते. तसेच मनाचे आहे. ईश्वर प्राप्तीसाठी मन आतुर असले की, साईबाबा आजही आपल्या भक्ताला भेटतील, मार्गदर्शन करतील.

शिरडीला साईनाथांचे प्रथम स्वागत म्हाळसापतीने खंडोबाचे मंदिरात केले. म्हाळसापती भाविक होते. श्रद्धाळू होते. साईबाबांचे त्यांच्याशी खूपबोलणे होत असे. त्यांना बाबांचा खूप सहवास लाभला. म्हाळसापतींवर झालेली कृपा तेच जाणे. सद्भक्त भक्तीचे प्रदर्शन करीत नसतात. भक्ती मनाचा विषय आहे. भक्ती, मौन साधते. प्रदर्शनाची हौस असते ती भक्ती नव्हे. म्हाळसापती बरोबर काशिराम शिंपी व आप्पा जांगळे साईंच्या सेवेला असत. साईनाथांवर त्यांची परमश्रद्धा होती. असीम प्रेम होते. हे साईंचे निष्ठावंत भक्त आपापल्या व्यवसायात राहून साईंच्या सेवेला हजर असत. 'हाती काम अन् मुखी राम' अशी त्यांची भक्ती साईबाबाना आकर्षून घेत होती. त्यांचे जीवन सफल झाले, असेच म्हणावे लागेल. बाबांशी निकट संबंध असलेल्या भक्तांत गोपाळ गुंड, काकासाहेब दिक्षित, नानासाहेब चांदोरकर, माधवराव देशपांडे व दासगणू यांचा प्रामुख्याने समावेश होतो. ह्यांना बाबांच्या सहवासाचा लाभ सदैव व्हायचा. हे त्यांच्या कृपेचे मानकरी होत, असे म्हणूया.

# मला तुमची काळजी आहे

– सौ. उषा अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड,
रत्नागिरी.

श्रीसाईबाबांची अनेक लाडकी, विशेष मर्जीतली लेकरं त्यावेळी शिरडीत तर होतीच, पण अन्य ठिकाणीही होती. त्यात ठाणे जिल्ह्यात वांद्रे शहरात राहाणारे श्री रघुनाथराव तेंडुलकर हे असेच एक लाडके लेकरू होते. बाबांचे हे लेकरू अतिशय चतुर, बहुश्रुत होते. ते सदा आनंदी असे. त्यांचे साईंचे चरणी अतिशय प्रेम असे. जेवता-खाता, उठता-बसता, काम करता करता अखंड साईनामाचा जप त्यांचेकडून सतत होत असे. त्यांची पत्नी सावित्रीबाई ही पण एक आदर्श गृहिणी होती. आपल्या पतीप्रमाणेच, आहे त्यात समाधान मानून राहून आनंदनिर्भर मनाने श्रीबाबांची भक्ती करीत सुखाने संसार करीत होती. साईबाबा हेच आपले परम दैवत असून ते प्रत्यक्ष परमेश्वरच आहेत, ही तिची निष्ठा होती. त्यांची परिस्थिती तशी गरिबीचीच, पण टाकटुकीने संसार करून आपल्या हुषार मुलाला डॉक्टर करण्याचे स्वप्न दोघेही पती-पत्नी पहात होते. त्यांचा मुलगा बाबूही आईवडिलांची मनिषा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कसून प्रयत्न करीत होता. होता होता त्याची वैद्यकीय परीक्षा जवळ आली. त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करून अभ्यास केलाही होता, पण त्याच वेळीं त्याच्या मनात ज्योतिषाला भेटून आपल्या यशाबद्दल विचारावे असे आले. त्याप्रमाणे त्याने एका ज्योतिषाला गाठून आपण वैद्यकीय परीक्षेत चांगल्या तऱ्हेने पास होऊ का, असा प्रश्न विचारला. पण पंचांगाची पाने चाळून ज्योतिषी म्हणाला, "छे, छे यंदा तुम्हाला ग्रह अगदी वाईट आहेत. तुम्ही कितीही परिश्रम केलेत तरी परीक्षा पास होणार नाही. मात्र पुढील वर्षी तुम्हाला नक्की यश येईल."

ज्योतिषाचे बोलणे ऐकून बाबू दचकला. आपण जर पास होणार नाही, तर परीक्षेला तरी कशाला बसायचे? त्याच्या मनाने कच खाल्ली आणि हिरमुसल्या स्वरात तो आईला म्हणाला, "आई, मी यंदा परीक्षेला बसणार नाही. ज्योतिषाने निक्षून सांगितलंय की, मी यंदा नापास होणार, पुढल्या वर्षी मात्र नक्की पास होईन. मग परीक्षेला बसून हसं कशाला करून घ्यायचं? मी मुळीच परीक्षेला बसणार नाही." बिचारी आई! फार दु:खी झाली. पण काय करणार? आपले दु:ख कोणाला सांगणार, या विचारात ती असताना तिला तिच्या परम दैवताची आठवण झाली. आता यातून तारणार, एक तो फक्त शिरडीश्वर! तिथेच जाऊ या. मनही मोकळं होईल. दर्शन लाभ होईल आणि कुणी सांगावं ज्योतिषाचं निदान खोटंही ठरवून तो बाबूच्या पदरात यशही घालील. वरील विचार मनात आल्यावर शिरडीला निघायला काय वेळ लागणार? आपल्या पतीची परवानगी घेऊन सावित्रीबाई शिरडीस आल्या. प्रथम श्रीबाबांच्या चरणावर मस्तक ठेवून त्या विनयाने बाजूला बसल्या. त्यांची दृढ श्रद्धा आणि खरीखुरी भक्ती श्रीबाबा जाणून होते. त्यांनी त्यांच्या कुटुंबाची मोठ्या प्रेमाने

साईनाथांच्या कृपेने आंधळे डोळस होत. कुष्ठरोगी रोगमुक्त होत. भागोजी शिंदा कुष्ठरोगी बाबांच्या सेवेला असे. बाबा त्याची कीळस करीत नसत. तात्या कोतेची आई डोक्यावर भाकरीची शिदोरी घेऊन बाबांचा शोध करीत रानात भटकायची. बाबांना जेवू घालण्याचा क्रम तिने आयुष्यभर चालविला. तिच्यानंतर तिच्या मुलाने ते व्रत पुढे चालविले. तात्या चौदा वर्षे बाबांबरोबर मशिदीत झोपला. ज्यांना बाबांच्या निकट सहवास लाभला ते भाग्यवान होत.

भक्तांची निरपेक्ष सेवा आणि श्रद्धा साईंच्या चरणी रुजू व्हायची. ते सांगून त्यांचे कल्याण करीत नसत. कधीकधी साईनाथ अत्यंत क्रोधायमान व्हायचे पण त्यांचे अंतरंग दयेने, प्रेमाने भरलेले असायचे, अननसाच्या आतील गरासारखे मधूर.

एकदा राधाबाई देशमुख नावाची बाई बाबांच्या दर्शनास आली. बाबांचा गुरूमंत्र हवा म्हणून तिने हट्ट धरला. तीन दिवस अन्नपाण्यावाचून राहिली. शेवटी बाबांनी तिला उपदेश केला. ते म्हणाले, कासवी नदीच्या दुसऱ्या तीरावर वाळूत असलेल्या आपल्या पिलांना दृष्टीनेच समाधान देते. पिले दृष्टीरूपी भोजनाने तृप्त होतात. मी देखील त्या कासवी प्रमाणे आपल्या भक्तावर लक्ष ठेवतो. मंत्र देत नाही. माझ्या गुरूनेही मला मंत्र दिला नव्हता. तेव्हा बाईचे तसेच उपस्थित असलेल्या काकासाहेब दिक्षित आदी मंडळींचे समाधान झाले. आजही समाधिस्त साईबाबांचे डोळे भक्तांकडे लागलेले असतात, म्हणूनच शिरडीला रोजचं यात्रा भरते.

दासगणू उपनिषदांचे भाषांतर करीत असता त्यांना काही मूळ संस्कृत सूत्रांचा नीट अर्थ लागेना. ते बाबांना म्हणाले, माझी ही अडचण आपण दूर करा. त्यावर बाबा म्हणाले, पारल्याच्या काकांच्या मोलकरणीला विचार, ती तुझी अडचण दूर करील. सर्वांना अचंबा वाटला. पण दासगणूंची बाबांवर परमश्रद्धा होती. ते शांत राहिले. पुढे दासगणूंना त्या मोलकरणीने उपनिषदाचा अर्थ सांगून त्यांची अडचण दूर सारली. हे ऐकून लोकांनी बाबांच्या अतुल सामर्थ्याचे, त्यांच्या लीलेचे नतमस्तक होऊन कौतुक केले. असा हा बाबांचा सहवास आणि सान्निध्य भक्तांना लाभले. त्याची स्मृती आपले जीवन घडविण्यास साह्यभूत ठरो, हीच साईचरणी अपेक्षा आहे.

लहानांपासून थोरांपर्यंत, दलितांपासून धनिकांपर्यंत बाबा सर्वांना सांभाळीत. साईबाबा म्हणजे दयेचा सागर, प्रेमाचे भांडार, भूतांच्या कल्याणासाठी सदातत्पर, आशीर्वादासाठी त्यांचा हात वर उचललेला असायचा. आजही भाविकांसाठी, त्यांना तळमळीने हाक मारणाऱ्यांच्यासाठी तो तसाच वर उचललेला आहे. म्हणूनच भक्त आपले गाऱ्हाणे घेऊन शिरडीत जातात.

समाधीच्या आसमंतात सदा आनंदाची फुलबाग फुललेली असते. तेथे बाबांच्या दयेचा आणि प्रेमाचा सुगंध दरवळत असतो. भक्तांनो! ऐहिक पारमार्थिक धन ज्यांना जे हवे ते घेऊन जा. फक्त श्रद्धा ठेवून जा. असा जणू अघोषित संदेश बाबांचा आहे, हे मनी आणा. किती सोपा व्यवहार आहे हा! पण त्यासाठी शिरडीलाच जायला हवे. थोडेसे प्रेम घेऊन खूप मोठा लाभ देणाऱ्या देवाला साईनाथांना वंदन असो.

# मला तुमची काळजी आहे

– सौ. उषा अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड,
रत्नागिरी.

श्रीसाईबाबांची अनेक लाडकी, विशेष मर्जीतली लेकरं त्यावेळी शिरडीत तर होतीच, पण अन्य ठिकाणीही होती. त्यात ठाणे जिल्ह्यात वांद्रे शहरात राहाणारे श्री रघुनाथराव तेंडुलकर हे असेच एक लाडके लेकरू होते. बाबांचे हे लेकरू अतिशय चतुर, बहुश्रुत होते. ते सदा आनंदी असे. त्यांचे साईंचे चरणी अतिशय प्रेम असे. जेवता-खाता, उठता-बसता, काम करता करता अखंड साईनामाचा जप त्यांचेकडून सतत होत असे. त्यांची पत्नी सावित्रीबाई ही पण एक आदर्श गृहिणी होती. आपल्या पतीप्रमाणेच, आहे त्यात समाधान मानून राहून आनंदनिर्भर मनाने श्रीबाबांची भक्ती करीत सुखाने संसार करीत होती. साईबाबा हेच आपले परम दैवत असून ते प्रत्यक्ष परमेश्वरच आहेत, ही तिची निष्ठा होती. त्यांची परिस्थिती तशी गरिबीचीच, पण टाकटुकीने संसार करून आपल्या हुषार मुलाला डॉक्टर करण्याचे स्वप्न दोघेही पती-पत्नी पहात होते. त्यांचा मुलगा बाबूही आईवडिलांची मनिषा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कसून प्रयत्न करीत होता. होता होता त्याची वैद्यकीय परीक्षा जवळ आली. त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करून अभ्यास केलाही होता, पण त्याच वेळी त्याच्या मनात ज्योतिषाला भेटून आपल्या यशाबद्दल विचारावे असे आले. त्याप्रमाणे त्याने एका ज्योतिषाला गाठून आपण वैद्यकीय परीक्षेत चांगल्या तऱ्हेने पास होऊ का, असा प्रश्न विचारला. पण पंचांगाची पाने चाळून ज्योतिषी म्हणाला, "छे, छे यंदा तुम्हाला ग्रह अगदी वाईट आहेत. तुम्ही कितीही परिश्रम केलेत तरी परीक्षा पास होणार नाही. मात्र पुढील वर्षी तुम्हाला नक्की यश येईल."

ज्योतिषाचे बोलणे ऐकून बाबू दचकला. आपण जर पास होणार नाही, तर परीक्षेला तरी कशाला बसायचे? त्याच्या मनाने कच खाल्ली आणि हिरमुसल्या स्वरात तो आईला म्हणाला, "आई, मी यंदा परीक्षेला बसणार नाही. ज्योतिषाने निक्षून सांगितलंय की, मी यंदा नापास होणार, पुढल्या वर्षी मात्र नक्की पास होईन. मग परीक्षेला बसून हसं कशाला करून घ्यायचं? मी मुळीच परीक्षेला बसणार नाही." बिचारी आई! फार दुःखी झाली. पण काय करणार? आपले दुःख कोणाला सांगणार, या विचारात ती असताना तिला तिच्या परम दैवताची आठवण झाली. आता यातून तारणार, एक तो फक्त शिरडीश्वर! तिथेच जाऊ या. मनही मोकळं होईल, दर्शन लाभ होईल आणि कुणी सांगावं ज्योतिषाचं निदान खोटंही ठरवून तो बाबूच्या पदरात यशही घालील. वरील विचार मनात आल्यावर शिरडीला निघायला काय वेळ लागणार? आपल्या पतीची परवानगी घेऊन सावित्रीबाई शिरडीस आल्या. प्रथम श्रीबाबांच्या चरणावर मस्तक ठेवून त्या विनयाने बाजूला बसल्या. त्यांची दृढ श्रद्धा आणि खरीखुरी भक्ती श्रीबाबा जाणून होते. त्यांनी त्यांच्या कुटुंबाची मोठ्या प्रेमाने

चौकशी केली, तेव्हा येणारे उमाळे आवरून त्या म्हणाल्या, "बाबा, काय सांगू माझी व्यथा? आपल्या कृपेनै आजपर्यंत अन्नवस्त्राला कधी तोटा पडला नाही. पुढेही पडणार नाही. दुःख आहे ते एवढेच की, हातातोंडाशी आलेला माझा बाबू वैद्यकीय परीक्षेला बसत नाही हो! हे शिक्षण किती महागडे आहे, पण आपली कृपा आणि त्याची हुषारी यामुळे तो नक्की ही परीक्षा पास होईल, या आशेने आम्ही खूप धडपडलो पण काय उपयोग? ज्योतिषाने तो नापास होईल, असं सांगितल्यामुळे तो परीक्षेला बसत नाही. त्याने फार धसका घेतलाय हो बाबा! बाबा, बाबा, आता मी काय करू हो! म्हणून सावित्रीबाई रडू लागल्या. तेव्हा त्यांच्या मस्तकावर आपला अभयहस्त ठेऊन श्रीबाबा म्हणाले, "आये, त्याला म्हणावं पहिली मनातली भीती काढून टाक. मी असताना ज्योतिषाकडे का जावे? मी असताना का भ्यावे? त्याला म्हणावं ज्योतिषाच्या नादी लागू नकोस. ती पत्रिका गुंडाळून ठेव आणि शांत मनाने परीक्षेला जा. त्याला निश्चित यश मिळणार आहे. या माझ्या पवित्र द्वारकामाईत बसून मी कधीच असत्य भाषण करीत नाही आणि मी बोललेले बोल कधीही फोल होत नाहीत. माझ्यावर विश्वास ठेऊन तुम्ही सर्वांनी निश्चिंत असा. माझ्या पोरांचे मी वाईट कसे होऊ देईन? मग मी पाहिजे कशाला?" श्रीबाबांच्या या अभयसूचक आशीर्वादाने सावित्रीबाई आनंदल्या. श्रीबाबांच्या चरणावर मस्तक ठेवताच त्यांच्या डोळ्यातले आनंदाश्रू श्रीबाबांच्या चरणावर मोत्यांसारखे ठिपकू लागले. श्रीबाबा अतिमायेने त्यांचे मस्तक थोपटत होते. त्या भानावर आल्यावर श्रीबाबा म्हणाले "आये, आता तू शांतपणे घरी जा. तिकडे रघुनाथ तुझी वाट पहात असेल. सर्वांना माझा आशीर्वाद सांग बरे." सावित्रीबाई आपल्या देवाची मूर्ती हृदयात साठवून मागे वळून वळून पहात द्वारकामाईतून आनंदाने बाहेर पडल्या.

गावी परत आल्यावर श्रीबाबा जे जे काही बोलले, ते त्यांनी पतीला व मुलाला सांगितले. श्रीबाबांचा आशीर्वाद आहे, हे ऐकताच बाबू परीक्षेला बसला. लेखी परीक्षा झाली पण पुन्हा आत्मविश्वास ढळला. आपण उत्तरे चांगली लिहिली असली तरी उत्तीर्ण व्हायला ती पुरी पडतील का, या शंकेनं त्याला पुन्हा घेरले. शिवाय तोंडी परीक्षेत पास होईनच, हा त्याला विश्वास वाटेना. त्यामुळे तो तोंडी परीक्षेला गेलाच नाही. पण ज्याने त्याची सर्व जबाबदारीच आपल्यावर घेतली आहे, आशीर्वाद दिला आहे, त्याला त्याची काळजी नाही का? बाबू गप्प बसून राहिला होता. तेवढ्यात त्याच्याच वर्गातला एक मुलगा त्याच्याकडे येऊन म्हणाला, "अरे, तू तोंडी परीक्षेला का आला नाहीस? चल, परीक्षकांनी तुला घेऊन यायला मला पाठवलंय. तुला आत्मविश्वास नव्हता, तू लेखी परीक्षेत नापास होशील, असं तुला वाटलं, ते मी परीक्षकांना सांगितलं. तेव्हा ते म्हणाले, बाबू अगदी वेडा आहे. त्याला म्हणावं, तू लेखी परीक्षेत चांगला पास झाला आहेस, तेव्हा ताबडतोब तोंडी परीक्षेला ये." हे उद्‌गार ऐकले मात्र! बाबूला अगदी गहिवरून आले. श्रीबाबांचे नाम घोळवीत तो परीक्षेला गेला आणि उत्तम तऱ्हेने पास झाला. ज्योतिषाचे ऐकून आपण परीक्षेला बसलो नसतो,

तर आपल्या आईवडिलांच्या दु:खाला कारणीभूत झालो असतोच शिवाय स्वत:चेही नुकसान करून घेतले असते. पण माझी सांई माऊली ते कसे होऊ देईल? तिने माझी पूर्ण काळजी वाहिली. म्हणूनच हे यश आपल्याला प्राप्त झाले, या विचाराने श्रीबाबांना त्याने मनोमन वंदन केले.

'पुढे कांही वर्षे गेली. रघुनाथराव वृद्ध झाले. पेढीवरचे काम झेपेना. अशक्तपणा होताच.त्यात त्यांना नीट दिसेनासेही झाले. तेव्हा त्यांनी प्रकृती सुधारावी म्हणून रजा घेतली. पण रजा संपली तरी प्रकृतीत काहीच सुधारणा नव्हती, म्हणून आणखी रजा त्यांनी वाढविली. ज्या पेढीवर ते काम करीत होते, त्या पेढीवरील वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपल्या या इमानी विश्वासू सेवकाची कदर होती. त्या काळात चांगल्या पेढ्या आपल्या प्रामाणिक सेवकांना चरितार्थासाठी काही रक्कम पेन्शन म्हणून देत. रघुनाथराव हे जाणून होते. पण ती मिळेल की नाही, याची त्यांना चिंता होती. त्यांना फक्त १५० रु. पगार होता. पेन्शन मिळालीच तर ७५ रु. मिळणार. यात कुटुंब कसे चालवायचे? ते खूप चिंता करीत होते पण त्यांची चिंता शिरडीश्वरालाच जास्त होती. पेन्शनचा अखेरचा हुकूम होण्याच्या १५ दिवस आधी श्रीबाबा त्यांच्या प्रिय भक्त सावित्रीबाई यांच्या स्वप्नात गेले आणि म्हणाले, "आये, तुम्हाला १०० रु. पेन्शन द्यायची माझी इच्छा आहे, पुरेल ना?" सावित्रीबाई म्हणाल्या, हे काय विचारता? आपणच आमचे मायबाप. आपण जे काही कराल, ते आमच्या भल्याचेच असेल. त्याची प्रचिती लवकरच आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रघुनाथरावांची सात्त्विकवृत्ती, प्रामाणिकपणा व निरलसपणा यांची जाणीव ठेऊन त्यांना ११० रु. पेन्शन मंजूर केली. जेव्हा हा पेन्शनचा हुकूम हातात पडला, तेव्हा त्या पती-पत्नीला काय वाटले असेल? त्यांचे डोळे आनंदाश्रूंनी डबडबले. त्या वृद्ध जोडप्याने अति विनीत होऊन त्यांच्या हृदयस्थ परमात्म्याला भक्तिभावाने वंदन केले.

या परमभक्त वृद्ध जोडप्याने श्रीबाबांविषयी रचलेली पदे 'रघुनाथ सावित्री साईनाम भजनमाला' म्हणून प्रसिद्ध आहेत. त्या ओव्यांत त्यांनी स्वत:साठी काहीही मागितलेले नाही. ऐहिक सुखाची त्यांना लालसा नव्हतीच. त्यांनी मागित ली आहे, अपूर्व मन:शांती आणि समाधान. आपणाला कोणाचाही हेवा करायची बुद्धी होऊ देऊ नको, सर्वांभूती लीन असण्याची देणगी द्यावी, सदा सत्यवचन मुखातून बाहेर पडावं, कसलाही लोभ नको, तुमच्याबद्दलचं प्रेम भक्ती हृदय संपुरात सतत असू दे आणि ही जीर्ण काया तुझ्यासाठीच, केवळ तुझ्यासाठीच झिजू दे.

तेंडुलकर दांपत्याची ही किती थोर मागणी आहे! अशीच मागणी आपणही श्रीबाबांजवळ केली पाहिजे. त्याप्रमाणे वागलं पाहिजे. म्हणजे आपणही त्यांच्याप्रमाणे श्रीबाबांना नक्कीच प्रिय होऊ.

श्रीबाबांच्या कृपाशीर्वाद लाभलेल्या या दांपत्त्याबद्दल मला असं म्हणावंस वाटतं—

रघुनाथ, सावित्री सदा असती साईंच्या चरणी रत ।<br>
म्हणूनी प्रसन्न होऊन साई त्यांना सदैव हात देत ॥

# महान संत श्रीसाईबाबा

– श्री. अं. रा. सुर्वे
२/५, चित्तरंजन नगर,
राजावाडी, घाटकोपर,
मुंबई - ४०० ०७७.

साई हे एक महान संत सर्वधर्म हितचिंतक म्हणून ओळखले जातात. आपल्या देशात अनेक जातीधर्माचे व विविध पंथांचे अनुयायी अनेक वर्षानुवर्षे एकत्र, गुण्यागोविंदाने नांदत आलेले आहेत, त्याचा सखोल मनाने अभ्यास केल्यास हिन्दुधर्माचे तत्वज्ञान कोणत्याही व्यक्ती विकासाच्या आड येत नाही, हीच ह्या धर्माची प्रणाली आहे. सध्याच्या विसाव्या शतकात राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीने महत्वाची ठरलेली धर्मनिरपेक्षता साईबाबांच्या हयातीतही जाणीवपूर्वक जोपासली जात होती. या देशात ज्यावेळी ब्रिटीशांची सत्ता नांदत होती, त्यावेळी उदात्त दृष्टिकोनातून जातीधर्माचा विचार न करता नैतिक मूल्यांचे अधिष्ठान सर्व धर्माच्या लोकांना मिळावेत व त्यांना सुखाने जगता यावे, याचकरिता सर्वधर्माच्या लोकांना एकत्र आणण्याचे महत्वाचे कार्य साईंनी आपल्या हयातीत निष्ठेने केले. हे करीत असताना इतर धर्मियांची मने न दुखविण्याचा त्यांनी कौशल्याने प्रयत्न केला, हे त्यांच्या तत्कालिन महत्वाच्या कार्यावरून दिसून येते.

धर्माची व्याख्या करताना, धर्म म्हणजे काय तर लोकांच्या आचारविचारांची प्रणाली, या दृष्टिकोनातून विचार केल्यास साईबाबांच्या काळात धर्माला एक प्रकारचे अनिष्ठ वळण लागलेले होते. लोक आपली कर्तव्यकर्मे विसरत चालले होते. माणसामाणसातून प्रेम, आदरभाव कमी होऊन एकमेकांतील संबंध दुरावत चालले होते. लोकांच्या आचारविचारांची ही दिशा अशीच जर चालू राहिली तर त्यांचे गंभीर परिणाम ह्या देशातील जनतेला भोगावे लागतील.आणि म्हणूनच साईंनी जर कोणते महत्वाचे कार्य केले असेल, तर लोकांमध्ये भक्तीमार्गाची व एकतेची जाणीव निर्माण केली.

भागवत धर्माचा पाया ज्याप्रमाणे ज्ञानेश्वर माऊलीने रचला व त्याला सुवर्ण कळस एकनाथ, नामदेव व तुकाराम या संतांनी बांधला, त्याचप्रमाणे लोकांमध्ये एकात्मतेची व धर्माची जाणीव निर्माण करून भक्तीपंथाच्या मार्गाने सर्व धर्मियांना एकत्र आणून योग्य ती दिशा दाखविण्याचे महत्वाचे कार्य साईंनी केले. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन जर करावयाचे झाले, तर त्याचे प्रत्यंतर आज आपण शिर्डीला साई समाधि मंदिरात पहात आहोत. सर्व धर्माचे लोक, हेवेदावे विसरून एकबलाने समाधि मंदिरात स्वतःला विसरून भजनात तल्लीन होतात. त्यावेळी ह्या सृष्टीचा परमेश्वर साई भगवानच आहे, अशी दृढ भावना सर्वांच्या मनात निर्माण होते. एकात्मतेची व भक्तीची शिकवण देताना साईंनी कुणाची जात व धर्म पाहिला नाही. या कामी त्यांनी अनेक जाणती, विद्वान, एकनिष्ठ, लायक माणसे जवळ केली. मुसलमानांबरोबर हिन्दु व इतर धर्मीय

लोकांना आत्मसात करण्याचे साईंचे कौशल्य अतुलनीय आहे. उच्च-निच व स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव न करता लायक व्यक्तींना त्यांनी जवळ केले व त्यामुळे साईंसाठी अनेक भक्त वाटेल ते साहस करावयास तयार झाले. साईंनी एका प्रसंगी तर श्री. दिक्षित यांना बोकड कापावयाची आज्ञा केली व त्याप्रमाणे त्यांनी कसलाच विचार न करता बाबांची आज्ञा तंतोतंत पाळण्यास मागेपुढे पाहिले नाही. ही सारी उदाहरणे अन्य जातीजमातींवर असलेला दृढ विश्वास व भक्तांचे साईंवरील अनन्य प्रेम सिद्ध व्हावयास पुरेशी आहेत.

साईबाबांनी धर्म म्हणजे काय, याचा अर्थ चांगला जाणला होता. ईश्वर एकच आहे आणि वेगवेगळे धर्म हे त्या परमेश्वराकडे जाणारे अनेक मार्ग आहेत, अशी त्यांची दृढ भावना होती. जातपात व धर्म यांचा विचार न करता, साईंनी गुणी व लायक व्यक्तींना योग्य ती दिशा दाखवून त्यांना भक्तीमार्गाची शिकवण दिली. बाबांची सर्व धर्माबद्दलची समभावना आजच्या काळातही अत्यंत आवश्यक असून त्याचे अनुकरण सर्व धर्मियांनी केल्यास आज जी सर्व ठिकाणी अशांतता माजली आहे, त्याला योग्य ती दिशा मिळून भावी पिढीलाही प्रेरणादायी ठरेल. साईंच्या प्रत्येक भक्ताने बाबांची शिकवणूक आत्मसात करून त्याचा प्रसार सर्व प्रांतांतून आत्मियतेने सर्वधर्मियांना एकात्मतेची शिकवणूक देऊन त्यांना एकत्र आणणे, हीच खरी साईंची भक्ती ठरेल. "रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल" कदाचित राष्ट्राचे भवितव्यही अंधारातून प्रकाशाकडे जाण्यास मदत होईल. "जाणा येथे आहे सहाय्य सर्वास ॥ मागे जें जें त्यास तें तें लाभे" असे श्रीसद्‌गुरू साईबाबांचे वचन आहे.

## धाव पाव गुरुराया –

धाव पाव गुरुराया, भेट देरे मजसी
वाट किती पाहू बाबा, अंत किती पाहसी ॥१॥
शिणले रे नेत्र माझे, करुणा का न तुजसी
हांक नये का ऐकू येई, सांग तूं केव्हा येसी ॥२॥
असतील माझ्या या, अनंत पापराशी
पात्र नसे का साई, तव कृपा भिक्षेसी ॥३॥
येऊ कुठे भेटाया, चराचरा तू वससी
कर दोन्ही जोडते, सर्वत्र तू अससी ॥४॥
अनाथांच्या नाथा, मजवरी रुष्ट का होसी
बोल ना साई, संकट केव्हां हरिसी ॥५॥
सांग एक मज कधी सगुण दर्शन देसी
पार्थिते मंदा, नित्य घे तुझ्या पदासी ॥६॥

**– सौ. मंदा इनामदार**
६, स्नेहसागर अपार्टमेंट,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# विज्ञानयुगातही अंतर्मुख करणारा साईचमत्कार

अनुभव – **श्री. महेंद्रभाई जोशी**
चुनीलाल रोड, फत्तेगंज, बडोदा
शब्दांकन - **श्री. मधुकर अंबाडे**
अंबाडे हाऊस, लकडीपुलासमोर, प्रधानमार्ग, बडोदा

श्री. महेंद्र जोशी हे एक परम साईभक्त असून त्यांनी शेगावचे प.पू. श्रीगजानन महाराज यांचे चरित्र गुजरातीत अनुवादित केलेले आहे. त्यांचा एक सत्य अनुभव पुढीलप्रमाणे –

साईभक्त श्री. महेन्द्रभाई शिरडी यात्रेला निघाले. २२-२-१९७९, बुधवारचा तो दिवस. त्या दिवशी परम् पावन पंचवटी क्षेत्री, म्हणजे नाशिकच्या केन्द्रीय बस स्थानकावर दुपारी साडेतीन वाजता शिरडी बसची वाट पहात ते होते. त्यांच्यासह त्यांच्यासारख्याच भाविक अशा त्यांच्या श्रध्दाळू पत्नी, मुले व इतर मंडळीही होती. तेवढ्यात एक अलौकिक चमत्कार घडला, प्रत्यक्षात घडला. महेन्द्रभाईंचे पुण्य फळाला आले ! ! ! डोक्याला फडका बांधलेले श्रीबाबा, नव्हे साक्षात् ईश्वरच तेथे प्रगटला! सहजासहजी विश्वास बसणार नाही, पण अद्‌भुत, आश्चर्यजनक गोष्ट प्रत्यक्षात घडली! श्री महेन्द्रभाई दिङ्मूढ झाले. श्रीबाबांचे चरणकमल धरण्याचा विचार त्यांनी केला. तेव्हढ्यात कुठली बस शिरडीसाठी ठेवली जाईल, ह्याची त्यांना चिन्ता होती, म्हणून बाबा म्हणाले, "शिरडी जाना है ना? फिकीर मत कर. वो सामने जो खडी है ना, वो बस एक घण्टे के बाद शिरडी जायेगी!" अर्थात् अंतर्यामी साईने म्हटल्याप्रमाणे तीच बस शिरडीसाठी ठेवण्यात आली. अजूनही महेन्द्रभाई श्रीचरण धरण्यासाठी द्विधा मनःस्थितीत असतानाच श्री बाबांनी महेन्द्रभाईंना अत्यंत प्रिय असलेला चहा मागितला. भक्ताची ज्यात आसक्ती असते, तीच वस्तू श्रीबाबा मागतात.

आता महेन्द्रभाई चरणस्पर्शासाठी पुढे सरसावणार, तेवढ्यात त्यांच्या दोघांमधून एक बस भर्रकन् पसार झाली आणि लीलाधारी श्री साई अदृश्य! श्री. महेन्द्रभाई बस स्थानकाच्या परिसरात सर्वत्र सैरावैरा फिरु लागले, मागे पाहिलं, पुढे पाहिलं, दूरवर पाहिलं, सर्वत्र असलेल्या ईश्वरास सर्वत्र शोधलं, पण श्रीबाबा काही तिथे पुन्हा दिसले नाहीत. एखाद्या लहान मुलाची आई हरवावी, त्याप्रमाणे महेन्द्रभाई ओक्साबोक्शी रडू लागले. काहीजण म्हणाले, वेडबीड लागलय काय? पण अश्रू थांबत नव्हते. हृदयहिमालयातून उगम पावलेली पवित्र अश्रूगंगा नयन सरितेतून वाहात होती, तरीही श्रीबाबांनी दर्शन काही दिलं नाही. श्रद्धेला सबुरीची जोड हवी हेच खरं!

आता महेन्द्रभाई व इतर भक्त शिरडीक्षेत्री पोहोचले. मनात पश्चात्ताप होता.

श्रीबाबा अदृश्य झाल्याचे दु:ख होते. मनातल्या मनात सतत व्याकूळ होत होते. अशातच श्री. महेन्द्रभाई श्रीबाबांच्या मूर्तिकडे रात्री दहाच्या आरतीसमयी बघत असताना, अथांग भक्तिसागराच्या तळाशी त्यांच्या मनाने झेप घेतली मात्र, आणि नकळत दोन अश्रूबिंदू पापणीवर तरंगताना दिसू लागले. अश्रूबिंदू! नव्हे, भक्तिसागरातील अनमोल मोती! ! नयन शिंपल्यातून निर्मिले! ! ! चमत्कार घडतात ते तेव्हा! ! !

दुसऱ्याच दिवशी चहाच्या दुकानाजवळ श्रीबाबांनी दयार्द्र होऊन त्यांना पुन्हा दर्शन दिलं. पुन्हा चहाच मागितला. महेन्द्रभाईंच्या प्रसन्नतेला पार उरला नाही. ते सावधान बनले, श्रीबाबांवरुन नजर हलवायची नाही, असा विचार करुन, बाबांकडे स्थिर नजर ठेवून चहावाल्यास चहा बनविण्यास सांगितले. श्रीबाबांनी सुदाम्याच्या पोह्याप्रमाणे चहा स्वीकारला. चहा पिऊन होताच महेन्द्रभाई चरणी मस्तक ठेवणार होते. नटनाटकी साईदेवाने गुप्त सूत्रे हलवली. अचानक कुठून एक फटफटी आली. त्यांचा दहा वर्षाचा गोंडस मुलगा पुढे धावला म्हणून श्री. महेन्द्रभाई घाबरले. व मुलाचा त्यांनी हात धरला आणि इकडे श्रीबाबांची खुर्ची रिकामी! परमेश्वर प्राप्तीसाठी संपूर्ण विरक्ती हवी, हेच श्रीबाबांनी ह्या चमत्काराद्वारे दर्शविले! ! चमत्कार म्हणजे ज्ञानामृताचे घट!!! पुन्हा तिसरा चमत्कार घडला. आता महेन्द्रभाई सर्वांना घेऊन आपल्या बाबांच्या द्वारकामाईत, मशिदीत गेले, जी भोळ्या भाविकांची आई आहे, असं बाबा म्हणत. सर्वांना मशिदीचा महिमा समजाविला. ते म्हणाले, "श्रीबाबा येथे ह्या दगडी चौरंगावर स्नान करीत असत." बाबांच्या वेळचे एक मातीचे पात्र दाखवून ते म्हणाले, "बाबा ह्या पात्रात भिक्षा मागितलेले अन्न ठेवत असत. सर्व प्राण्यांनी खाल्ल्यावर मग बाबा खात असत. आज ते पात्रच आपल्या हातात आहे, त्यातील तो प्रसाद नशिबी नाही. ठीक आहे. ह्या पावन पवित्र श्रीबाबांच्या पात्राला आपण मस्तकी तरी लावू या. तुकारामाच्या मनातील भावासम त्यांच्याही मनी भाव प्रगटला! त्यांनी पात्र मस्तकी लावताच तेही थोर भक्तीस पात्र आहेत, हे सिद्ध झालं!! आणि भक्तांनो, अक्षरश: त्या रिकाम्या पात्रात गरमगरम पोळी, भाजी आणि लोण्याच्या रुपात प्रसाद प्रगटला! भाववेड्या भक्तानं प्रसाद ग्रहण करण्यास सुरुवात केली, प्रत्यक्षात घडलेली सत्य हकीगत, सर्वांनी प्रत्यक्षात आपल्या चर्मचक्षूंनी पाहिली. भक्तीच्या आनंद सागरात सर्वजणं न्हाऊन निघाले! स्वर्गीय आनंदात सर्वजण रमून गेले!! 'अंगणात झाड कैवल्याचे' ह्यांचा प्रत्यय आला!!!

ईश्वर आहे, आहे आणि आहेच. दीनदयाळू आहे, परम् कृपाळू आहे, पण बऱ्याच दु:खाकडे अथवा संकटांकडे सूक्ष्म दृष्टीच्या परिक्षकाप्रमाणे पाहिलं, तर ती संकटे-दु:खे बहुतांशी आपल्या चुकांच्या परिणाम रुप असतात, प्रारब्धभोग असतात. पण हे मानून घेण्यास, आपली चूक समजून घेण्यास मन तयार होत नाही, मग आपल्यातील अज्ञान त्या परम कृपाळू परमेश्वराला अभाविकपणे दोष देऊन जातं.

वरील घटना प्रत्यक्षात पहाणारी मंडळी आजही आहेत. श्री. अंबुभाई राणा,

रहाणार फतेहगंज, श्रीमती नीताबेन जोशी वगैरे .... आजच्या विज्ञानयुगातील मानवाला सर्व गोष्टी प्रयोगानिशी सिद्ध कराव्या लागतात, साक्षी पुराव्यावाचून कुणाचाच कशावरही विश्वास बसत नाही. म्हणूनच की काय श्रीबाबांनी साक्षीला ह्या व्यक्ती ठेवल्या असतील का?

^^^^^^^^^^

# ॥ श्री सायिनाथ सुप्रभातम् ॥


– डॉ. रंगामनी संपथ
नं. ७, ६ वा रस्ता,
रामनगर, नंगनल्लूर,
मद्रास - ६०० ०६१.


1 गोदावरी तटेशीरडिकृतवासस्थल, पवित्रालय
यतीन्द्र करुणाकर लीला मानुष विग्रह ।
सादरात्सेवित भक्ताभीदृवरदायक
श्रीगुरुसायिनाथ भगवन् तव सुप्रभातम् ॥

2 उत्तिष्ट उदयगीताभियुक्ताः विबुधाः
यात्रिकाः परिभ्रमन्ति आलये तव नामसंकीर्तननिरताः ।
सर्वसमयसंमाननपारक सत्गुरो महाराजन्
श्रीसायिनाथ भगवन् तव सुप्रभातम ॥

3 उद्यानद्ये तव लेण्डीनाम्नि
विकसन्ति कुसुमानि सौगन्धिकानि ।
सायीति गाथन्ति पतंगिकीः निद्रां विहाय समुत्पता
सत्गुरुसायिनाथ भगवन् तव सुप्रभातम् ॥

4 प्राच्यामुदेति दिशिदीपशिखेव दिनकरः
प्रपन्नाः तव भक्तिनम्राः गृहीतोपकाराः ।
द्वारान्तिके स्थिताः पुष्पफलचन्दनहस्ताः
सत्गुरुसायिनाथ भगवन् तव सुप्रभातम् ॥

5 गोदावरीतीर्थभरितरजत कुंभवहिताः
आगतः तव दासानुदासाः वेदघोषाः ।
गोक्षीरनारिकेलमधुपर्काभिषेकमुदितगुरो
श्रीसायिनाथभगवन् तव सुप्रभातम् ॥

6 श्रीसायिरामेति सायिनाथेति सायिबाबा
गुरुस्वामीति नानाविध मेषभक्तजनाः ।
त्वां भजन्ति अंजलिमृताः प्रेमपूर्वाः
उत्तिष्ट सायिनाथ भगवन् तव सुप्रभातम् ॥
7 गेयं भवन्तमुपवीणयितुं प्रवृत्तान्
महालसापतिदासगणुमहाराजादि प्रमुखाः ।
द्वारिस्थिताननुगृहाण शुभैः कटाक्षैः
सत्गुरुसायिनाथभगवन् तव सुप्रभातम् ॥
8 जन्मान्तरसुकृतेन किंकरताधिराज्यं
भक्ताः जनः भुवि भवत्कृपया शरणागताः ।
भोगैः समर्चयितुमीश भवत्प्रतीक्षाः
श्रीसायिनाथ भगवन् तव सुप्रभातम् ॥
9 समाश्रितस्य सुमतेः भयं नास्तीति नूनं
हस्तेन सूचयसि श्रीसायिनाथ दयातरङ्ग ।
प्रणमन्ति पादुकां ते प्रसीद निजसुखवरद
श्रीगुरुसायिनाथ भगवनं कुरु सुप्रभातम् ॥
10 निरन्तरजनाज्ञानविमोचन विचक्ष
नारायण कृपापात्र श्रीदत्तात्रेयांश संभव ।
परतत्व प्रबोधक प्रणतार्तिविनाशक
गुरु सायिनाथ भगवन् कुरु सुप्रभातम् ॥
11 विश्वोपकारकणाय कृतावतार वेङ्कुशदास
त्यक्तशरीर आत्मस्वरुप अभयप्रदानव्रत ।
व्यक्ताव्यक्तस्वरुप विनतजनशरण्य
सत्गुरुसायिनाथ भगवन् कुरु सुप्रभातम् ॥
12 श्रितनिर्बुतरुमूल विश्रान्तिनिलय
महायोगीश्वर सर्वभारभृत महाबल ।
श्रृणोषि महागुरो ननु शंखघोषं
उत्तिष्ट जय सायिनाथ भगवन् कुरु सुप्रभातम् ॥

# ॐ श्रीसाई सुखदायी

**श्री. बा. ना. तळवाडकर**
रावळगांव, जि. नासिक.

पूर्वी गावोगावी मारुती, देवी, महादेव ह्यांची मंदिरे अधिक होती. राम, कृष्ण व दत्ताची मंदिरेही गावोगांवी कांही प्रमाणात झाली. विठ्ठलमंदिरे वारकरी संप्रदायामुळे वाढलीत. साईभक्तीमुळे आता साईमंदिरे अनेक ठिकाणी होताहेत, कारण ते सुखदायी आहेत.

सुंदर मानवजन्मात देहात सुंदर मन ही ठेवले पाहिजे. मनाच्या शक्तीवर मानवदेहाचा विकास होऊन व्यक्तिमत्वाच्या स्मृती कीर्तीरुपाने उरतात. त्या ह्या मानवजन्मांतच. बौद्धिक पातळीवरुन विश्वाचा व निसर्गशक्तीचा शोध मानवच घेतो. इंदियसुखातून उत्तम समाज निर्मिती मानव करतो ती संयमपूर्ण विवेकांतूनच. परस्पर भावना निकोप समाजात प्रेममय व सहकार्यमय करण्यासाठी एका श्रद्धेय स्थानाची आवश्यकता असतेच. मंदिरांच्या संस्थापने मागे हाच सद्हेतु. एकमेकां साह्य करुं, अवघे धरु सुपंथ, म्हणतात ते ह्यासाठीच. श्रेष्ठ विभूतींची पूजा व उपासना त्याच्या गुणसंकीर्तनाद्वारा व्यक्तित्व उंचावण्यासाठीच असते. श्रद्धा असल्याशिवाय कार्यच सिद्धीस जावू शकत नाही. मनातंली श्रद्धेची गोड अनुपम शक्ति कार्यांत उतरली की योग्यवेळी मनोवांछिते पूर्ण होतात. ॐ श्री साई सुखदायी आहेत. त्यांनी भारतांत आईप्रमाणे जनमानसाला मनाची व बुद्धीची पातळी उंचावण्यासाठी 'कफनीसोटाकटोरा' घालून भाकरी-पिठले खिचडी खाऊन मस्जिदित धुनीजवळ समर्पित दैवीजीवनाचा शोध लावून बोधाची उदी देऊन ज्ञानवैराग्याचा संदेश दिला. म्हणून सामान्य-असामान्य, सुखी-दुःखी, गरीब-हरीब, लहान-मोठा, स्त्री-पुरुष, ज्ञातीवर्णधर्मभेद विरहीत समता व एकतेचा हा दृष्टा प्रबोधक प्रतिनिधीक श्रद्धेचे स्थान ठरला आहे. त्या समाजसेवकाचे ऋण फेडून तत्वाचरण रहाण्यासाठी आतां ठेकठिकाणी साईमंदिरे बांधण्याचा, साईसंमेलने भरण्याचा, साईसमाज फुलविण्याचा एक मोठा प्रवाह जनतेने सुरु केला आहे. आज तर संख्यात्मक वाढ जेथे थे आहे तशी गुणात्मक वाढ होण्यासाठी समाजधारणा शांती संतोषमय होण्यासाठी सल्या उपक्रमांची गरज आहे. एका पूज्य विभूतीपूजेनिमित्ताने असंख्य जनमने कलित होतात. भावनिक ऐक्य वाढते. बंधुभाव वाढतो. सहभावना वाढतात. हजीवन लाभते. समता एकता मनांत रुजते. साईचरित्र सर्व माणसांना बोधकारी व खदायी आहे. म्हणून त्यांचा चैतन्यमय प्रसाद भारतात सर्वत्र सतत मिळत आहे.

## विरंगुळा व नवा उत्साह

माणसाला तेच ते काम, तीच ती दिनचर्या, तेच ते गांव, तेच ते घर, तीच ती माणसं ति सतत कर्मयोग योगक्षेमासाठी अपरिहार्य व वस्तुतः नित्यांचा विचार म्हणून स्थैर्य यवस्था ह्या दृष्टीने त्या त्या वातावरणांत रमणे योग्य ही आहेच परंतु सातत्याने

एकाच गोष्टीचा कंटाळा येतो. नूतन बदल हवा असतो. विश्रांती हवी असते. मनोरंजन हवे असते. वातावरणांत बदल हवा असतो. नवे कांही पाहयला, राहयला, ऐकायला, शिकायला हवे असते. नवा उत्साह हवा असतो, विरंगुळा म्हणून पर्यटन व पवित्र ठिकाणी थोर देवता वा विभूतीदर्शन हवे असतेच. त्यादृष्टीने भारतांत अशा स्थळांची वानवा अनादि कालापासून नाही. भावभक्तीच्या हा देश आहे. विविध संस्कृतींचा हा देश आहे. त्या सर्वांना जोडणारे ठिकाण श्रीसाईबाबांचे शिर्डी आहे. तेथे सर्व ज्ञाती धर्माचे बांधव येतात. नव्या उत्साहाने परत जातात. राहतात व विरंगुळा मिळवितात.

## वाचनीय संग्राह्य वाङ्मय

शिर्डी संस्थानात व मुंबई साईनिकेतनांत वाचनीय व संग्राह्य साईवाड्मय पुष्कळच मिळते. त्यांची साहित्यसूचि मागवून हवे ते मागविता येतेच. शिर्डी के साइबाबा व शिर्डीचे श्री साईबाबा हिंदी मराठी चित्रपटही कांहींनी पाहिलेले आहेत. साईसाहित्याच्या कॅसेटस् ही विकत मिळतात. श्रीसाईसच्चरित्र तर दाभोलकरकृत नामांकित व गीताबोधपर मोटी पोथीच आहे. अनेक लेखक कवीची छोटीमोठी पुस्तके साईभक्तीवर मिळतात. शिर्डी संस्थानचे 'श्री साईलीला' कोपरगांवचे 'साईसंदेश' आणि मुंबईचे साईप्रसाद, तसेच हिमाचल प्रदेशचे 'श्री साईमहिमा' इंग्रजी अशी नियतकालिकेही पोस्टाने मिळतातच. इतकेच नव्हे तर बरेचसे प्रादेशिक स्वरुपांत मेळावे, स्नेहसंमेलने, सप्ताह, उत्सव देखील होतात. विचार प्रसारण महत्वाचे आहे. साई प्रचार व आचार असाच वाढत जाणारच आहे.

## साईसमाज

अखिल भारतीय पातळीवर ठिकठिकाणी साईभक्त विखुरलेले असताना ऑल इंडिया साईसमाज मद्रास ह्या संस्थेने आतां तर पुढील वर्षी रौप्यमहोत्सवी अधिवेशनापर्यंत मजल येऊन ठेपली आहे. भोपाळ व मुंबईत अनेक साईमंदिरे आहेत. श्री. साईबाबा संस्थान, शिर्डीची विश्वस्त समितीचे सर्वच सदस्य साईसमाज वार्षिक होण्यासाठी झटतात. विधायक विविध सुधारणा घडवितात. यात्रेकरुंना समाधान देण्यासाठी कौशल्यपूर्ण नियोजन आखतात. ही साईभक्तीने भारावलेली मोलाची माणसं आहेत. ह्याशिवाय असंख्य साई नांवाने विभूषित संस्था, भक्त, कवि, लेखक संपादक, वाचक, ग्राहक, भाविक, यात्रिक, सर्व थरांतील मान्यवर व्यक्ति साई समाजात मोडतात. श्रद्धा साईंवर सबूरी साईंची कृपा ह्या तत्वावर सारे कांही यश येत आहे. पू. नरसिंहस्वामी लिखित 'चार्टर्स अँड सेइंगज' इंग्रजी पुस्तक विदेशी साईभक्तांना देखील उपयुक्त होईल. 'अल्ला मालिक भला करेगा' हा साईंचा आशीर्वाद आणि 'सबका मालिक एक हैं' हे सूत्र ११ साईवचने आणि आयुर्वेदीय वनस्पती रसायन नसले तरी सत्वहीन निकोप शून्यविकारी उदी तथा अंगारा, साई समाजास विवेकमय वैराग्यशील बनवितो. चिंता, आपत्ती, व दुःखे कमी करतो. 'साई साई' जपणारे आणि ॐ साई श्री साई जय जय साई मंत्र म्हणणारे साईभक्त स्वतःला

देहाचा विसर पाडून चित्त प्राप्त करुन घेऊन साईप्रसाद वाटतात, साईकृपा मिळवितात. साईसमाज स्वतःला विसरुन साईमय होऊन परमार्थात अनेक जीवांना शांत भक्तिरसांत डुंबवितो हे प्रात्यक्षिक प्रयोगाने सिद्ध होत आहे. साईबंधू, साईभगिनी, साईकन्या, साईपुत्र, साईभैय्या, साईसेवक, साईदास अशा अनेक टोपणनावांनी कितीतरी व्यक्तिनी समाज धर्म 'साईसमाज' म्हणून स्वतःला हरपून साईसेवेत सतत गुंतवून घेतलेले आहे. पूर्वसूक्त त्यांचे निश्चित चांगले म्हणून साईमय जीवनाने त्यांना चिरानंद व परमानंद मिळतो. समतेत व एकतेत मानव म्हणून जगायचे समाधान मिळते. मनोभावे भक्तीचा अविष्कार त्यांचे योगक्षेमाची चिंती श्रीसाईच करतो व त्यांना सुखी करतो. ॐ श्री साई सुखदायी ।

## ॥ ज्याच्या मुखी नाम साई ॥

ज्याच्या मुखी नाम साई त्याला चिंता भय नाही
ज्याच्या मुखी नाम साई, साई दिसे ठाई ठाई
त्याला रक्षी बाबा साई
* साई दरबारी येई तोचि ज्याचे भाग्य थोर
साई माऊली पावे ज्याच्या मनी श्रद्धेचा पूर
साई कृपेची छाया लाभे ज्याची असे पुण्याई
* भक्त साईचा होई जो, तो वाया कसा जाईल
साईबाबा तारील ज्याला, त्याला कोण मारील
जन्मोजन्मीचा कैवारी साई, मोक्षपदी नेई
* साईलीलेने भारुनी गेले अज्ञानी, ज्ञानी महंत
आत्मानंदाला सीमा नाही बाबांच्या भक्तित
साई नामाचा महिमा भक्ता संजीवनी देई
ज्याच्या मुखी नाम साई त्याला चिंता भय नाही

**— श्री. जयवंत कुलकर्णी**
कुलकर्णी कुटीर, १०, प्रार्थना समाज रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.

# उदात्त प्रेम देवाचे

– **सौ. रेखा सुरेश पवार**
द्वारा श्री. सुरेश मारुती पवार.
इरिगेशन, कॉलनी,
मु.पो. पानशेत, जि. पुणे.

अनेक उद्देशाने, अनेक हेतूंनी लोक एकमेकांवर पेम करतात. त्यात माऊलीचे प्रेम, माया सर्वश्रेष्ठ समजतात. अत्यंत नैसर्गिक, आकंठ प्रेम देणारी ही माता प्रेमाचे प्रतिक मानली जाते. तिची पूजा केली जाते. देवाच्या प्रेमालाही तिची उपमा देतात. त्याची थोरवी अनेक संतांनी आजवर गायली. अक्षर, अक्षय आणि तरीही सहजतेने केले जाणारे हे प्रेम त्या अर्भकाबरोबर जन्माला येते, उपजते, आणि त्या प्रेमालाही कक्षा पडतात, किंबहुना त्या कक्षा ही त्या बालकाबरोबर उपजतात. जीवनभर अविरत वाहणारा हा प्रेमाचा ओघ, हे मातृप्रेमाचे दर्शन मात्र सर्वत्र होत राहते, अगदी मूक प्राण्यांमध्येही. असे हे अनुपमेय, उदार, निरपेक्ष आणि अंतःकरणपूर्वक केलेले प्रेम उदात्त मात्र होवू शकत नाही. स्वतःच्या बागेतल्या झाडांवर, फुलांवर निरतिशय प्रेम करणारा हा माळी, त्या बागे बाहेरील जगाला ओळखतही नाही. दहा हजारात एखादी तरी मातोश्री आपल्या मुलांपेक्षा इतरांच्या मुलांवर अधिक प्रेम करीत असेल कां? "लक्ष्मी", "लक्ष्मी" म्हणून आणलेल्या सूनेकडे तरी मातेच्या नजरेने पाहते कां? उदात्त ही तीन अक्षरे ह्या प्रेमाला वंचित होतात, उपजत प्रेमाच्या पलिकडे ते जावू शकत नाही.

तारुण्यात स्त्री-पुरुषांनी परस्परांवर केलेल्या प्रेमास कवी अनेक उपमा देतात. समोरचे फळ हे लाकडी रंगीत आहे, हे माहीत असून सुद्धा हव्यासाने मारलेल्या चोची रक्तबंबाळ होतात, आणि त्या रक्तालाच अमृत समजून प्राशन केले जाते. या उपर मस्ती-धुंदी आल्याने जगाचाही विसर पडतो. भगवंताचा विसर तर फार लवकर पडतो. जेथे भगवंताचा, त्याच्या नामाचा विसर पडतो, ते प्रेम काय कामाचे! तेथे सारे उपभोगाचे साम्राज्य. सर्व इंद्रियांनी उपभोग घेवून तहान भागत नाही म्हणून मग मदतीला मनही धावते. अशा प्रेमाला केवळ फरफटण्या शिवाय काही मिळत नाही. ही फरफट मग तारुण्याला उपभोगाच्या घाणीवरुन ओढत नेते. जेव्हा शुद्ध येते तेव्हा हे चक्र वृद्धापकाळाच्या काळझाडाखाली विसाव्याला थांबलेले असते. सारे-सारे संपलेले असते, सारे सारे सरलेले असते.

आता सोबत फक्त उद्विग्ना असते. स्वार्थासाठी काय काय नाही केले? त्यागाचा बुरखा पांघरुन घेवून अनंत पापे केली. ती एक-एक करुन भयावह रुप धारण करतात व स्वतःचीच घृणा वाटू लागते. ज्यास गळ्यातला हार समजत होतो, तो एक उपभोगात्मक प्रेमाचा नादानपणा होता, हे जाणले जाते. फार उशिरा हे घडून येते. त्यावेळी तुटकी-फुटकी नौका, ती पण वल्ह्याशिवाय राहिलेली असते. एकाकी, अगदी एकाकी अवस्था!

किंचित् वळून आता ह्या विश्वातील स्थूल वस्तूंपासून अगदी सूक्ष्मापर्यंत व्यापून उरलेल्या त्या जगन्नियंत्यास पाहू, त्याच्या प्रेमास आजमावू. नीटसं ठेवणीने सजविलेले हे शरीर त्याच्या कलेचा व विज्ञानाचा दाखला देते. ह्या साडेतीन हात देहात त्याच्या दानाचे स्मरण, चिंतन करावे म्हणून मेंदूही दिला आहे, पण तिकडे आपण डोळेझांक करतो.

निसर्गात तर त्याच्या दातृत्वाचे विशाल दर्शन आपणास घडते. झाडांवरच्या पानांफुलांपासून डोंगर, पर्वत, नद्या, सागर हे सेवेस तत्पर आहोत, हेच सांगत असतात. काही क्षण जरी अंतर्मुख होवून विचार केला,तर त्याच्या दातृत्वाला, त्याच्या प्रेमाला परिसीमा नाहीत, हेच जाणवेल! चंद्र आपले चांदणे मुक्त हस्ते लुटत असता त्याचे तथ्य कितीकांना उमगते. आपल्या जीवनात त्याचे 'सार' कितपत आचरले जाते? नित्य नियमाने पूर्व क्षितिजांवर येणाऱ्या तेजाच्या गोळ्याची नीत्य प्रभाती आपण पूजा करतो. तेव्हा त्याचे ऋण आपण फेडू शकतो? काहीही शक्य नसल्याचे जाणवते. इत:परही त्याचे उदात्तप्रेम आपणास दिसत नाही.

परमेश्वर कधीही परतफेडीची अपेक्षा ठेवीत नाही, व जर कधी हे उदात्तच दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी येते तेव्हा त्या दुष्टत्वाची परिणीती मोक्षपदापर्यंत नेवूनच करते. सतत प्रेमाची पखरण करणे हा धर्मच भगवंताचा, ह्या धर्माचे अनुसरण करणारे महात्मे, संतही देवत्व पावले आहेत.

वास्तविक प्रत्येक मनुष्यास आधार हा आवश्यक असतो. मग अपूर्ण, कमकुवत आणि विषयाने लडबडलेले आधार काय कामाचे? जे प्रेम संपूर्ण निर्भयता देवू शकत नाही, ते प्रेम म्हणजे काळोख्या, वादळवाऱ्याच्या रात्री मिणमिणणाऱ्या ज्योतीप्रमाणे असते. त्यासाठी प्रकाशाच्याही स्वामीला शरण जा व त्याचा आधार मागा. मनाने, निश्चयाने, बुद्धीने त्याच्याकडे जा. श्रद्धा व सबूरीने दोन हात जोडा व त्याचे प्रेम अनुभवा, त्याच्या प्रेमावर प्रेम करा. साऱ्या इंद्रियांनी त्याच्या ध्यासात रहावे आणि मनास प्रेमरसात समरस होऊ द्यावे. द्वेषदंभ कापूर म्हणून जाळावे. नी, पहा तोच तुमची पूजा करेल! जगातला सर्वोच्च आनंद मिळवा. कसोटीच्या दगडावर तुमचे सोने पारखा. अन् त्या उदारा (अवलिया) कडून वारेमाप किंमत मिळवा, खरे उदात्त प्रेम अनुभवा. जीवन सार्थक करा!

भैरवी

# एक तुझा आधार

एक तुझा आधार,
साई, मज एक तुझा आधार ॥
जळणाऱ्या या जीवदशेवर धर प्रेमाची धार ॥धृ॥
अडले पाऊल मार्गावरती
कुंठित झाली जीवित्वगती
सोडुन गेले सखे सोबती
सभोवती अंधार, साई मज एक तुझा आधार ॥१॥
चिर शाश्वत ते मुळी न उमगले
क्षणिक सुखास्तव मन धडपडले
साई, तुझे बळ मला न कळले
चुकलो वारंवार, साई मज एक तुझा आधार ॥२॥
असार झाला हा संसार
तूच दयाघन करुणासागर
तुझ्या पदावर अवघा भार
तार मला वा मार, साई मज एक तुझा आधार ॥३॥
तू माता, तूं पिता, सुबंधू
करुणेचा तू अथांग सिंधू
क्षुद्र एक मी केवळ बिंदू
तुझा कळेना पार, साई मज एक तुझा आधार ॥४॥

— **श्री. चकोर आजगांवकर** एम.ए.
वाय्. ११/१७०, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई -५१.

# माझा साई

भक्तांच्या मनात
वसतो माझा साई
दाखवी प्रकाश
श्रध्दा सबुरीचा ॥१॥
सांगतो कानात
सबका मालिक एक
हाकेला धावतो
तत्पर उदार ॥२॥

— **श्री. गणेश मोरे**
जरीमरी - कुर्ला.

# 'द' अक्षरातील उपदेश

— श्री. बबन डी. येरु
१/५, कल्याणजी देवजी चाळ
चिरागनगर, घाटकोपर, मुंबई - ८६

प्रजापती ब्रह्मदेव हे देव, मानव व दानव यांचे गुरू होते. हे सर्व शिष्य भावनेने विद्या शिकण्यास गेले होते व ब्रह्मचर्य पालन करून त्यांची सेवा करीत होते.

अशा प्रकारे काही काळ लोटल्यानंतर या तिघांना वाटले की, गुरुजींनी आपणास उपदेश करावा.

सर्व प्रथम देव ब्रह्मदेवाकडे गेले. त्यांनी ब्रहमदेवाची स्तुती करून म्हटले, 'हे भगवन्, आम्हाला उपदेश करावा.' प्रजापतींनी उत्तरे देताना 'द' हे अक्षर दिले व म्हटले हाच माझा उपदेश. देवगण विचार करू लागले, आपण देवगण स्वर्गात राहतो. स्वर्गामध्ये अनेक प्रकारचे भोग आहेत. आपण सदैव देवलोकातील भोगविलासात मग्न असतो, म्हणून 'द' चा अर्थ दमन असा असावा. दमन म्हणजे इंद्रिय संयम. स्वतःला कृतकृत्य मानून व प्रजापतींना वंदन करून देव निघाले. इतक्यात ब्रह्मदेव म्हणाले, 'देवानो, मी दिलेल्या शब्दाचा अर्थ तुम्हाला कळला ना?' देव म्हणाले, 'हो, तुम्ही आम्हाला इंद्रिय-दमन करण्याची आज्ञा दिली आहे.' प्रजापती म्हणाले, बरोबर आहे. माझ्या उपदेशानुसार वागलात तर तुमचे कल्याण होईल.'

त्यानंतर मानवांनी प्रजापतीकडे जाऊन उपदेश करण्याची विनंती केली. तेव्हा प्रजापतींनी त्यांनाही 'द' शब्द दिला. मानवांनी विचार केला, आपण कर्मयोनीतब आहोत. सदैव लोभवशात कर्म करतो व अर्थ संग्रह करण्यातच मग्न असतो. म्हणून प्रजापतींनी आपल्याला 'दान' करण्याचा उपदेश केला आहे. सर्व मानवांना यात आनंद वाटला. तेव्हा प्रजापतींनी त्यांना उपदेशाचं मर्म काय, असं विचारलं. संग्रह प्रिय मानव म्हणाले, 'आपण आम्हाला 'दान' करण्याची आज्ञा दिली आहे.' ब्रह्मदेव प्रसन्न झाले. त्यांनी त्यांना म्हटले की, माझ्या म्हणण्याचा हाच अर्थ आहे. त्यानुसार वागलात तर तुमचे कल्याणच आहे. आता पाळी होती, राक्षसांची म्हणजे दानवांची. त्यांनी ब्रह्मदेवाकडे जाऊन उपदेश करण्याची विनंती केली. ब्रह्मदेवांनी त्यांना 'द' अक्षर दिले. दानवांनी 'द' अक्षराचा असा विचार केला की, आपण लोक स्वभावाने हिंस्त्र आहोत. क्रोध व हिंसा आपला नित्याचा व्यापार आहे. म्हणजे प्रजापतींनी आपणास या दुष्कृत्यापासून दूर राहण्यासाठी 'दया' करण्याचे सुचविले आहे. असा विचार करून ते निघणार, इतक्यात ब्रहमदेवांनी त्यांना विचारले, 'माझ्या उपदेशाचा तुम्हाला अर्थ कळला का?' तेव्हा हिंसाप्रिय असूर म्हणाले, 'देवा, आपण आम्हाला 'द' शब्द देऊन प्राणिमात्रांवर दया दाखविण्याचं सुचविलं आहे.' हे ऐकून प्रजापती ब्रह्मदेव आनंदाने म्हणाले, 'वत्सांनो, बरोबर आहे. तुम्ही द्वेष सोडून सर्व प्राणीमात्रांवर दया करा, यातच तुमचे कल्याण आहे.'

देव दानव मानव सर्वांचे यातच कल्याण ।
जर जाणाल 'द' म्हणजे दमन, दया व दान ॥

# अरे साई –

– सौ. नीता जाधव
६२९, सरेकर आळी,
मु. पो. महाड, जि. रायगड.

अरे साई, तू तरी असा कसा रे? खरंच का रे तू माझ्या झोपडीच्या दारात आला होतास? काय बरे मी घातले तुझ्या त्या फाटक्या झोळीत? फक्त एक चतकोर भाकरी. आणि त्या चतकोर भाकरीवर केवढे हे व्याज! साई, कमाल आहे तुझ्या दातृत्वाची. तुझ्या दया दातृत्वाला अंत नाही पार हेच खरं. माझ्या सारख्या अज्ञानी जीवाला ते काय कळणार म्हणा! अरे साई, त्रिभुवनाचा कुबेर तू. तुला काय कशाचे कमी! तरी केवळ तुझ्या लाडक्या भक्तांसाठी तू दारोदार फिरण्याचे कौतुक करीत होतास. जो जितेंद्रिय परमेश्वर त्याला खायचे तरी काय कौतुक. ती भाकरी, ती आमटी, भाजी, ताक, दूध साराच काला. पण त्याच्यापुढे अमृत ते काय? जिव्हा ज्याने जिंकली त्याला चव ती काय? श्रीकृष्णाचा गोपाळकाला नाही का सारे सवंगडी मिटक्या मारीत मारीत खात. तेच तुझ्या भिक्षेचे कौतुक. भिक्षा तरी काय ती तुझ्यासाठी होती! पण तू दाखवून दिलेस नम्र झाल्याशिवाय मोठेपणा मिळत नाही. सारं सुटल्या शिवाय मोठेपण जडत नाही. घणाचे घाव सोसल्याशिवाय मूर्ती घडत नाही. बाबा भक्तांसाठी तू का कमी सोसलंस. दुसऱ्याचा ताप आपण स्वतःवर ओढून घेतलास. दुसऱ्याच्या प्लेगच्या गाठी स्वतःवर ओढून घेतल्यास एवढंच नाही तर तात्यासारख्या भक्ताचे मरण सुद्धा स्वतःवर ओढवून घेतलंस धन्य तो भक्त आणि भक्तांसाठी स्वदेह अर्पण करणारा धन्य धन्य तो साईश्वर. अरे साई करशील तरी किती? मला तर तू वेड लावलेस वेड. साईचे वेड. साई नामाचे वेड. रात्रंदिन साईला पहायचे वेड. क्षणभर सुद्धा मी तुझ्याशिवाय राहू शकत नाही. माझ्या मनोमंदिरात तुझीच मूर्ती आहे. मुखाने तुझे सतत नाम आणि भजन. फार मोठी शक्ती तू मला दिली आहेस, अगणित शब्दसंपत्ती ज्याच्या सहाय्याने साईची भजने उमलत आहेत. बाबा खरंच का मी तुला त्रास देते. पण मला आता तुझ्याशिवाय काही काही नको. क्षणभर जरी तू दूर झालास तर मला भीती वाटते रे, या साऱ्या जगाची, प्रपंचात उड्या मारणाऱ्यांची, कोलांट्या उड्या खाणारांची, प्रपंच सर्वस्व मानणाऱ्यांची. कदाचित तुझ्या मंदिरातून माझे पायही तिकडे वळतील. माणसाच्या मनाचा काय भरवसा. पण मी माझे मन तुलाच अर्पण केले आहे. आता तो माझा मार्ग नाही साईराजा. माझा मार्ग एकच तुझ्या भक्तीचा. कुठे जायचे तर शिरडीला तुझ्या दर्शनाला. वाचायचे ते साईसत्चरीत. पहायचे ते तुझे मनोहारी रूप. खायचे ते तुला अर्पण केलेले अन्न. चैन पडत नाही तुमच्यावाचून त्याला मी काय करू बाबा. या शरीरातील शेवटचा श्वासदेखील साई साई म्हणतच बाहेर पडू दे.

अरे साई तू म्हणशील, अग तू माझीच आहेस. तुझा आता जन्म मरणाचा फेरा चुकला. साई नाम गाता गाता तू मुक्त झालीस. पण ते काही नाही, या प्रपंचातून मला

मुक्त कर. पण मला पुनर्जन्म हवा राजा. तो फक्त तुझे नाम घेण्यासाठी, तुझे गीत गाण्यासाठी, तुझी सेवा करण्यासाठी. तुझ्या राऊळातला मी केर सुद्धा काढीन. पण मला पुनर्जन्म दे. अरे साई, ही विनवणी पुन्हा पुन्हा करते.

जन्मोजन्मी ठेव मज तुझ्या पायाशी
हीच एक आस सदा ठेवी हृदयाशी ।

अरे माझी तरी तू किती किती काळजी घेशील. मला सकाळी उठायला उशीर व्हायला नको म्हणून स्वत: जागत बसतोस आणि वर हलवून जागे करीत सांगतोस, "अगं उठतेस ना! तू झोपलीस पण मी मात्र जागाच आहे." मन भरून आले. माझी साई माऊलीच तू. माऊली शिवाय लेकराला कोणाची काळजी असणार म्हणा! जिथे जिथे माझी दृष्टी जाते, तिथे तिथे तूच असतोस राजा. ज्या ज्या दुकानात तुझी तसबिर त्याच दुकानात माझे पाय वळतात. ज्या रिक्षेत तू आहेस तीच रिक्षा मला मिळते. ज्या गाडीत तूच आहेस ती गाडी माझ्यासाठी असते. अगदीच नाही तर शेजारच्या माणसाच्या घड्याळावर किंवा अंगठीवर तूच असतोस. शिर्डी माहेराला निघाले की अगदी घरापासून सोबत माझा माघारी बंधूच. सावली सारखा पुढे मागे, पुढे मागे. साई अरे किती किती जपशील रे मला. सगळ्या हौशी पुरवितोस. किती बंधु, किती भगिनी, माता तू मला दिल्यास. त्या मला सांभाळण्यासाठीच ना! अरे साई अगदी निरंतर तू माझा होऊन राहिला आहेस. माझ्या हृदयात तुझ्याशिवाय काही काही नाही.

साईवीण काही न उरले मन मंदिरात
साई साई दे रे मला एक तुझी साथ

माझ्या साईच्या लीला सांगू तरी किती? जशा कृष्णाच्या लीला सांगता सांगता गोप गवळणी कृष्णमय झाल्या. साईलीला गाता गाता अरे साई मलाही साईमय होऊ दे. साईमय जीवन मला जगू दे.

अरे अरे साईनाथा
एक तुझे नाम गोड
भवतीचं जग द्वाड
मला तुझीच आवड ।

अरे अरे साईनाथा
मी तुझीच रे पोर
तुजवीण काहीच नाही थोर
नाम घेता घेता करी बेडा पार ।

# खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

साईनंद

शुक्रवार, दिनांक २६-१-१९१२

आज सकाळी मी खूपच लौकर उठलो. वेळेच्या बाबतीत काहीसा घोटाळा-गैरसमज झाला. सूर्योदयाला अद्याप वेळ आहे, असे समजून मी प्रार्थनाही पूर्ण केली आणि वऱ्हांड्यात येरझारा घालीत राहिलो. मला वाटते, मी नेहमीपेक्षा निदान दीडतास तरी अगोदर उठलो होतो. सूर्योदयानंतर मी माझ्या दैनंदिन कामकाजाला सुरूवात केली आणि आम्ही बाहेर पडलो. आम्ही परमामृतातील काही पाठांचे थोडेसे वाचन केले. आणि साईबाबांचे ते बाहेर जाताना आणि परत येतानाही दर्शन घेतले. मला काहीशी अस्वस्थता वाटू लागली म्हणून मी काही वेळ नुसता पडून राहिलो.

शनिवार, दिनांक २७-१-१९१२

आज सकाळी मी लौकर उठलो, प्रार्थना केली आणि काकड आरतीला हजर राहिलो. साईबाबा काही एक शब्द न बोलता मशिदीत गेले असे कधीच झाले नाही परंतु आज मात्र ते फारसे काहीच बोलले नाहीत. मी, उपासनी, बापूसाहेब जोग आणि भीष्म यांनी परमामृताच्या पाठाचे वाचन केले आणि साईबाबांचे ते बाहेर जाताना आणि परत येतानाही दर्शन केले. मध्यान्हाची आरती ही व्यवस्थित पार पडली आणि त्यानंतर आम्ही आमचे दुपारचे भोजन केले. मी काही वेळ विश्रांती घेतली. नंतर उठल्यावर एक पत्र लिहिले आणि दुपार नंतर दिक्षित वाचत असलेल्या रामायण कार्यक्रमास हजर झालो. आम्ही साईबाबांचे ते संध्याकाळच्या रपेटीस जात असताना दर्शन घेतले आणि ते यावेळी प्रसन्नतेने बोलले पण त्यांच्या चेहऱ्यावर गांभीर्य मात्र होते. शेवटी ते मोठ्याने आणि आवेशपूर्ण आवाजात बोलले. मला असे दाखवून देण्यात आले की, अंधार जसजसा वाढत चालला होता, तसतसे ते अधिकाधिक जोरजोराने बोलत होते. इस्लाम धर्माचा स्वीकार करणारा इब्राहीम खिंडीच्या जवळच असलेल्या एका तुटलेल्या भिंतीवर हात ठेवून उभा राहिला होता. त्याची निर्भत्सना ते करीत होते. त्याचबरोबर राधाकृष्णामाईकडून त्यांचे कपडे का धुतले गेले होते, त्याबद्दलही ते रागावले होते. हे आणखीन एक त्यांच्या संतापाचे कारण होते.

रविवार, दिनांक २८-१-१९१२

मी काल रात्री चांगला झोपलो आणि वेळीच सकाळी उठलो, प्रार्थना केली आणि दिवसभराच्या कार्यक्रमास सुरूवात केली. मी सुमारे आठ वाजण्याच्या वेळी खंडोबा मंदिरात गेलो. तिथे उपासनी महाराज राहत होते, त्यांचेबरोबर बसून गप्पागोष्टी केल्या. हे एक छोटेसेच पण रमणीय असे स्थान आहे. आम्ही परमामृताचा वर्ग बापूसाहेब जोगांच्या निवासस्थानी भरविला. कारण माझ्या निवासस्थानाच्या समोर

वऱ्हांड्यात बसून वेदांतावर चर्चा व वाद होई, त्यामुळे माझ्या आजारी असलेल्या बलवंत नावाच्या मुलाला त्रास होत असे. आम्ही साईबाबांचे ते बाहेर जाताना व पुन्हा मशिदीत परतत असताना दर्शन घेतले. आम्ही प्रात:कालीन वेळेचा काय सदुपयोग केला, याची त्यांनी विचारपूस केली आणि मी पण त्यांना आम्ही सकाळपासून जे जे काही केले, त्याचा वृत्तान्त कथन केला. ते प्रसन्न मुद्रेत दिसत होते आणि मध्यान्हाची आरती पण सुखरुपपणे पार पडली. फक्त एवढेच काय ते की राधाकृष्णामाई बाहेर निघून गेली. ती काहीशी नाराज दिसत होती. तिने आपल्या घराचे दरवाजे पण बंद करून घेतले होते. दुपारच्या भोजनानंतर मी काही वेळ लवंडलो व उठल्यावर एक पत्र लिहिले. नंतर दिक्षितांच्या रामायणांच्या पुराण पाठात सामील झालो. त्यानंतर आम्ही साईमहाराजांचे ते संध्याकाळच्या रपेटीस बाहेर पडतानाचे वेळी दर्शन घेतले. नंतर वाड्यातील आरती झाली. भीष्मांची प्रकृती ठीक नव्हती म्हणून त्यांच्या भजनांचा कार्यक्रम झाला नाही. रात्री शेजारतीहून परतल्यावर दिक्षितांनी नेहमीप्रमाणे रामायणाचा पाठ केला.

सोमवार, दिनांक २९-१-१९१२

आज मी सकाळी बराच लौकर उठलो, प्रार्थना केली आणि कळून चुकले की मला आज बरीच लौकर जाग आली. मी जागाच राहिलो आणि काकडआरतीत सामील झालो. तेथून परतल्यावर मी दैनंदिन कामकाजास सुरूवात केली. सकाळी ९ वाजता बापूसाहेब जोगांकडे गेलो. तिथे ते व उपासनी यांच्याबरोबर परमामृतास आरंभ केला खरा, परंतु इतकी झोप मला येत होती की, त्यामुळे मी कसलीच प्रगती करू शकलो नाही. शेवटी मी माझ्या निवासस्थानी परतलो आणि झोपून टाकले. मी इतका झोपलो की, दुपारचे १२-३० किंवा १ वाजला असावा. मी झोपूनच राहिलो. माधवराव देशपांडे आणि इतरांनी मला दुपारच्या आरतीच्या वेळेसाठी म्हणून जोरजोराने हाका मारून उठविण्याचा, जागे करण्याचा प्रयत्न केला. परंतु मी त्यांना कसलेच उत्तर दिले नाही. शेवटी ती मंडळी आरतीला गेली आणि कसे काय कुणास ठाऊक, ही हकीगत साईबाबांच्या कानावर ही जाऊन पोचली आणि मग त्यांनी त्यावर म्हटले की, आपण त्यांयना कोणत्या ना कोणत्या उपायाने जागे करतो, जाग आणतो. जशीजशी आरती संपत आली आणि मला जाग आली आणि मी आरतीच्या शेवटचे चरणाच्या वेळी आरतीला हजर झालो. मी इतका वेळ झोपून राहिलो, याची मलाच लाज वाटली. मी दिवसभरात तसाच गुंगीच्या अवस्थेत होतो. सोलापूरचे नारायणराव बामणगावकर आज आले. ते एक चांगले सुस्वभावी तरूण आहेत. मी त्यांचेबरोबर गप्पागोष्टी करीत राहिलो. नंतर मी दुपारनंतर दिक्षितांच्या पुराण पाठास हजर राहिलो आणि सायंकाळी साईसाहेबांचे ते सायंकाळच्या रपेटीस जातानांचे वेळी त्यांचे दर्शन घेतले. ते सकाळी ९ व १० च्या मध्ये बाहेर पडले होते. तेव्हा त्यांचे मी दर्शन घेतले होते. सायंकाळी भीष्मांच्या भजनाचा कार्यक्रम व त्यानंतर दिक्षितांच्या पुराण पाठाचा कार्यक्रम झाला. त्यांनी नित्याप्रमाणे रामायणाचा पाठ सादर केला.

मंगळवार, दिनांक ३०-१-१९१२

आज सकाळी मला लौकर जाग आली परंतु मला बिछाना सोडवत नव्हता. परंतु कालच्याप्रमाणे मी निद्रावश होईन की काय, अशी भीती वाटून मी उठलो व कामाला सुरुवात केली. मी सूर्योदयापूर्वी बिछाना सोडला, आपली प्रार्थना केली आणि बापूसाहेब जोगांकडे आपल्या परमामृताच्या वर्गास गेलो. उपासनी शास्त्री, श्रीमती कौजलगी व बापूसाहेब जोग तिथे होते. तिथे आज आम्ही चांगली प्रगती केली. आम्ही साईबाबांचे ते बाहेर जाताना आणि नंतर पुन्हा मशिदीत परततांना दर्शन घेतले. आम्ही सकाळच्या वेळेचा कसा काय सदुपयोग केला, असा सवाल त्यांनी मला केला आणि मी त्यांना आम्ही जे काही केले होते, त्याचा तपशील दिला. दुपारच्या आरतीनंतर मी परतलो आणि आम्ही आपापले भोजन केले. नंतर दिक्षितांनी रामायणाचा पाठ केला. भीष्म आणि माधवराव देशपांडे पाठाच्या वेळी सामील झाले होते. गावातले कुणी दोघेजण आणि सीताराम डेंगळे यांचे धाकटे बंधु पण आले होते. आणि पाठ समाप्त झाल्यावरही गप्पागोष्टी करीत ते बसले. त्यांच्यापैकी एकाने रामायणातील काही छंद ऐकवले. नंतर मी साईबाबांच्या दर्शनासाठी मशिदीत गेलो आणि पुन्हा त्यांनी दुपारचा वेळ कसा काय घालविला, असा सवाल केला. मी त्यांना पत्रे लिहिण्याच्या संबंधी बोलूलो तेव्हा ते हसले आणि म्हणाले, "बेकार बसून राहण्यापेक्षा आपले हात चालवित असलेले बरे." आम्ही त्यांचे ते सायंकाळच्या रपेटीस निघाले तेव्हा दर्शन घेतले व रात्री शेजारतीला गेलो आज रात्री भजन झाले नाही कारण भागवताच्या पाठातच सारा वेळ गेला आणि रात्री दिक्षितांनी रामायणाचे वाचन केले.

# साई तुझे नाम

साई तुझे नाम, गाईन वेळो वेळा ॥धृ.॥
तुझे रुप पाहीन, निजडोळा
आ ऽऽ तुझे रुप, पाहीन निजडोळा
साई तुझे नाम, गाईन वेळो वेळा ॥१॥
तुझ्या चरणी गुंतला, माझा हेत
तुझी मूर्ती, कोंदली हृदयात
साई तुझी मूर्ती, कोंदली हृदयात
साई तुझे नाम, गाईन वेळो वेळा ॥२॥
साई तुझे ध्यान, लागले अंतर्यामी
तुझा विसर न, पडो मनोधामी
साई तुझे नाम, गाईन वेळो वेळा ॥३॥
द्वारकामाईत आशिष वर्षावे
भक्तांना सर्वांना, सुखी ठेवावे ॥४॥

**— लिलावती कां. गुजराथी**
नृसिंह लॉजसमोर, मु. पो. शिरडी, जि. अहमदनगर.

# टीव्हीएस-५० परत मिळाली

**श्री. हरीश मुळे**
द्वारा– श्री. मुरलीधर राव
६-१-३१, रामगीरी, नळगोंडा,
आंध्र प्रदेश-५०८ ००२.

मी खो-खो खेळाचा कोच (शिक्षक) असून मला हैद्राबाद इथे ज्युनियर नॅशनलला जाणाऱ्या मुलींच्या टिमच्या कोचींग साठी बोलाविले होते. दिनांक १२ जून रोजी मी सकाळी ९-३० वाजता कोचींग कँपहून सिकंदराबाद इथे परत घरी आलो व फाटकाच्या आत टी.व्ही.एस-५० (एटीआर ७७३८) ठेवून त्यास कुलूप लावले. तेथे सर्व कॉटेजेस असल्यामुळे दारे बहुतेक बंद असतात. ती गाडी ९-३० ते ११-०० वाजताच्या दरम्यान सकाळी कुलूप तोडून चोरीला गेली. ती गाडी माझ्या मोठ्या भावाची असून तो साईभक्त आहे. गाडी चोरीला गेल्याचे लगेच रामगोपाल पेठ, सिकंदराबाद पोलीस स्टेशनवर कळविले व साईबाबांजवळ प्रार्थना केली की, देवा आपल्यां भक्ताची गाडी चोरीला गेली असून ती मिळू दे.

गाडी विषयी कांही कळाले नाही व मी १५-६-८७ ला बंगलोर इथे ज्यूनियर नॅशनल खो-खो चॅम्पियनशिपसाठी टिम बरोबर गेलो.

ज्याने गाडी चोरली होती त्याने ती मलकाजगीरी पोलीस स्टेशन जवळ आणून सोडली. ती गाडी तेथील पोलीस लोकांनी आपल्या ताब्यात घेऊन गाडीतील ड्रायव्हिंग लायसेन्स काढून बघितले व घराचा पत्ता शोधत खैरताबाद इथे भावाच्या घरी २१-६-८७ रोजी आले. लगेच भावाच्या मुलांनी जाऊन गाडीची ओळख दिली व सिकंदराबाद इथे निरोप दिला. मी नसल्या कारणाने माझ्या पत्नीने दुसऱ्या दिवशी रामगोपालपेठ पोलिस स्टेशन इथे कळविले व लगेच इन्स्पेक्टरनी ती टीव्हीएस मलकाजगीरीहून मागवून घरी पोहचविली. कांही त्रास न होता पोलिसांनी ती गाडी घरी पाठविली म्हणजे आहे की नाही साईंची कृपा. त्यांच्या कृपेनेच आमची टीव्हीएस परत मिळाली.

# मला आलेला बाबांचा अनुभव

**सौ. अनघा अ. पेटकर**
१० "देवदत्त", भास्कर कॉलनी,
नौपाडा, ठाणे-४०० ६०२.

बाबांच्या कृपेचा मला आलेला विलक्षण चमत्कारिक अनुभव देत आहे. नक्की साल आठवत नाही, पण त्यावेळी मनोजकुमार ह्या सिनेकलाकारांने "शिरडीके श्री साईबाबा" ह्या नावाचा एक चित्रपट काढला होता. आम्ही प्रवासात असताना ाजमानांनी 'Screen' चा अंक घेतला. मधल्या पानावर श्री साईबाबांचे मोठे चित्र

असलेली जाहिरात होती. समाधिमंदिरातील मूर्ती वरुन घेतलेला तो फोटो होता. काळ्या-पांढऱ्या रंगातील शांत– धीर देणारी साईबाबांची छबी आम्हाला खूप आवडली. ह्यांनी हलकेच साईबाबांचे 'Screen' साप्ताहिकातले ते चित्र कापून घेतले. घरी आल्यावर चारी बाजूला डिंक लावून साईबाबांचे चित्र असलेला तो कागद, ह्यांनी एका भिंतीवर चिकटवला. शिर्डीच्या समाधिमंदिरातील मूर्ती मला अतिशय आवडत असे. जणू काही आपल्याला धीर देण्यासाठी, संकट निवारण्यासाठी साईबाबा तिथे बसले आहेत, असे वाटत असे. तसेच चित्र घराच्या भिंतीवर दिसत असल्यामुळे, मला खूप आनंद झाला होता. हळूहळू त्या कागदावरच्या चित्राला नमस्कार करणे, त्याला आपली गाऱ्हाणी सांगणे, मनांतील दु:खं सांगणे हे माझे रोजचेच होवू लागले. संकटं येत होती. साईबाबा ती सोसायला बळ देत होते, मार्ग दाखवीत होते. अशीच वर्षे उलटली. आम्हाला मुलगा झाला. साईबाबा त्या जागी प्रत्यक्ष बसले आहेत, अशीच माझी भावना होती. होता होता तो कागद अगदी जीर्ण झाला, पिवळा पडला आणि एके दिवशी वाऱ्याच्या जोरामुळे साईबाबांचे चित्र असलेला तो कागद, एका कोपऱ्यातील डिंक सुटून फाटू लागला. त्यावेळी आमच्या लक्षात आले की, साईबाबांचा आपण अजून एखादा फोटो विकत घेतला नाही. साईबाबांचा तसाच फोटो विकत आणून, त्या जागी लावायचा, असं आम्ही ठरवलं. पण साईबाबांचे चित्र असलेला हा कागद काढायचा हे माझ्या मनाला सहन होईना! तिथे प्रत्यक्ष साईबाबा आहेत, अशा भावनेने मी रहात होते. काही झालं तरी तो कागद होता. इतकी वर्षे जीर्ण झालेला तो कागद, आज ना उद्या काढणे भाग होते. पण आता इथे साईबाबा राहणार नाहीत, ह्या कल्पनेने मी मनातून दु:खी झाले होते. कशातच मन लागत नव्हतं. राहून राहून त्या चित्राकडे पाहून, माझं मन गलबलून येत होतं. तसाच साईबाबांचा फोटो ह्यांनी फ्रेम करुन आणला होता. एका गुरुवारी आम्ही तो लावणार होतो. पण त्या कागदावरच्या छबीचा जणू काही विरह मला सहन होणार नव्हता. अशीच दु:खी मनाने साईबाबांच्या त्या चित्राला मी नमस्कार करीत होते. मन व्याकुळ झाले होते. साईबाबा इथून जाणार, ह्या कल्पनेने डोळ्यांतून अश्रूधारा वहात होत्या. कितीतरी वेळ मी तशीच हात जोडून साईबाबांसमोर उभी होते. जोडलेले हात किंचित् मोकळे झाले. आणि काय चमत्कार! माझ्या ओंजळीत एक जरासं सुकलेलं झेंडूचं फूल साईबाबांच्या चित्राच्या कागदातून पडलं. मी आश्चर्यचकित झाले. पण लगेच माझ्या लक्षात आलं, डोळ्यातील अश्रूधारा आणखीनच घळघळ वाहू लागल्या. साईबाबांच्या चमत्काराने मन दाटून आलं. माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. "माझं चित्र जरी इथे नसलं, तरी मी इथेच आहे." असच जणू साईबाबांना फुलाच्या चमत्काराच्या रुपाने सांगायचं होतं. इतके दिवस अस्वस्थ असलेलं माझं मन शांत झालं. आम्ही ते फूल एका डबीत ठेवून, ती डबी देव्हाऱ्यात ठेवून त्याची देवाबरोबर पूजा करतो. त्या कागदाच्या चित्राच्या जागी तसाच श्रीसाईंचा फोटो लावला आहे.

# कृपाळू साईबाबा

– कु. प्रशांत प्रल्हाद संन्याशिव
१८/५६४, शास्त्रीनगर,
गोरेगांव (पश्चिम),
मुंबई - ४०० १०४.

श्री साईलीला आपल्या भक्ताला नेहमी म्हणत:– 'संसाराचा लगाम खेचत खेचत प्रत्येक सकटाला तोंड देत जे परमार्थ साधतात, त्याला जेवढे महत्त्व आहे; तेवढे आजन्म ब्रह्मचारी राहून परमार्थ साधण्याला काहीच महत्त्व नाही.'

'साई' म्हटल की मनाला एक वेगळ्या प्रकारची शांतता वाटते. मनात एक वेगळ्या प्रकारची शांतता वाटते. मनात एक वेगळ्या प्रकारची भावना निर्माण होते. 'नास्तिक' मनुष्य सुद्धा 'साई' ह्या नावाने 'आस्तिक' होतो. मनातले सगळे पापी-वाईट विचार निघून जातात. साईंचे सामर्थ्य किती आहे, हे ह्या उदाहरणावरुन दिसून येते. ज्यावेळेस माणसावर संकटे येतात त्यावेळेस माणूस देवाचा धावा करतो. परतु अशी पण काही माणसे ह्या जगात आहेत की, ती संकटे येऊन सुद्धा देवाला त्रास देत नाहीत. कारण त्यावेळेस त्यांचे मन, त्यांच्या भावना त्याना सागतात की, आपली संकटे देवावर टाकून, देवाला ते संकटात टाकत आहेत. आपल्यामुळे देवाला त्रास होऊ नये, म्हणून ते ती संकटे शांतपणे सहन करीत असतात. परंतु देवाला त्यांची दु:खे बघवत नाहीत व तो त्यांना संकटातून मुक्त करतो. त्याचबरोबर त्या भक्ताची श्रद्धा आणखी दृढ होते व तो आपल्या मायमाऊलीला साष्टांग नमस्कार घालतो. म्हणूनच साईमाऊलीने म्हटले आहे, 'तुम्ही आपल्या देवावर दृढ विश्वास ठेवा, 'श्रद्धा व सबुरी' ठेवा, तो तुम्हाला फळ दिल्यावाचून राहणार नाही.

श्रीबाबा आपल्या भक्तांना म्हणत असत, 'भक्त खरा तोच की, जो अगदी मनापासून देवाची भक्ती करतो व कुठलाही स्वार्थ न धरता, मनात कुठलीही अभिलाषा न धरता त्याची खऱ्या अर्थाने पूजा-अर्चा करतो. काम, क्रोध, मद, मत्सर, मोह, लोभ, स्वार्थ, गर्विष्ठपणा, रागीटपणा ह्या सगळ्या गोष्टींपासून अलिप्त राहून आपल उभ आयुष्य देवभक्तीत घालवतो तोच खरा भक्त.'

बाबांच्या हयातीत म्हाळसापती, नानासाहेब चांदोरकर, काकासाहेब दीक्षित, तात्या, शामा, दासगणू यांसारख्या भक्तांनी आपले आयुष्य श्रीबाबांच्या चरणी अर्पण केले होते व मनात कुठलाही स्वार्थ न धरता बाबांची सेवा करण्यांत ते रमून जात. ह्या भक्तापुढे आपण काहीच नाही, हीच खंत मनाला वारंवार वाटत असते. म्हणून मी बाबाना हात जोडून प्रार्थना करतो की, बाबा आम्हा भक्तांना सुद्धा तुमच्या चरणांची सेवा करण्याचे भाग्य लाभू द्या.

बाबांचे आपल्या भक्तांकडे फार बारकाईने लक्ष असे. एकदा बाबांचे परमभक्त नानासाहेब पिटकर आपल्या मित्रांबरोबर बाबांचे दर्शन घेण्याकरिता शिर्डीला आले.

परंतु त्यांना पाहताच बाबा भयंकर संतापले व त्यांना परत जाण्यास सांगू लागले. आपल्या हातातील काठीने मारण्याचा आवेश दाखवून बाबा, 'चले जाव, अभी के अभी चले जाव' म्हणून बाबा ओरडायला लागले. परंतु बाबांचे काही एक न ऐकता पिटकर तिकडेच बसून राहिले. परंतु पिटकरांना त्याचा काहीच उलगडा होईना. मग काही वेळानंतर दीक्षितांनी बाबांच्या ह्या कृतीचा खरा अर्थ त्यांना समजावून सांगितला. त्याच वेळी गावात प्लेगची साथ आली होती. शिरडीला लागण होण्याची भीती होती. म्हणून बाबा पिटकरांना शिर्डीतून निघून जाण्याची आज्ञा करत होते. ह्या उदाहरणावरुन आपल्याला कळून येते की, बाबा आपल्या भक्ताला संकटातून सोडविण्याकरिता किती खटपट करीत असतात.

बाबांनी आपला देह ठेवण्याअगोदर भक्तांना सांगितले होते की, मी जरी हा देह सोडून जात असलो तरी,

**नवसास पावेल माझी समाधी ।**
**धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी ॥**
**नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य ।**
**नित्य घ्या प्रचित॥**

बाबा आजही आपल्या भक्तांची संकटे दूर करतात, त्यांचे मनोरथ पूर्ण करतात. धन्य धन्य ती श्री साईलीला!

बाबांना माझा कोटी कोटी प्रणाम.

# माझ्या मागे साईबाबा

खूप वेळा शिरडीस जाण्याचा योग यायचा, परंतु काही ना काही कारणाने ते रद्द व्हायचे. १९८४ च्या दिवाळीत प्रथम शिरडीस जाण्याचा योग आला आणि त्यानंतर श्री साईबाबा हे माझे खरोखरच बाबा आहेत, असे मला वाटू लागले. शिरडीहून येताना बाबांचे एक छायाचित्र आणून फ्रेम करुन आम्ही त्यांची त्या दिवसापासून नित्यनेमाने पूजा करु लागलो आणि त्या दिवसापासून माझ्यावर आलेल्या प्रत्येक संकटाचे बाबा निवारण करीत आले.

"नित्य मी जिवंत जाणा हेंचि सत्य॥ नित्य घ्या प्रचीत अनुभवे"
"शरण मज आला आणि वाया गेला॥ दाखवा दाखवा ऐसा कोणी॥"

वरील वचनाची प्रचिती मला वेळोवेळी येऊ लागली. साई दरबारात गेलेला कोणीही विन्मुख होऊन परतत नाही, याचे अनेक अनुभव मला आले. त्यातील एक अनुभव मी खाली देत आहे.

माझा पाच वर्षाचा मुलगा त्यावेळी सिनियर के.जी. त होता. त्याची शाळा घरापासून खूप लांब होती. त्यात माझ्या नोकरीमुळे त्याला नेता आणता येत नसे. आमच्या सोसायटीतील गुरखा दोन तीन मुलांना सायकलवरुन एकदम घेऊन येत असे. त्यामुळे मला फार भीती वाटत असे. नोकरीला जातेवेळी स्टॉपवर मी नेहमी विचार करीत उभी असायची की, माझ्या मुलाला घराजवळील शाळा मिळाली तर!

पण ते कसे शक्य आहे? त्या शाळेत ॲडमिशन घेण्यासाठी त्यांच्या खूप अटी होत्या. स्टॉपजवळच साईबाबांची मूर्ती असलेले छोटेसे मंदिर आहे. एके दिवशी साईबाबांना हात जोडून म्हटले, "बाबा, माझ्या मुलाला तुमच्या कृपेने घराजवळील शाळा मिळू दे." आणि खरोखरच महिन्याभरात एके दिवशी ध्यानीमनी नसताना एका सहकाऱ्याच्या सल्ल्याने मी महानगरपालिकेतर्फे प्रवेशासाठी अर्ज भरला. मुळात या सर्व गोष्टींसाठी माझे पती तयारच नव्हते. त्यांनी मला स्पष्ट सांगितले की, काय करायचे ते सगळे तूच कर. परंतु साईबाबांवरील श्रध्देमुळे मी पुढचे पाऊल उचलले. अर्ज भरल्यावर ठराविक दिवशी मला केंद्रावर बोलावण्यात आले. घरुन निघताना नेहमीप्रमाणे बाबांची उदी लावून व बाबांना नमस्कार करुन निघाले. तेथे गेल्यावर मला हवी ती शाळा मिळाली, असे कळल्यावर माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. बाबांच्या छोट्या तसबिरीला नमस्कार करताना माझ्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

परंतु अजूनही मी बाबांच्या श्रध्देला व कसोटीला पूर्ण उतरले नव्हते, हे मी दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर मला कळले. मुख्याध्यापकांकडे आम्ही गेलो असता त्यांनी आम्हाला निक्षून सांगितले की, कालच संध्याकाळी एक शेवटची जागा भरली, तुम्हाला प्रवेश मिळणार नाही. मला तर तेथेच रडू कोसळले. परंतु माझ्या बाबांवर माझा पूर्ण विश्वास होता. त्या केंद्रावर माझ्या ओळखीचे आमचे साहेब होते. तेथे मी व माझे पती यांना भेटावयास गेलो असता, ते तिथे नव्हते. ते संध्याकाळी चार वाजता तेथे येणार होते. आम्ही पुन्हा घरी आलो. माझे पती माझ्यावर खूप वैतागले, "त्याला आहे त्या शाळेत राहू दे. आता मी काही तुझ्याबरोबर येणार नाही. तुला काय एकटीला हवे ते कर!" असे त्यांनी मला सांगितले. त्यावेळी मात्र माझा धीर खूप खचला. परंतु मी प्रयत्न सोडला नाही. पुन्हा मी बाबांवर पूर्ण विश्वास ठेवून भर पावसात ३ वाजता त्या केंद्रावर गेले. तेथे गेल्यावर साहेबांच्या भोवती एवढ्या माणसांची गर्दी असून सुद्धा साहेबांनी माझ्याजवळ येऊन विचारले, काय बाई, तमचे काम झाले का? मी 'नाही' म्हणून माझा अर्ज त्यांना दिला. त्यांनी ताबडतोब दुसऱ्या खोलीत जाऊन त्या अर्जावर स्वतःचा शिक्का मारुन मुख्याध्यापकांना विनंती केली की, या बाईंच्या मुलाला प्रवेश मिळावा. या बाई आमच्या खात्यात नोकरीला आहेत, असे त्यांनी लिहून दिले. क्षणभर साहेबांच्या रुपात मला माझे बाबा दिसले. मला धीर आला. व मी तशीच भरपावसात रिक्षा करून घरी आले व पतीला अर्ज घेऊन शाळेत पाठविले. अर्ज पाहिल्याबरोबर मुख्याध्यापकांनी सांगितले की, आम्हाला आता तुमच्या मुलाला शाळेत घ्यायलाच हवे. ही सगळी माझ्या बाबांची कृपा. अशीच साईबाबांची कृपा सर्व भक्तांवर सदैव राहो! त्या साईमाऊलीच्या चरणी आम्हा सर्वांचे कोटी कोटी प्रणाम.

**सौ. वैशाली अशोक गायकवाड**
'अे' 'टु', 'नारायण पुष्प',
देवीदयाळ रोड, मुलुंड (पश्चिम) मुंबई-४०० ०८०.

# साई सहस्त्र नामावली

**(मागील अंकावरून चालू)**

**– श्री. संजीव चंदने**
अहिल्यादेवी चौक, कल्याण.

४०१) श्री साई किर्ती सुगंध नमो नम:
४०२) श्री साई किर्तन महिमा नमो नम:
४०३) श्री साई करूणा अवतार नमो नम
४०४) श्री साई कार्य नमो नम:
४०५) श्री साई कालावधी नमो नम:
४०६) श्री साई कलाकार नमो नम:
४०७) श्री साई कुशल नमो नम:
४०८) श्री साई कृपा साऊली नमो नम:
४०९) श्री साई वृक्ष प्रेम नमो नम:
४१०) श्री साई कल्पना नमो नम:
४१२) श्री साई कर्तव्य कर्म नमो नम:
४१३) श्री साई कर्म कृपाळू नमो नम:
४१३) श्री साई कर्म देवाय नमो नम:
४१४) श्री साई कृपादृष्टी नमो नम:
४१५) श्री साई कल्याण समर्थायनमो नम:
४१६) श्री साई कृष्ण माऊली नमो नम:
४१७) श्री साई कृतार्थ जीवन नमो नम:
४१८) श्री साई करूणा नेत्र नमो नम:
४१९) श्री साई कृपा साऊली नमो नम:
४२०) श्री साई कृपार्णवा नमो नम:
४२१) श्री साई कैवल्यधाम नमो नम:
४२२) श्री साई काव्यरचना नमो नम:
४२३) श्री साई कृपा छाया नमो नम:
४२४) श्री साई कामधेनू नमो नम:
४२५) श्री साई कर स्पर्श नमो नम:
४२६) श्री साई कुलोद्धार नमो नम:
४२७) श्री साई कृपालहरी नमो नम:
४२८) श्री साई कथामृत नमो नम:
४२९) श्री साई कर्पूर गौरा नमो नम:
४३०) श्री साई काम क्रोध रक्षक नमो नम:
४३१) श्री साई कवच नमो नम:
४३२) श्री साई खंडेराय नमो नम:
४३३) श्री साई गीता नमो नम:
४३४) श्री साई गंगा नमो नम:
४३५) श्री साई गजानन नमो नम:
४३६) श्री साई गुरू नमो नम:
४३७) श्री साई गुरूचरणाय नमो नम:
४३८) श्री साई ग्रामदेवताय नमो नम:
४३९) श्री साई गोपाळ नमो नम:
४४०) श्री साई गोविंदाय नमो नम:
४४१) श्री साई गुरवे नम:
४४२) श्री साई गंगाधर नमो नम:
४४३) श्री साई ग्रंथ नमो नम:
४४४) श्री साई गुरूवार नमो नम:
४४५) श्री साई गीता वचन नमो नम:
४४६) श्री साई गुरूनाथाय नमो नम:
४४७) श्री साई समाधी राजाय नमो नम:
४४८) श्री साई गुणदास नमो नम:
४४९) श्री साई गुरू लीला नमो नम:
४५०) श्री साई गोपीकावल्लभ नमो नम:
४५१) श्री साई गुण गौरव नमो नम:
४५२) श्री साई गुरूब्रहमा नमो नम:
४५३) श्री साई गुणवंत नमो नम:
४५४) श्री साई गौरी नंदन नमो नम:
४५५) श्री साई गुलाब पुष्प नमो नम:
४५६) श्री साई गंगागीर बाबा नमो नम:
४५७) श्री साई गुरूमूर्ती नमो नम:
४५८) श्री साई गौरव नमो नम:
४५९) श्री साई गोसावी नंदन नमो नम:
४६०) श्री साई गंगोत्री नमो नम:
४६१) श्री साई गुरूवर ममो नम:
४६२) श्री साई गुरू विष्णू नमो नम:
४६३) श्री साई गुरूपादूका नमो नम:
४६४) श्री साई गणनाथाय नमो नम:

४६५) श्री साई गुरू देवाय नमो नम :
४६६) श्री साई गुलाब वन नमो नम :
४६७) श्री साई गुणगान नमो नम :
४६८) श्री साई गुरूराया नमो नम :
४६९) श्री साई ग्रंथरचना नमो नम :
४७०) श्री साई गिरीजानंदाय नमो नम :
४७१) श्री साई ज्ञान देवाय नम :
४७२) श्री साई बाबा देवाय नम :
४७३) श्री साई बुद्धिदेवता नमो नम :
४७४) श्री साई बहार नमो नम :
४७५) श्री साई बरसात नमो नम :
४७६) श्री साई भानवे नम :
४७७) श्री साई भगवंत नमो नम :
४७८) श्री साई भोळा भाव नमो नम :
४७९) श्री साई भार्गवाय नमो नम :
४८०) श्री साई ब्रहमानंदाय नमो नम :
४८१) श्री साई भाग्योदय नमो नम :
४८२) **श्री साई भू देवसंत देवाय नमो नम**
४८३) श्री साई भावभक्ती नमो नम :
४८४) श्री साई बंधुत्व नमो नम :
४८५) श्री साई बालमुकुंदराय नमो नम :
४८६) श्री साई भजन नमो नम :
४८७) श्री साई भव सागर तारू नमो नम :
४८८) श्री साई ब्रहम देवाय नमो नम :
४८९) श्री साई भावना नमो नम :
४९०) श्री साई ब्रहमपुरातन नमो नम :
४९१) श्री साई भास्कराय नमो नम :
४९२) श्री साई भाग्यवत्सल नमो नम :
४९३) श्री साई ब्रहमांडनायक नमो नम :
४९४) श्री साई भांडार नमो नम :
४९५) श्री साई बुधाय नमो नम :
४९६) श्री साई भवतिमीर नाशक नमो नम :
४९७) श्री साई भक्त रक्षक नमो नम :
४९८) श्री साई भक्त रक्षक नमो नम :
४९९) श्री साई बोधामृत नमो नम :
५००) श्री साई भक्ती अभिनव नमो नम :
५०१) श्री साई बहुजन हिताय नमो नम :
५०२) श्री साई ब्रहम स्वरूप नमो नम :
५०३) श्री साई भक्ती भाव नमो नम :
५०४) श्री साई बुद्धी प्रयोग नमो नम :
५०५) श्री साई भाग्य मनोरथ नमो नम :
५०६) श्री साई भवभय निवारी नमो नम :
५०७) श्री साई भक्तोद्धारक नमो नम :
५०८) श्री साई बुद्धि नमो नम :
५०९) श्री साई भक्ती ज्ञान नमो नम :
५१०) श्री साई बुधगण नमो नम :
५११) श्री साई भक्ती लीलामृत नमो नम
५१२) श्री साई भक्तवृंदाय नमो नम :
५१३) श्री साई भाग्य नमो नम :
५१४) श्री साई भक्त विसावा नमो नम :
५१५) श्री साई भक्त कल्पतरू नमो नम :
५१६) श्री साई ब्रहमी भूत नमो नम :
५१७) श्री साई भक्त युक्तात्मा नमो नम :
५१८) श्री साई भू - देव नमो नम :
५१९) श्री साई प्रज्ञावंत देवाय नम :
५२०) श्री साई बाल मूर्ती नमो नम :
५२१) श्री साई महात्म वाचन नमो नम :
५२२) श्री साई ब्रहमहरिहर नमो नम :
५२३) श्री साई राजाधी राजाय नम :
५२४) श्री साई राम नमो नम :
५२५) श्री साई रुद्रय नमो नम :
५२६) श्री साई ऋषीकेशाय नमो नम :
५२७) श्री साई रहीम नमो नम :
५२८) श्री साई राज नमो नम :
५२९) श्री साई रामचंद्राय नमो नम :
५३०) श्री साई रत्नाकराय नमो नम :
५३१) श्री साई राजाधीराज नमो नम :
५३२) श्री साई रघुनंदन नमो नम :
५३३) श्री साई रघुनाथाय नमो नम :
५३४) श्री साई ऋणानुबंध नमो नम :
५३५) श्री साई रक्षक नमो नम :
५३६) श्री साई रजनीकांत नमो नम :
५३७) श्री साई रविंद्र नमो नम :
५३८) श्री साई रामकृष्णाय नमो नम :
५३९) श्री साई रूक्मीणी कांत नमो नम :
५४०) श्री साई रामदासाय नमो नम :

५४१) श्री साई रचना नमो नम :
५४२) श्री साई ऋदीसिद्धी नमो नम :
५४३) श्री साई रुप नमो नम :
५४४) श्री साई रामनारायणाय नमो नम :
५४५) श्री साई रामानंद नमो नम :
५४६) श्री साई राधाकृष्ण नमो नम :
५४७) श्री साई रामराजाय नमो नम :
५४८) श्री साई रुक्मीणीकरा नमो नम :
५४९) श्री साई रामेश्वराय नमो नम :
५५०) श्री साई रामानुज नमो नम :
५५१) श्री साई रघुनायक नमो नम :
५५२) श्री साई राघवाय नमो नम :
५५३) श्री साई रत्नचिंतामणी नमो नम :
५५४) श्री साई रचनाकार नमो नम :
५५५) श्री साई राधाभाव नमो नम :
५५६) श्री साई रुद्रावतार नमो नम :
५५७) श्री साई रामानिवासाय नमो नम :
५५८) श्री साई जन नमो नम :
५५९) श्री साई जगदीश्वर नमो नम :
५६०) श्री साई जनउद्धार नमो नम :
५६१) श्री साई जगत्चालक नमो नम :
५६२) श्री साई जन्मसाक्षी नमो नम :
५६३) श्री साई जागृती नमो नम :
५६४) श्री साई ज्योत नमो नम :
५६५) श्री साई जगभाव नमो नम :
५६६) श्री साई जय नमो नम :
५६७) श्री साई जगदीप नमो नम:
५६८) श्री साई जानकीराम नमो नम:
५६९) श्री साई जयदीप नमो नम:
५७०) श्री साई जन्मजय नमो नम:
५७१) श्री साई जनहिताय नमो नम:
५७२) श्री साई जीवशीव नमो नम:
५७३) श्री साई जीवन मुक्त नमो नम :
५७४) श्री साई जगदीश नमो नम :
५७५) श्री साई जग्उद्धारक नमो नम :
५७६) श्री साई जयश्री नमो नम :
५७७) श्री साई जलाराम नमो नम :
५७८) श्री साई जगत्कल्याण नमो नम :
५७९) श्री साई जयजयाजी नमो नम :
५८०) श्री साई जयेश नमो नम :
५८१) श्री साई जगदंबरुप नमो नम :
५८२) श्री साई जनार्दनाय नमो नम :
५८३) श्री साई मल्हारी देवाय नमो नम :
५८४) श्री साई ब्रहमलोकेश्वर नमो नम :
५८५) श्री साई तेज नमो नम :
५८६) श्री साई तिर्थ नमो नम :
५८७) श्री साई तिर्थरुप नमो नम :
५८८) श्री साई तपस्वी नमो नम :
५८९) श्री साई तरणोपाय नमो नम :
५९०) श्री साई त्राता नमो नम :
५९१) श्री साई त्र्यंबकेश्वराय नमो नम :
५९२) श्री साई त्रिगुणात्मक नमो नम :
५९३) श्री साई तिर्थकार नमो नम :
५९४) श्री साई तेजोमयानंद नमो नम :
५९५) श्री साई तुळसीदास नमो नम :
५९६) श्री साई तत्वप्रणाली नमो नम :
५९७) श्री साई त्रिमूर्ती नमो नम :
५९८) श्रीसाई तेलावाचून पणती नमो नम :
५९९) श्री साई तुकाराम नमो नम :
६००) श्री साई तिर्थस्थान नमो नम :

# तुमचे श्रीसाईबाबांविषयक सामान्य ज्ञान किती आहे?

(पुढीलपैकी सहा प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे, आठांची बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्कृष्ट

१) श्रीसाईबाबांना 'साई' हे नाव प्रथमतः शिर्डीच्या ....देवळात पडले.
अ) विठोबाच्या, ब) खंडोबाच्या, क) मारुतीच्या, ड) नवनाथाच्या

२) श्री साईबाबा हे साक्षात् ..... अवतार समजले जातात.
अ) नागाचा, ब) बळीराजाचा, क) दत्ताचा, ड) विष्णूचा

३) श्रीसाईनाथांचा शिरडी समाधी मंदिरातील भव्य जगप्रसिद्ध पुतळा श्री .... या प्रख्यात शिल्पकाराने तयार केलेला आहे.
अ) आचरेकर, ब) यावलकर, क) घोरपडे, ड) तालीम

४) नागपूरचे श्री. ... बाबा हे साईंचे समकालीन होत.
अ) ताजुद्दीन, ब) मेहेर, क) गुलाब, ड) कमू

५) श्रीसाईंचे ओवीबद्ध चरित्र साईसच्चरित .... यांनी प्रथम लिहिले.
अ) मोरोपंत, ब) हेमाडपंत, क) दासोपंत, ड) नरसोपंत

६) श्रीबाबा आपली आंतडी धुवून ती .... झाडावर वाळत टाकीत असत.
अ) पिंपळाच्या, ब) लिंबाच्या, क) जांभळाच्या, ड) वडाच्या

७) तुझा-माझा बहात्तर पिढ्यांचा संबंध आहे असे साईबाबांनी .... सांगितले.
अ) चांदोरकरांना, ब) दिक्षितांना, क) शामास, ड) निमोणकरांना

८) श्रीसाईंनी बाळाराम मानकरांना ..... पाठविले होते.
अ) सज्जनगडावर, ब) मच्छिंद्रगडावर, क) लोहगडावर, ड) सिंहगडावर

९) बाबा..... दिवसआड करून चावडीत झोपत.
अ) एक, ब) दोन, क) चार, ड) तीन

१०) लोहाराची मुलगी भट्टीत पडत असताना बाबांनी तिला वाचविले तो दिवस.... चा होता.
अ) गोकुळ अष्टमी, ब) धनत्रयोदशी, क) मकरसंक्रांती, ड) सर्वपित्री अमावास्या

११) बाबांचे दर्शन होईतोपर्यंत साखरेचा चहा पिणार नाही अशी शपथ ..... नी घेतली होती.
अ) नानासाहेब चांदोरकर, ब) चोळकर, क) रावबहादूर साठे, ड) गोपाळराव बुट्टी

१२) बाबा राहत्याला ..... यांचेकडे जात असत.
अ) श्री. डेंगळे, ब) श्री. रासने, क) श्री. नूलकर, ड) श्री. निमोणकर

**— सदानंद चेंदवणकर**

१) - ब, २) - क, ३) - ड, ४) - अ, ५) - ब, ६) - क, ७) - क,
८) - ब, ९) - अ, १०) - ब, ११) - ब, १२) - अ.

## बाल साईभक्तांसाठी

# असे होते साईबाबा !

**— सौ. भावना जेऊरकर**
विष्णूनगर, गोपी टॉकीज समोर,
डोंबिवली.

श्याम: आई! रोज तू या फोटोला कामावर जाताना नमस्कार करतेस, कामावरून आल्यावर त्यांच्या पायावर डोके ठेवून वंदन करतेस. कोणाचा ग फोटो आहे हा?

आई: श्याम! हा फोटो आहे साईबाबांचा. थोर योगी पुरुष होऊन गेले ते.

श्याम: आई! सांग ना मला ते कोण होते?

आई: अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी गावी वयाच्या सोळाव्या वर्षी एका कडुलिंबाच्या झाडाखाली एक तेजस्वी तरुण बसलेला गावकऱ्यांनी पाहिला. त्यांना गावकऱ्यांनी खूप प्रश्न विचारले. त्यांचे गाव कोण? आई-वडिलांचे नांव काय? पण या बाबांनी कोणालाच स्वतःची माहिती काहीही सांगितली नाही.

श्याम: त्यांचा वेष कसा होता? ते कुठे रहात?

आई: त्यांचा वेष अगदी साधा असे. अंगभर पायघोळ कफनी. डोक्याला धुतलेले पांढरे शुभ्र वस्त्र बांधत. त्या वस्त्राच्या उरलेल्या पदरांची गुंडाळी करून डाव्या कानामागे बांधत. त्यांची राहणी साधी होती. त्यांना स्वतःचे घर नव्हते. शिर्डी गावाबाहेर एका चावडीजवळ पडक्या मशिदीत बाबा रहात असत.

श्याम: आई! ते कसे दिसत होते? त्यांना काय आवडे?

आई: बाबा जवळ जवळ सहा फूट उंचीचे होते. सडपातळ शरीर, तेजस्वी, गोरापान वर्ण होता. त्यांचे बोलणे अतिशय गोड होते. त्यांच्या नजरेत प्रेमभाव असे. सर्वांशी नम्रपणे बोलत. त्यांना लहान, थोर सर्व माणसे आवडत. तसेच प्राणी, पशू-पक्षी, फुलझाडे यांवरही त्यांचे भारी प्रेम होते. दया, क्षमा, शांती त्यांना आवडत होती.

श्याम: आई! त्यांना घर नाही, आई-वडील नव्हते, मग ते जेवायचे कोठे?

आई: बाबा रोज पाच घरी जाऊन भिक्षा मागत. पाच घरचे मिळालेले अन्न एकत्र करून एका दगडाच्या कोळंब्यात मशिदीत ठेवत. थोडेसे स्वतः खात अन् बाकीचे अन्न वाटून टाकीत.

श्याम: आई! भिक्षा कधी मागू नये, सगळे भिकारी म्हणतात मग बाबा कसे मागत?

आई: बाबा स्वतःचे पोट भरण्यासाठी भिक्षा मागत नव्हते. अन्नदानाचे महत्व पटविण्यासाठी ते भिक्षा मागत. आणलेले अन्न सर्वांना देऊन अन्नदेवतेचा मान राखत होते. त्यांनी अन्न कधी वाया घालविले नाही. फेकून दिले नाही.

श्याम: ते कोणती भाषा बोलायचे?
आई: बाबा नेहमी "अल्ला-मालिक" असे तोंडाने म्हणत. त्यांना मराठी, उर्दू, संस्कृत सर्व भाषा अवगत होत्या. त्यांची वाणी रसाळ होती. गोड बोलण्याने, विनोदी उत्तर देऊन ते सर्वांना आनंदी ठेवत. पण आपणहून कोणाशीही बोलत नसत.

श्याम: सबंध दिवस ते काय करायचे?

आई: एका ठिकाणी ते जास्त काळ थांबत नसत. अनवाणी पायाने सतत फिरत असायचे. सुरवातीला त्यांनी गरीब, दीन-दुबळे यांना फुकट औषध देत. आजारी लोकांची सेवा करीत. सर्वांना मदत करीत. नंतर स्वतःच्या शक्तीने अग्नी पेटविला त्यातील राख उदी म्हणून सर्वांना देत.

श्याम: त्यांना देव का मानतात?

आई: बाबांनी खूप मोठे कार्य केले. बाबांच्या हयातीत हिंदू-मुसलमान या दोन धर्मातील लोकात खूप भांडणे होत होती. ती भांडणे बाबांनी मिटवली. राम-रहिम एकच आहे हे त्यांनी पटवून दिले. हिंदू मुसलमान लोकांना एकत्र आणले. एकमेकांतील वादावादी टाळावयास, अविचार सोडावयास व एकमेकांशी प्रेमाने वागायला बाबांनी शिकविले. शुद्ध मनाने, प्रामाणिकपणे आपले काम केले की देवाची कृपा होतेच हे त्यांनी पटवून दिले.

श्याम: त्यांनी कार्य कोणते केले?

आई: त्यांनी कोणालाही चुकीचे मार्गदर्शन केले नाही. गुरूमंत्र दिला नाही. टाळवीणा घेऊन दारोदार भटकण्यास सांगितले नाही. शुद्ध अंतःकरणाने देवावर श्रद्धा ठेवा. भुकेलेल्यास अन्न द्या. तहानलेल्यास पाणी द्या. प्रत्येकातील चांगले तेवढेच घ्या. सर्वांवर प्रेम, दया, शांती याचा वर्षाव करा असे ते सांगत. ते स्वतःही असेच वागत होते. त्यामुळे लोकांना ते आदरणीय देवपुरुष वाटू लागले. सर्वधर्म समान आहेत हे त्यांनी स्वतःच्या कृतीने पटवून दिले. हेच त्यांचे महान कार्य.

श्याम: बाबांना नमस्कार केला तर ते आपणाला सर्व काही देतात का?

आई: श्याम! बाबा देव आहेतच. त्यांच्याकडे काहीही मागावे लागत नाही. ते आपणा सर्वांना चांगले ओळखतात. त्यांना आपण मनापासून भक्ती केलेली आवडते. प्रत्येक गोष्टीत प्रयत्न करा व काही काळ लोटला की तुमच्या प्रयत्नांना यश येणारच असे त्यांचे सांगणे. प्रत्येक काम करताना देवाची आठवण ठेवून केली की देव प्रसन्न होतो. त्याला नमस्कार करा किंवा करू नका.

श्याम: आई! बाबांना माझ्यासारखी छोटी मुले आवडत होती का?

आई: होय श्याम. बाबांच्या भोवती एक झिप्री नावाची गोड मुलगी असायची. तिचे ते खूप लाड करत. ती बाबांजवळ जो हट्ट करी तो हट्ट ते पूरा करत. हळूहळू गावातील लहान मुले बाबांच्या भोवती जमू लागली. लहान मुलात बाबा

लहानांसारखे होत. गोट्या खेळत. पकडापकडी खेळत. मुले खेळून दमली की त्यांना खाऊ वाटत. प्रेमाने कुरवाळत व मग आपापल्या घरी जायला सांगत.

श्यामः आई, आता मला सारे काही कळले. तू नेहमी माझे बाबा म्हणून मोठ्या अभिमानाने सगळ्यांना सांगत असतेस. आता मी पण माझे "साई-आजोबा" माझ्या मित्रांना दाखविणार. माझ्या आजोबांना रोज सकाळी उठल्यावर व झोपताना नमस्कार करून झोपणार. आई, आता लवकरच म्हणजे मोठ्या सुट्टीत आपण माझ्या आजोळी जायचं हं शिर्डीला. माझ्या साईआजोबांजवळ त्या झिप्रीताईसारखा हट्ट करणार आहे मी. नेशील ना मला शिर्डीला?

आईः होय श्याम. आपण सारेच जाऊया हं शिर्डीला.

# "भोक्तृत्व सारे भोगिले पाहिजे"

**— सौ. विभावरी जयसिंग राणे**
अस्मिता दर्शन, ४०३/४,
तेली गल्ली, अंधेरी (पूर्व),
मुंबई - ६९.

या संसार सागरात प्रत्येक वेळी माणसाला संकटांना तोंड द्यावे लागते. कोणी श्रीमंत आहे. कोणी गरीब आहे. कोणाला आजारपण आहे. अशा अनेक अडचणी प्रत्येकाच्या असतात. या सर्व संकटांना तोंड देता देता जीव अगदी नकोसा होतो.

परमेश्वर माणसावर संकटे आणतो, ती त्याच्यात सुधारणा करण्यासाठी, आपण कुठे चुकतो आहोत, हे दाखवून देण्यासाठी.

श्री साईसच्चरित, अध्याय २६, ओवी १२३ या अध्यायात हेमाडपंतांनी गोपाळ नारायण आंबडेकर यांचे वर्णन दिले आहे की, "हे" गृहस्थ स्वतःच्या एकंदर परिस्थितीला एवढे कंटाळतात की, त्यांना वाटते शिरडीत जाऊन प्राणत्याग करावा पण सर्वसाक्षी परमेश्वर साईबाबा त्यांची मनोवृत्ती जाणतात व आपल्या सगुण नावाच्या भक्तामार्फत आंबडेकरांना स्वामी समर्थांची पोथी वाचायला देतात. आंबडेकर हातात पोथी मिळाल्याबरोबर पान उघडतात. तेव्हा "भोक्तृत्व सारे भोगिले पाहिजे" हा परिच्छेद वाचावयास मिळतो. आज जरी जीवन संपले तरी पुन्हा तोच जन्म येणार व राहिलेले भोग भोगावे लागणार. हे वाचल्याबरोबर आंबडेकर आश्चर्यचकित झाले आणि ताबडतोब जाऊन बाबांचे चरण धरले.

आंबडेकरांच्या घराण्यात वडिलोपार्जित स्वामी समर्थांची सेवा चालू होती, ती अपुरी राहिली होती, ती पुरी करण्याची साईबाबांनी आठवण करून दिली.

या संसारातून तरून जायचं असेल तर प्राणत्याग करून काहीच उपयोग नाही, त्याला जोड पाहिजे. "श्रद्धा आणि सबुरी" हे दोन शब्द तुमच्या अंतःकरणात कोरून ठेवले की तुम्हाला आत्मज्ञान, आत्मशक्ती व निरंतर सुखाची थैली मिळेल.

**ग्रंथपरीक्षण**

# श्री दत्तगुरुंची प्रवचने - (भाग दुसरा)

– **श्री. भालचंद केशव गन्द्रे**
सुख निवास, दत्तमंदिरा समोर,
चेंदणी, ठाणे - ४०० ६०१.

सद्‌गुरु दत्तात्रेय प्रत्यक्ष नादलहरी मार्फत प्रवचने देतात, हे आजच्या कलियुगात कुणाला सांगितले, तर त्यावर चटकन् विश्‍वास बसणार नाही. पण ही अद्‌भुत किमया ठाण्याचे श्री. भरतकुमार देसाई यांनी त्यांचे आध्यात्मिक मार्गदर्शक परमपूज्य श्री. गोविंद वामन कुंटे यांच्या सहाय्याने साध्य केली आहे. नामाची अनंत महती प्रत्यक्ष ध्वनीलहरी मार्फत त्यांना जशी मिळाली तशी ती वेळच्या वेळी टिपून घेऊन, इतरेजनांनाही ती कळावी व त्यांना सुयोग्य मार्ग मिळावा, ह्या हेतूने प्रेरीत होऊन, त्यांनी ती "श्री दत्तगुरुंची प्रवचने" (भाग–२) ह्या पुस्तकरुपाने सर्व श्रध्दाळू भाविकांपुढे जशीच्या तशी ठेवली आहेत.

नामाच्या विश्वात रमणाऱ्या श्रध्दावंतांना ही प्रवचने खरोखरीच कामधेनू ठरतील, इतकी ती छान आहेत. जीवनाच्या जीवघेण्या वाकड्या वळणांवर मन व माथा शांत ठेवून, प्राप्त कर्मभोगांना हसत तोंड देऊन जीवनाचा प्रवास कसा करावा, हे विविध सखोल विवेचनाद्वारे श्री दत्त प्रभूंनी सहज सुंदर सोप्या शब्दात पटवून दिले आहे. ह्या पुस्तकातील एकेक प्रवचनाचा शांत मनाने विचार केला असता, ती प्रवचने किती प्रगल्भ व अर्थपूर्ण आहेत, हे सहज लक्षात येते. त्या प्रमाणेच जीवनात नामाची साथ घेऊन प्रवास केल्यावर कर्मभोग किती मुलायम होतात नि भोगायला येणारे भोग किती शांतमनाने भोगता येतात, हेही मनाला पटते. सध्याच्या धावपळीच्या जगात तासन् तास जपजाप्य करणे, पोथ्या-पुराणे वाचणे अशक्य आहे. यासाठी भाविकांनी दिवसाभरात आपल्याला सोयीची नेमकी एकच वेळ निश्चित करुन, त्यावेळेसच शांत चित्ताने, मनातल्या मनात आपल्या आवडत्या आराध्य दैवतेचे वा गुरुमंत्राचे मोजून पाचच वेळा नाम घ्यावे. त्यासाठी स्नानाची, सोवळ्या ओवळ्याची, ठराविक जागेची, आसनाची आवश्यकता नाही. ही कृती वरकरणी सहज सोपी वाटली तरी, नेमक्या ठरलेल्या वेळीच आठवणीने नामस्मरण करणे, ही किती अवघड गोष्ट आहे, हे प्रत्यक्ष कृती करताना लक्षात येईल. प्रथम प्रथम वेळ चुकेलही. ज्यावेळी आठवण येईल, त्यावेळी नाम घ्यावे व परत दुसऱ्या दिवशी वेळ चुकणार नाही, ह्याची दक्षता घ्यावी. हे सातत्य जसे साधेल, तशी शक्ति जागृत होऊन ती सहाय्यकारी ठरेल. उदरभरणासाठी ज्याप्रमाणे नेमक्या वेळीच मोजकेच अन्न घेणारे जीव जसे तंदुरुस्त असतात, तशीच स्थिती ठराविक वेळच्या, ठराविक नामाने साधते, व मन आणि ध्यान स्थिर होऊन ईश्वरी शक्तिची पूर्णकृपा होते, हे यात छान पटवून दिले आहे. तसेच ठराविक वेळचे हे नेमके नाम घेतल्यावर गाडीत, बसमध्ये फावल्या वेळी नाम मुखी

घेत रहावे. मात्र त्याची मोजदाद ठेवू नये, हेही स्पष्ट करण्यात आले आहे.

आजच्या युगात खरा कोण नि खोटा कोण, हे ओळखता येत नाही. श्रध्देचा फायदा भोंदू साधूच जास्त उठवतात. म्हणून नाममार्गियांनी फक्त नामालाच आपला गुरु मानावा नि ठराविक वेळचे नाम घेऊन एरवी जमेल तेवढे अनुसंधान साधावे. तसेच प्राप्त स्थितीबद्दल कुणाला दोष न देता, कुणावर न रागावता शांत स्थिर मनाने नामालाच शरण जावे व येणारे प्राप्त कर्मभोग याची देही याचि डोळा भोगून सातत्याच्या येण्या-जाण्याच्या क्रियेतून मुक्त होऊन मुक्ती साधावी. जीवनात आपल्या संपर्कात येणाऱ्या जीवांवर मायेची पखरण करावी, त्यांना विश्वास दयावा. श्रद्धा, नाम याचा प्रचार करावा नि केलेल्या भल्या कार्याचा केव्हाही, कुठेही उच्चार करु नये. व्यवहाराने चोख संसार करुन नामाचरणी नम्र होऊन नाम घ्यावे. केव्हाही आत्मविश्वास न गमावता पूर्ण विश्वासाने एकच नाम घ्यावे व सर्व चिंता नामाला वाहून स्थिर-अलिप्ततेने जगावे, हेही विविध प्रवचनांद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

एकमुखी दत्ताचे प्रसन्न, मनमोहक मुख्यपृष्ठ व कुणालाही सहज वाचता येईल अशा मोठ्या आकाराच्या अक्षरांची सुबक छपाई, यामुळेही हे पुस्तक चित्ताकर्षक झाले आहे.

जीवनात किती व कसा कसा बदल, ह्या नामाच्या किमयेने साधता येतो, हे पटवून देणारे हे पुस्तक म्हणजे श्रध्दावंतांना निश्चितच मार्गदर्शक व आधारभूत ठरणारा कल्पवृक्षच आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

पुस्तकाचे नाव : श्री. दत्तगुरुंची प्रवचने (भाग-दुसरा)

प्रकाशिका: सौ. गीता गोविंद कुंटे

दुर्गास्मृती (पराडकर बिल्डिंग),

गावडे विझे रोड नं. २, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१.

(मूल्य रुपये १५/-, पृष्ठे - ११३.)

संग्राहक — भरतकुमार देसाई



# श्री. आप्पासाहेब बोरावके साईचरणी विलीन

श्री साईबाबा संस्थान शिर्डी समितीतील एक विश्वस्त सदस्य श्री. तुकाराम राघोजी उर्फ आप्पासाहेब बोरावके मुक्काम शिरडी यांचे शुक्रवार दिनांक १ एप्रिल १९८८ रोजी शिरडी येथे निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ८७ वर्षाचे होते.

कै. तुकाराम राघोजी उर्फ आप्पासाहेब बोरावके, शिर्डी, यांचा जन्म१९०१ साली सासवड येथे झाला. त्यांचे बालपण सासवड येथेच गेले. सासवड येथे पाणी नसल्यामुळे १९२०/२१ ला प्रथम शिर्डीला आगमन, शेती व्यवसाय सुरु केला. उत्तम प्रकारे शेती करून ब्राह्मणगाव, येसगाव व टाकळी ता. कोपरगांव येथे नवीनच आलेल्या कॅनॉलवर शेती घेऊन मोठ्या प्रमाणात मोसंबी, संत्री व लिंबू इत्यादींच्या फळबागा त्यांनी उभ्या केल्या. ब्राहमणगांव, ता. कोपरगाव येथे एक लक्ष मोसंबीची झाडे लावून १९५० ते १९५४ या कालावधीत आशिया खंडातील सर्वात मोठी बाग लावण्याचा विक्रम त्यांनी केला. त्यावेळचे पंतप्रधान श्री. पंडीत जवाहरलाल नेहरु व मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई यांनी स्वतः बागेस भेट देऊन त्यांचे कौतुक केले. त्यांनी १९५५-५६ साली दिल्ली येथील त्यांचे जागतिक शेतकी प्रदर्शनात फळबागेचा उत्कृष्ट स्टॉल ठेवून पहिल्या क्रमांकाचे बक्षीस पटकाविले.

प्रथमपासूनच ते श्री साईभक्त असल्याने दररोज समाधि मंदिरात श्री. अब्दुल बाबांचे बरोबर पूजाअर्चा करण्यास जात. रोज सकाळी दहा वाजता श्री साईबाबांचे समाधिवर स्वतःचे बागेतील गुलाबाची फुले आपल्या हाताने वाहण्याचा नियम त्यांनी काटेकोरपणे पाळला. हा नियम सुरु केल्यापासून आजतागायत हयातीपर्यंत ४५ वर्षे अविरतपणे त्यांनी पाळला. तसेच ते दररोज पहाटेच्या काकड आरतीस व सायंकाळच्या धूपारतीस नियमीतपणे उपस्थित असत. श्री साईबाबांची भक्ती हिंदू, मुसलमान, शिख, पारशी, ख्रिश्चन असे सर्व धर्मांचे लोक मोठ्या संख्येने करींत आहेत व त्यामुळे सर्वधर्मसमभाव ही शिकवणूक साईबाबांच्या भक्तीमार्गातून आपणा सर्वांना मिळते, यावर त्यांची नितांत श्रद्धा होती.

त्यांच्या पश्चात् पत्नी, ५ मुले, ३ मुली व नातवंडे-पतवंडे असा परिवार आहे. प्रथमपासूनच निःस्वार्थी व श्रद्धाळू असा त्यांचा स्वभाव होता. गेली चार वर्षांपासून ते

श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थानचे विश्वस्त म्हणून कारभार पहात होते. संस्थानचे कारभारात जातीने लक्ष देऊन भक्तांच्या सोई होण्यास सतत लक्ष देत. या वयातही (८७) श्री साईबाबा संस्थानचे कोणत्याही कामकाजात उत्साहाने भाग घेत. त्यांनी श्री साईबाबांवरील नितांत श्रद्धा व भक्तीभाव यांच्या आधारे बाबांच्या आशीर्वादाने आयुष्यातील अनेक कठीण प्रसंगांना तोंड देऊन यशस्वी वाटचाल केली, श्री साईनाथ मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवोत. श्री साईबाबा संस्थान त्यांच्या कुटुंबियांचे दु:खात सहभागी आहे.

# दर्शन महति

कंठ आला रे भरूनी
साईला सामोरे पाहुनी
मंदिरात मी गेलो जेव्हा
दृष्टि देखिले साई तेव्हां
कंठ आलारे भरूनि साईला सामोरे पाहुनि ॥ १॥
अगाध शक्ती प्रभुरायाची
जडजीवाते तारायाची
अगम्य लीला पाहुनी त्यांची
कंठ आलारे भरूनी साईला सामोरे पाहुनी ॥ २॥
सकळ भक्तगण उभे राहति
आनंदाने आरती गाती
श्री साईचा जयजयकार पाहुनी
कंठ आलारे भरूनी साईला सामोरे पाहुनी ॥ ३॥
पुढे पाहता द्वारकामाई
दीना दुबळ्यांची कनवाळू आई
डोई ठेविता त्यांच्या पायी
कंठ आलारे भरूनी साईला सामोरे पाहुनी ॥ ४॥
पाहुनी ते गुरू पादुका स्थान
हृदय भरूनी ये आनंदाने
साईच्या त्या पदस्पर्शाने
कंठ आलारे भरूनी साईला सामोरे पाहुनी ॥ ५॥

**— श्री. केशव गोळवणकर**
१८८ डी, भीमराव वाडी,
ठाकुरद्वार, मुंबई - २.

# इति श्री साई उवाच

संकलन – श्री. डी. जी. देशपांडे
खूर-सिल-नाझ,
कोहिनूर रोड, दादर,
मुंबई - ४०० ०१४.

५३
होऊं द्या आणिक एक आवृत्ती। वाचितां ही गुरूची पोथी।
भक्त होती निर्मळ।। या पोथीचें पारायण।
करितां होईल कल्याण। परमेश्वर होईल प्रसन्न।
भवबंधन सुटेल।।

अ. १८ वा

५४
शामापासून पंधरा रुपये। दक्षिणा ये घेऊनि।।
उठ शामाकडे जा म्हणत। दक्षिणेसीं परत ये।।
बैस म्हणाले तयांचे घरीं। विळभर तयांसवें वार्ता करीं।
बोलून चालून परस्परीं। मग माघारी तूं येईं।।
शामा आज काय विचार। ठीक आहे ना समाचार।
तो नारायण तेली चळला फार। गांजी अनिवार मजलागी।।

अ. १८ वा

५५
आई तूं कां गे घेतलें धरणें। कां तुज मरणें आठवलें।
आई खरेंच सांगें। हाल जीवाचे करिसी कां गे।
फकीर मी केवळ तुकडे मागें। पाहीं अनुरागे मजकडे।।
खरेंच मी लेक तूं आई। आतां मजकडे लक्ष देईं।
सांगतो तुज एक नवलाई। परम सुखदाई होईल।।
होता पहा माझा गुरू। मोठा अवलिया कृपासागरू।
थकलों तयाची सेवा करकरूं। कानमंतरू देईना।।
माझ्याही मनीं प्रबळ आस। कधीं न सोडावी तयाची कास।
तया मुखेंच घ्यावे मंत्रास। दीर्घ सायास करूनि।।
आरंभी तयानें मज मुंडिले। पैसे मज दोनच याचिले।
ते मी तात्काळ देऊनि टाकिले। बहु मी प्रार्थिलें मंत्राक्षर।।
माझा गुरू पूर्ण काम। दोन पैशांचे काय काम।
कैसें म्हणावें त्या निष्काम। शिष्यांसी दाम मागे जो।।
ऐसी शंका येवो न मना। व्यावहारिक पैशाची न त्या कामना।

ही तो नाहीं तयाची कल्पना। कर्तव्य कांचना काय त्या॥
'निष्ठा' आणि 'सबुरी' दोन। हेच ते पैसे, नव्हते आन।
म्या ते तेव्हांच टाकिले देऊन। तेणे मज प्रसन्न गुरूमाय॥
धैर्य तीच गे बाई सबूरी। सांडू नको तिजला दूरी।
पडतां केव्हांही जडभारी। हीच परपारीं नेईल॥
पुरुषांचे पौरुष ती ही सबूरी। पाप ताप दैन्यता निवारी।
युक्ति प्रयुक्तिं आपत्ती वारी। बाजूस सारी भय भीती॥
सबूरीवरी यशांचा वाटा। विपत्ती पळवी बारा वाटा।
येथ अविचारांचा कांटा। नाहीं ठावुका कोणाही॥
सबूरी सद्गुणांची खाणी। सद्विचार रागाची हे राणी।
निष्ठा आणि ही सख्या बहिणी। जींव प्राण दोघींसी॥
सबूरी वीण मनुष्यप्राणी। स्थिती तयाची दैन्यवाणी।
पंडित असो का मोठां सद्गुणी। व्यर्थ जिणे हिजवीण॥
गुरू जरी महा प्रबळ। अपेक्षी शिष्यप्रज्ञाच केवळ।
गुरुपदीं निष्ठा सबळ। धैर्यबळ सबूरी॥
जैसा दगड आणि मणी। उजळती दोन्ही घासितां सहाणीं।
परी दगड राहे दगडपणीं। मणी तो मणी तेजाळ॥
एकचि संस्कार दोघा उजळणी। दगडा चढेल काय मण्याचें पाणी।
घडेल मण्याची सतेज हिरकणी। दगड निजगुणी तुळतुळीत॥
बारा वर्षे पायी वसवटा। केला गुरूनें लहानाचा मोठा।
अन्नावस्त्रासी नव्हता तोटा। प्रेम पोटांत अनिवार॥
भक्ति प्रेमाचा केवळ पुतळा। जयास शिष्याचा खरा जिव्हाळा।
माझ्या गुरूसम गुरू विरळा। सुखसोहळा न वर्णवे॥
काय त्या प्रेमाचे करावे वर्णन। मुख पाहतां ध्यानस्थ नयन।
आम्ही उभयतां आनंदघन। अन्यावलोकन नेणें मी॥
प्रेमे गुरुमुखावलोकन। करावें म्यां रात्रंदिन।
नाहीं मज भूक ना तहान। गुरूवीण मन अस्वस्थ॥
तयावीण नाहीं ध्यान। तयावीण न लक्ष्य आन।
तोच एक नित्य अनुसंधान। नवलविंदान गुरूचें॥
हीच माझ्या गुरूची अपेक्षा। कांहीं न इच्छी तो या पेक्षां।
केली न माझी केव्हांही उपेक्षा। संकटी रक्षा सदैव॥
कधीं मज वास पायंपाशीं। कधीं समुद्र-परपाराशीं।
परी न अंतरलों संगमसुखासी। कृपादृष्टीसीं सांभाळी॥
कासवी जैसी आपुले पोरां। घालिते निजदृष्टीचा चारा।
तैसीच माझे गुरूची तऱ्हा। दृष्टीनें लेंकरा सांभाळी॥
आई या मशीदींत बैसून। सांगतों तें तूं मानी प्रमाण।

गुरूनें न फुंकले माझेच कान। तुझे मी कैसे न फुंकरू।।
कासवीची प्रेमदृष्टी। तेणेंच पोरांसी सुखसंतुष्टी।
आई उगीच किमर्थ कष्टी। उपदेशगोष्टी नेणें मी।।
कासवी नदीचे एक तटीं। पोरें पैल वाळवंटीं।
पालन पोषण दृष्टादृष्टीं। व्यर्थ खटपटी मंत्राच्या।।
तरी तूं जा अन्न खाई। नको हा घालूं जीव अपायीं।
एक मजकडे लक्ष देई। परमार्थ येईल हातास।।
तूं मजकडे अनन्य पाहीं। पाहीन तुजकडे तैसाच मीही।
माझ्या गुरूनें अन्य कांहीं। शिकविलें बाहींच मजलागीं।।
नलगे साधन संपन्नता। नलगे षट्शास्त्रचातुर्यता।
एक विश्वास असावा पुरता। कर्ता हर्ता गुरू ऐसा।।
म्हणूनी गुरूची थोर महती। गुरू हरिहर ब्रहममूर्ति।
जो कोण जाणे तयाची गति। तो एक त्रिजगतीं धन्य गा।।

— अ. १९ वा

५६

किती ही गोड ऐकिली कथा। बाणली का ते तव चित्ता।
खरीच सार्थकता मानली कां।।
कळाच आमुची आहे न्यारी। ही एकच गोष्ट जीवीं धरीं।
फार उपकारी होईल।।
आत्मयाचे सम्यग्विज्ञान। सम्यग्विज्ञानाकारण ध्यान।
तें ध्यानचि आत्मानुष्ठान। तेणेंच समाधान वृत्तीचें।।
होऊनि सर्वेषणाविनिर्मुक्त। ध्याना आणावा सर्वभूतस्थ।
ध्यान होईल व्यवस्थित। प्रात्पव्य प्राप्त होईल।।
केवल जे मूर्त ज्ञान। चैतन्य अथवा आनंदघन।
तेंच माझें स्वरूप जाण। तें नित्य ध्यान करीं गा।।
जरी न आतुडे ऐसें ध्यान। करी सगुणरूपानुसंधान।
मनीं नखशिखांत मी सगुण। रात्रंदिन आणावा।।
ऐसें करितां माझे ध्यान। वृत्ति होईल एकतान।
ध्याता-ध्यान--ध्येयाचे भान। नष्ट होऊन जाईल।।
एवंही त्रिपुटी विलयां जातां। ध्याता पावे चैतन्यघनता।
हीच कीं ध्यानाची इतिकर्तव्यता। ब्रहमसमरसता पावसी।।
कासवी नदीचे ऐल काठीं। तिचीं पिल्लें पैल तटीं।
ना दूध ना ऊब केवळदृष्टी। देई पुष्टी बाळका।।
पिलियां सदा :आईचे ध्यान। नलगे करणें कांहीच आन।
नलगे दुग्ध ना चारा ना अन्न। मातानिरीक्षण पोषण त्यां।।

हें जें निरीक्षण कूर्मदृष्टी। ही तों प्रत्यक्ष अमृतवृष्टि।
पिलियां लाधे स्वानंदपुष्टि। ऐक्यसृष्टि गुरुशिष्यां॥

— अ. १९ वा

५७

ती सबंध शर्करा माझे हातीं। बाबा रिचविती आणि वदती।
या साखरेवाणी होईल स्थिती। ठेवितां चित्तीं ही गोष्टा॥
जैसी खडीसाखर ही गोड। तैसेंच पुरेल मनींचें कोड।
होईल तुझे कल्याण चोखड। पुरेल होड अंतरींची॥
बाबा वदतीं कथाश्रवण। करा मनन आणि निदिध्यासन।
होईल स्मरण आणि ध्यान। आनंद घन प्रकटेल॥
एणेंपरी जें परिसलें कानीं। तें जरी तूं धरिसील मनीं।
उघडेल निजकल्याणाची खनी। होईल धुणी पापाची॥
वाऱ्याचा चालतां सोसाटा। समुदावरी उसळती लाटा।
असंख्य बुब्दुद फेणांचा सांठा। आदळती काठां येऊनि॥
लाटा बुडबुडे फेण भंवरे। एका पाण्याचे प्रकार सारे।
हे सकळ दृग्भ्रनाचे पसारे। शांत वारे होती तों॥
हे काय प्रकार म्हणावे झाले। किंवा म्हणावे कां नाश पावले।
जाणोनि मायेचें सर्व केले। झालें गेलें सरिसेंच॥
तैसीच सृष्टीची घडामोड। विवेकियां न तयाचें कोड।
ते नाशिवंती न धरिती होड। साधिती जोड नि त्याची॥
महत्वें ज्ञानापरीस ध्यान। तदर्थ लागे यथार्थ ज्ञान।
होतां न वस्तूचें साद्यंत आकलन। यथार्थ ध्यान आतुडेना॥
सम्यग्विज्ञाना मूळध्यान। या नांव प्रत्यगात्मानुष्ठान।
परी जो विक्रियारहित जाण। आणवे ध्याना कैसेनी॥
प्रत्यगात्मा तोच ईश्वरू। आणि जो ईश्वरू तोच गुरू।
तिहींत भेद नाहीं अणुमात्रू। नागवें करूं जाई तो॥
होता निदिध्यास परिपक्वता। ध्यान ध्याता विरोन जातां।
निवात दीपवत् चित्ता। शांतता ते समाधिं॥
होऊनि सर्वेषणाविनिर्मुक्त। जाणूनि आहे तो सर्वभूतस्थ।
होतां अद्वितीयत्वें अभय प्राप्त। मग तो येत ध्यानातें॥
मग अविद्याकृत कर्मबंध। तुटती तटातट तयाचे संबंध।
सुंटती विधिनिषेध - निर्बंध। भोगी आनंद मुक्तीचा॥
आधीं आत्मा आहे कीं नाहीं। अद्वैत कीं निराळा ठायीं ठायीं।
कर्ता कीं अकर्ता पाहीं। साही शास्त्रें धुंडावीं॥
आत्मैकविज्ञान हेंचि। पराकाष्ठा असे ज्ञानाची।

मोक्ष आणि परमानंदाची। उत्पत्ति साची तेथूनी॥
अंधास हत्तीचे वर्णनाकरितां। आणिला बृहस्पतीसमान वक्ता।
वक्तृत्वें स्वरूप येईना चित्ता। वाचातीता न वर्णवे॥
वक्त्याचें वक्र श्रोत्यांचे श्रोत्र। आणितील काय गेलेले नेत्र।
हस्तिस्वरूपावलोकनपात्र। केवळ नेत्रची सत्यत्वें॥
नेत्र नसतां कैसा हस्ती। येईल अंधाचियें प्रतीतीं।
तैसेच दिव्य नेत्र जै गुंरू देती। ज्ञानसंवित्ति तेधवां॥
साईस्वरूप यथार्थ ज्ञान। स्वयें जो परिपूर्ण विज्ञानघन।
हेंच तयाचे ध्यान अनुष्ठान। हेंचं दर्शन तयाचें॥
अविद्या-काम-कर्मबंधन। यांचे व्हावया अशेष मोचन।
नाहीं नाहीं अन्य साधन। गांठही बांधून ठेवा कीं॥
साई नाहीं तुमचा वा आमुचा। तो तों सर्वभूतस्थ साचा।
सूर्य जैसा सकल जगाचा। हा सकळांचा तैसाच॥
नसल्या लागा बांधा काहीं। कोणीही कोठेंही जातची नाहीं।
नरास काय पशुपक्ष्यांही। न करीं कुणाही हडहड॥
आल्यागेल्याचा आदर करीं। तृषितां जल भुकेल्या भाकरी।
उघड्यास वस्त्र बसाया ओसरी। देतां श्रीहरी तुष्टेल॥
कुणाला व्हावा असेल पैसा। तुझिया चित्तीं व्हावा कैसा।
देऊं नको, परी वसा वसा। श्वानाऐसा वर्तूं नको॥
कोणीही बोल बोलो शंभर। स्वयें नेदीं कटु उत्तर।
धरितां सहिष्णुता निरंतर। सुख अपार लाधेल॥
दुनिया झालिया इकडची तिकडे। आपण व्हावे न मार्गेपुढें।
तायींच निश्चल राहून रोकडें। कौतुक तेंव्हढें पहावें॥
तुम्हां आम्हांमधील भिंत। पाडून टाका पहा समस्त।
मग जाण्या येण्यास मार्ग प्रशस्त। अति निर्धास्त होईल॥
मीतूंपणाची भेदवृत्ति। हेच ते गुरूशिष्यांतर्गत भिंती।
तेन पाडितां निश्चितीं। अभेद स्थिती दुर्गम॥
'अल्ला-मालिक अल्ला-मालिक'। वाली न त्यावीण कोणी आणिक।
करणी तयाची अलौकिक। अमौलिक अकळ ती॥
तो जें करील तेंच होईल। मार्ग तयाचा तोच दावील।
क्षण न लागतां वेळ येईल। मुराद पुरेल मनींची॥
ऋणानुबंधाचिया गांठी। भाग्यें आम्हां तुम्हां भेटी।
धरूं परस्पर प्रेम पोटी। सुखसंतुष्टी अनभवूं॥
कोण येथे अमर आहे। कृतार्थ तो जो परमार्थ लाहे।
ना तरी श्वासोच्छवास वाहे। तोंवरी राहे जीव मात्र॥

५९

तुम्ही जोर काढूं लागा। दुधाची काळजी सर्वस्वी त्यागा।
वाटी घेऊन उभाच मी मागां। पृष्ठभागा आहें कीं॥
म्हणाला जोर म्यां काढावे। दुधाचे प्याले तुम्हीं रिचवावे।
हें तों आपणा नाहीं ठावें। दक्ष असावे कार्यार्थी॥
हे बाबांची प्रतिज्ञावाणी। प्रमाण मानूनि वर्ततील जे कोणी।
इहपरत्र सुखाची खाणी। गांठिली तयांनी जाणावें॥

—अ. १९ वा

६०

॥पद॥

गुरूकृपांजन पायो मेरे भाई। रामबिना कछु मानत नाहीं ॥ धृ.॥
अंदर रामा बाहेर रामा। सपने में देखत सीतारामा ॥ १॥
जागत रामा सोवत रामा। जहां देखे वहां पूरनकामा ॥ २॥
एका जनार्दनीं अनुभव नोका। जहां देखे वहां राम सरीखा ॥ ३॥ गुरूला

—अ. १९ वा

६१

पहां त्या जिभेला काय गोडी। जनलोकांची विष्ठा चिवडी।
बंधु स्वजनावर चडफडी। यथेष्ट फेडी निज हौस॥
बहुत सकृताचिये जोडी। आला नरजन्म ऐसा जो दवडी।
तया आत्मघ्नाही शिरडी। सुखपरवडी काय दें॥

—अ. १९ वा

६२

जैसे जो करील तैसें भरील

—अ. १९ वा

६३

जलस्थलकाष्टप्रदेशीं। जनीं वनीं देशीं विदेशीं।
संचलो मी तेजीं आकाशीं। एक देशी मी नव्हे॥
औट हात देह परिमित। हेच मद्याप्ति जे मानित।
त्यांस कराया निभ्रांत। मूर्तिमंत मी झालों॥
निष्कामत्वें अनन्यभजन। करिती जे माझें रात्रंदिन।
ते प्रत्यक्ष माझें मीपण। दुजेपणविरहित॥
गूळ राहील गोडी वेगळा। सागर लाटांपासून निराळा।
तेजा सोडोनि राहील डोळा। मजवीण भोळा भक्त तैं॥
चुकावा जन्ममरणावर्त। ऐसें जयाचें मनीं निश्चित।
प्रयत्ने रहावे धर्मवंत। स्वस्थचित्त सर्वदा॥
त्यागावे तेणें बोल वर्मी। कोणास छेदूं नये मर्मी।
सदा निरत शुद्ध कर्मी। चित्त स्वधर्मी ठेवावे॥

माझिये ठायीं मन बुद्धि। समर्पा स्मरा मज निरवधि।
देहाचें कांहींही होवो कधीं। भय त्रिशुद्धि त्या नाहीं।।
जो पाहे मजकडे अनन्य। वर्णी परिसे मत्कथा धन्य।
न धरी भावना मदन्य। चित्त चैतन्य लाधेल।।
माझें नांव घ्या मज शरण या। हें तों सांगत गेले अवघियां।
परी मी कोण हें जाणणिया। श्रवण मनन आज्ञापिले।।
कोणास प्रत्यक्ष निक्षून सांगती। आमची तों मोठी कडवी जाती।
सांगून पाहूं एका दो वक्तीं। शेवटची गती बहु कठीण।।
सांगूं एकदां सांगूं दोनदां। न करी जो गुमान आमुचे शद्व।
त्या मग पोटचे पोरास सुद्धां। चिरून द्विधा फेकूं कीं।।

अ. १९ वा

६४

जा भाऊ जा जेवावयास। जा अण्णा जा तूं खा सुग्रास।
जा अवघे जा निजस्थानास। प्रत्येकास वदत ते।।

# साईनाथ माझा

साईनाथ माझा
आनंदाचा कंद
भक्तीप्रेम छंद
जडविला

शिरडीचे स्वामी
माझे मायबाप
हरती भवताप
संसारीचा

तनमनधन
अर्पिता चरणी
तेणे सुखरवाणी
सापडली

साईनाथ माझा
सुखाचे आगर
वाही चिंताभार
सकळांचा

— श्री. नामदेव लोटणकर
५/१३, आर्य नगर, ताडदेव, मुंबई-३४.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |